साप्ताहिक
माणूस
शनिवार । २८ जून १९७५ । एक रुपया

# यामुळे आपल्या लोकशाहीचे सर्वत्र हसे होत आहे....



# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : पंधरावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २८ जून | अंक : चवथा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


# आपल्याला आज काय हवे आहे? सर्कस की भाकरी?

इंदिरा गांधींनी सत्ता सोडली किंवा त्यांना ती सोडावी लागली तर देशात खरोखरच आकाशपाताळ एक होणार आहे का? आजवर असे प्रसंग आले तेव्हाचा अनुभव काय आहे? सध्याची परिस्थिती फार आणीबाणीची, नाजूक आणि अभूतपूर्व आहे म्हणजे नेमकी कशी आहे? इंदिरा गांधी तरी ही परिस्थिती योग्य रीतीने हाताळत आहेत काय? इंदिरा गांधींशिवाय ही परिस्थिती हाताळायला, तिच्यातून मार्ग काढायला काँग्रेस पक्षात किंवा विरोधी दलात एकही योग्य व पात्र अशी व्यक्ती किंवा व्यक्तिगट उपलब्ध नाही का? अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा धक्का बसल्यावर सर्वांची पहिली प्रतिक्रिया गोंधळल्याची, गांगरून गेल्याची होणे समजू शकते. एवढ्या खंबीर आणि दृढनिश्चयी पंतप्रधानबाई पण त्याही निर्णय समजल्यावर दिवस। दोन दिवस गडबडल्या-गोंधळल्या. राजिनामा द्यायला निघाल्या. मग मागे फिरून सत्तेला पूर्वीपेक्षाही अधिक घट्ट चिकटून बसल्या. मेळावे काय भरवत सुटल्या. विरोधकांचे प्रती मेळावे मग ओघाने आलेच. पण आता हा सगळा वातावरणातला ताण, उन्माद संपायला हवा आहे. थोड्या व्यवहारी भूमिकेतून विचार व्हायला हवा—खरोखरच इंदिरा म्हणजे भारत हे समीकरण बरोबर आहे का? आणि बरोबर असल्यास आपल्या लोकशाहीला काही अर्थ आहे का?

आपल्याला आज तीन गोष्टींची गरज आहे.

१ : राष्ट्रीय एकात्मता

२ : परचक्रनिवारण

३ : स्वावलंबी अर्थव्यवस्था.

या तीनपैकी पं. नेहरूंनी आपली फक्त पहिलीच गरज पूर्ण केली, तरी आपण त्यांचे नेतृत्व श्रेष्ठ मानतो. शास्त्रीजींनी पहिल्या दोन गरजा पूर्ण केल्या—जरी त्यांचे व्यक्तिमत्त्व पं. नेहरूंपेक्षा खूपच लहान होते—मध्यम दर्जाचे होते. तिसरी गरज मात्र कोणीच पूर्ण करू शकला नाही आणि आज इंदिरा गांधींनाही या स्वावलंबनाच्या आघाडीवर अपयश येत चालल्याचे स्पष्ट दिसत आहे. खरे तर इंदिरा गांधी ज्या पद्धतीने राज्यकारभार करीत आहेत ती पद्धत राष्ट्रीय एकात्मतेलासुद्धा फार मारक ठरण्याची शक्यता आहे. राज्याराज्यांमध्ये परस्पर सहकार्याची, विश्वासाची भावना त्या आजवर निर्माण करू शकलेल्या नाहीत. पं. नेहरू, गांधीजी यांच्याप्रमाणे त्यांच्या नेतृत्वाला नैतिक—सांस्कृतिक अधिष्ठानही नाही. सत्ता हस्तगत करण्याचे, ती राबवण्याचे एक तंत्र त्यांना अवगत आहे आणि केवळ या तंत्रबळावर विसंबून त्या काँग्रेस पक्षाची व देशाची एकात्म प्रतिमा टिकवू पाहत आहेत. त्यामुळेच ती केव्हा धोक्यात येईल, सत्तास्पर्धा एकात्मतेचा केव्हा बळी घेईल याचा काही नेम सांगता येत नाही. परचक्रनिवारण हे एकच इंदिरा गांधींचे खरे प्रभावक्षेत्र आहे. या क्षेत्रातील त्यांचे यश मात्र वादातीत ठरलेले आहे. जगानेही या यशाला मान्यता दिलेली आहे. प्रश्न असा आहे, की हे यश इतर कुणी हस्तगत करू शकणार नाही का? शास्त्रीजींना हे यश जेव्हा मिळाले तेव्हा पं. नेहरूंसारखी कुठलीही आंतरराष्ट्रीय वा राष्ट्रीय प्रतिमा शास्त्रीजीं-

जवळ नव्हती. तरी ६५ साली त्यांनी पाकिस्तानचे आक्रमण परतवून लावले. इतकेच नव्हे तर जे करणे नेहरूंना कधीही जमले नाही, जमण्यासारखे नव्हते, ते लाहोरकडे फौजा घुसवण्याचे साहसही शास्त्रीजींनी करून दाखवले. या यशामुळे काही काळ तर शास्त्रीजींची प्रतिमा जनमानसात नेहरूंपेक्षाही अधिक उजळली होती. हा इतिहास अगदी ताजाच आहे. या इतिहासाची पुनरावृत्ती होणारच नाही असे आपण का मानून चालावे? उद्या यशवंतराव चव्हाण किंवा जगजीवनराम किंवा अगदी मधू लिमये–अटलजीदेखील हा पराक्रम गाजवू शकतील–प्रसंग आल्यावरच नेतृत्वही उभे राहात असते ना? उलट टोकाला जाऊन धोकेबाज व धक्काबाज राजकारण करण्याच्या इंदिरा गांधींच्या शैलीपेक्षा समंजस, मध्यममार्गी व सर्वांचा विश्वास व सहकार्य संपादन करू शकणारे प्रगल्भ नेतृत्व आणीबाणीच्या काळात अधिक उपयोगी ठरण्याची शक्यताही दृष्टिआड करून चालणार नाही. आपल्या तीन गरजांपैकी दोन गरजा भागवणारे नेतृत्व आजही काँग्रेस पक्षात व बाहेरही पुरेशा प्रमाणात आहे. वानवा आहे ती तिसऱ्या गोष्टीची. इंदिरा गांधीही येथे अपुऱ्या ठरल्या आहेत. कारण आपले आर्थिक स्वावलंबनाचे प्रश्न केवळ आर्थिक क्षेत्रातील उपाय योजून सुटण्यासारखे नाहीत. काही सांस्कृतिक–नैतिक जाणिवा यासाठी जनमानसात निर्माण कराव्या लागणार आहेत. त्यागाचे, विधायक पुरुषार्थाचे, ध्येयवादाचे एक नवेच आवाहन त्यासाठी अवश्य आहे. हे आवाहन केवळ सत्तातंत्रात अडकलेल्या इंदिरा गांधींसारख्या व्यक्ती करू शकणार नाहीत. केले तरी अशांची आवाहने जनता मानणार नाही. मग इंडिया इज इंदिरा या समीकरणात अर्थ तरी काय उरला?

जयप्रकाश म्हणतात ते खरे असावे कदाचित्. काँग्रेसअध्यक्ष बरुआ हे खरोखरच दरबारी विदूषक ( Court jester ) असावेत. कारण त्याशिवाय एकीकडे इंदिरा इज इंडिया आणि दुसरीकडे लोकशाही बचाव अशा अगदी परस्पर विसंगत दोन घोषणा ते एकाच दमात कशा काय करू शकले? लोकशाही म्हणजे कायद्याचे राज्य. हे कायदे लोकप्रतिनिधींनी केलेले असले तरी केलेले कायदे पाळण्याचे बंधन लोकप्रतिनिधींवरही असते. आणीबाणी–आणीबाणी अशी आवई उठवून हे कायदे धुडकावून लावण्याची प्रवृत्ती वाढली तर लोकशाही उरली कुठे? बरुआंचे भाषण, इंदिरा गांधींना पाठिंबा दर्शवण्यासाठी भरवण्यात आलेले लाखालाखांचे मेळावे, ठराव, तारा, पत्रके यांचा भडिमार पाहता कायद्याच्या राज्यावरचा लोकांचा विश्वास उडाला तर आश्चर्य वाटायला नको. दिला असता समजा इंदिरा गांधींनी राजिनामा तरी फारसे काही बिघडले नसते. उलट कोर्टाने निर्दोष ठरवल्यावर पुन्हा त्या अधिक तेजाने तळपत सत्तेवर आल्या असत्या, एक चांगला पायंडा पडला असता, एक संस्कार उमटला असता. पण बाईंना भीती वाटते ती ही, की एकदा दूर झाल्यावर पुन्हा आपले सहकारी आपल्याला जवळ करतील की नाही? आज इंदिरा–इंदिरा करणारे सहकारीच वेळ येताच घाव घालायलाही मागेपुढे पाहणार नाहीत याची त्यांना खात्री आहे. त्यांनीच गेल्या आठ वर्षात जे पेरले ते उगवले आहे. सत्तेचा क्रूर खेळ त्या खेळल्या. कुठलेही मूल्य त्यांनी मानले नाही. कुणाला निष्ठा दिली नाही, विश्वास संपादन केला नाही. हंटरच्या जोरावर सगळी सर्कस नाचवली. लोकांना सर्कस आवडली–अजूनही काही काळ आवडत राहील; पण राष्ट्राला आज काय हवे आहे? सर्कस की भाकरी? भाकरीचा प्रश्न नाही आज इंदिरा सोडवू शकत, नाही इंदिरा सर्कसमधील आणखी कुणी. त्यामुळे इंदिरा राहिली काय, दूर हटली काय फारसा फरक पडत नाही. काही काळ आपणहून बाई दूर राहिल्या असत्या तर बरे झाले असते एवढेच. पण त्यासाठी विरोधकांनी एवढे आकांडतांडव करायलाही नको होते आणि पाठिंबावाल्यांनीही शंभुमेळावे भरवण्याचे काही कारण नव्हते. जगात आपल्या लोकशाहीचे यामुळे हसेच अधिक झाले आहे.

**–श्री. ग. मा.**

# ॥ चार कविता ॥

भारत १९७५
हुंकार
—मधुश्री

क्रांती
—रावळे

पोरं विचारताहेत
—अशोक मनोहर

## भारत : १९७५

या दुर्दैवी देशाच्या अनिर्बंध दु:स्थितीविषयी
मी काही सांगू शकत नाही.
पण
जळून खाक झालेल्या आयुष्यांची राख
कधीच कपाळी ल्यालो आहे मी ही...
असं समजा
आत्महत्या केलीच तर
आसवे पिऊन स्वत:ची टेर
बेचैन होऊन निघून गेलो आहे.

निष्ठाच बळी पडत असतील तर
भग्न मंदिराच्या भिंती
कशासाठी कुरवाळत रहावे आपण ?
पायाखालची फळकुटं मोडणार नाहीत
आता हमी घेणार आहे काय कोण ?

खुरट्या जमावांपुढे भाषणं ठोकणारे
हे छिनाल देशभक्त !
भुरट्या शब्दांची आरास उभी करतात.
नि स्वत:लाही विकून बदल्यात
आत्म्यांना भोकं पाडण्याची कॉंट्रॅक्ट घेताहेत.



बिनतारी संदेश किंवा रेडिओ, टेलिफोन, टी. व्ही.
माणसांचे घसरते बाजारभाव
क्षणोक्षणी बजावून सांगतायत.
रस्ते भरून गुलामांची नित्यशी वर्दळ
आणि या सगळ्यांचा प्रचंड
बेवडेबाज गदारोळ.
कशासाठी ?
यांना पण ठाऊक नाही.
मला पण सांगता येत नाही.

चौकातल्या पुतळ्यांच्या चबुतऱ्यांवर
टांग वर करताना कुत्र्यांना बेगुमान
कुणीसुद्धा हटकत नाहीत.

द्रौपदी अर्धनग्न : जाहिरातीत.
सफाचाट केलेले
फिल्मी ढंगाचे कौरव–पांडव
त्यांची लाकडी आयुधे
लढण्यासाठी
फोटोएनिक पावित्र्ये
कडाडून द्या टाळी ! सीन फत्ते !

कुंटणखान्यात नव्या कळीची किंकाळी.
आजच्या चर्चेला

असेंब्लीत
भूकबळी.
सगळेच घमेंडबाज–भोंगळ.
भोंगळ देशहिताची खांद्यावर द्वाही.
मरणारासुद्धा
यांच्या तावडीतून सुटत नाही.

मी आता
आर्टगॅलेऱ्यांतून ओळीने कवटया मांडत राहीन.
आणि निराकार रचना. हाडांच्या.
लहान-मोठे, जून-कोवळे सांगाडे अन्
कातडयांवर ताणलेल्या रेखाटणे काही

¤

# हुंकार

–आभाळाला आकार देण्याची
आमची दुर्दम्य इच्छा !
तुम्ही काही पूर्णत: मोडीत काढू शकत नाही
मरणाच्या डोळयाला भिडवून डोळा
जगण्याचे मर्म
आम्ही जाणतो !
लढयाचा पण धर्म जाणतो !

इतकं ठाऊकच आहे म्हणा आम्हाला
हातात अडकवून हातकडया
अजस्त्र भिंतीआड गजांच्या बाराखडया
असंख्य असहनीय शिक्षांचे अघोरी प्रकार
एवढा सगळा सत्कार
फक्त आमच्याच वाटणीला येऊ शकतो
(असंच काही नाही !)
इतिहासाच्या पानापानांवर
एकेक सूर्य असतो–स्पष्ट न् प्रकाशित.
अन् जगज्जेत्यांचाही अस्त :
अखेर ठरलेलाच नसतो काय ?
(नाकाराल ? तर मीच तुमच्या तोंडावर थुंकेन.)
उघडया डोळयांनी बघाल तर जरा
अजून येतायत ढग......
अजून पडतोय्च पाऊस......
अजून शून्यवत् मातीतनं घुमारतायत अंकूर...
अजून वहातेय् नदी...गर्जतोय् समुद्र...
अन् गळाभर काळोखात बुडालेल्या
माणसांमधून इथल्याच औलाद बंडखोरांची
जन्माला येणारच नाही काय ?
बंदीवासात जन्मलेल्या कृष्णासारखी

–मधुश्री

# क्रांती

' Long live revolution '
क्रान्ती चिरायु होवो.
घुमले होते बोल एकदा
स्वातंत्र्याच्या पहाटेपूर्वी
आणि आता तर माध्यान्ह
झाला आहे.

पण ती क्रान्ती कुठे आहे ?
ती तर इथे होरपळत आहे,
महागाईच्या धगधगत्या ज्वालेत,
बेकारी, वशिलेबाजीच्या धुराने
तिचा श्वास घुसमटला आहे,
हजारोंच्या इथे आहुत्या पडत आहेत,
त्यांचे शिव्याशाप तुम्हाला मिळत आहेत.
भ्रष्टाचाराच्या अंध:कारात,
आम्ही सारे गाडले गेलो आहोत !

आमचा शेवट इथेच होणार का ?
आमच्या पराक्रमाच्या सूर्याला लागलेले
ग्रहण, कधीच सुटणार नाही का ?
असे होणार नाही. कारण अजूनही,
एक दिवा प्रकाश दाखवायला,
पुढे ठाकला आहे,
आपल्याला त्याच्यामागून जायला हवे !
तुम्ही जाणार का ?

जा ! जा ! अवश्य जा !
नाही तर हा ' अंधार, ' तुम्हा-आम्हाला
फाडून खाणार आहे !
पण एक लक्षात असू द्या,
या दिव्याला तुमच्याकडून तेल हवे आहे,
देणार का तुम्ही ?
द्यायलाच हवे ! नाही तर हा पण दिवा
विझणार आहे

द्या ! द्या ! त्याला नवजीवन द्या,
त्याला नवजीवन देण्यासाठी तुमची–आमची
जरूरी आहे. पण.........

लक्षात ठेवा. जर असे झाले नाही तर......?
यदाकदाचित दिवा विझला तर......?
सरळ आहे, अंधार वाढत जाणार आहे.
अंधारातील पापे वाढत जाणार आहेत.
आणि तुम्ही-आम्ही, अध:पाताच्या गर्तेत
भयानक वेगाने कोसळत जाणार आहोत,
पुन्हा कधीही न उठण्यासाठी......

–एस्. एस्. रावले

# पोरं विचारताहेत !

खूप समारंभ झाले
खूप परिषदा झाल्या
खूप मेळावे झाले
खूप युद्धे झाली
तुम्ही आम्ही एकत्र आलो
समारंभाचे मेळाव्याचे परिषदांचे
अध्यक्ष तुम्ही होतात
युद्धाचे लढ्याचे
सेनापती तुम्ही होतात.
दरवेळेस आम्ही प्रामाणिकपणे हजर राहिलो
हत्यारे घेऊन
कधी नाचगाण्यासाठी ढोल पावरी
तर कधी लढ्यासाठी बंदूक घेऊन
सभेत आम्ही गाणी गायली
तुम्ही लिहून दिलेली
युद्धात जिवानिशी लढलो
तुम्ही सांगितलेल्या शत्रूबरोबर
राब राब राबत आलो
तुम्ही सांगितलेल्या यंत्रावर
तुम्ही पाठीवर थाप मारलीत, आम्ही खूष झालो
तुम्ही चटणी-भाकर दिलीत, आम्ही मुकाट्याने खाल्ली
तुम्ही सांगितले म्हणून आमच्या पोराबाळांनाही
असेच जगायले शिकवले
पिढ्या न पिढ्या न कुरकुरता जगत आलो
पण आज
आज आमची पोरं ऐकत नाहीयेत

पोरं विचारताहेत
प्रत्येक सभेत आम्ही श्रोतेच का ?
प्रत्येक युद्धात आम्ही सैनिकच का ?
पोरं विचारताहेत
प्रत्येक समारंभानंतर पाठीवर थाप
प्रत्येक युद्धानंतर छातीवर पदक
ह्याशिवाय तुम्हीं दिलेत काय ?

पोरं विचारताहेत
आमच्या आयाबहिणींची इज्जत
दिवसाढवळ्या का लुटता ?
आमच्या गर्भारशी आईला शेतात का राबवता ?
पोरं विचारताहेत
आम्हाला पोटभर भाकरी का नाही ?
आमची बच्छडी औषधाविना तडफडून का मरतात ?
खरे आहे, खरे आहे
ह्या प्रश्नांची उत्तर तुम्हाला परवडणारी नाहीयेत !
फक्त येवढेच सांगतो
सावध रहा !

आज पोरं फक्त तोंडानीच प्रश्न विचारताहेत
उद्याच्या समारंभात, मेळाव्यात, परिषदेत
आणि युद्धात
पोरं समोर उभी राहतील ती हाती शस्त्र घेऊन
जाब विचारतील ती
कष्टातून घडलेल्या कणखर हातांनी
म्हणून म्हणतो सावध रहा
संगिनीला धार लावून ठेवा
ह्यापुढचे प्रत्येक समारंभ, परिषदा आणि मेळावे
निर्णायक आहेत
ह्यानंतरचे प्रत्येक युद्ध
निर्णायक युद्ध असणारच !

—अशोक मनोहर

# सोलकढी

## □ मी सर्कसवादी आहे

सर्कससारखी अद्वितीय-अद्भुत गोष्ट ज्यांना आवडत नाही अशा (कपाळकरंट्या) माणसांत दोन प्रकार असतात. एक प्रकार भूतदयावाद्यांचा: सर्कशीत मुक्याबिचाऱ्या जनावरांकडून, त्यांच्या निसर्गसिद्ध प्रकृतीला न शोभेशी कामे करून घेतली जातात; याने जनावरांच्या अस्मितेची अवहेलना होते, असे त्यांना वाटते. दुसरा प्रकार कलावाद्यांचा: शारीर हालचाली हे सर्कसचे माध्यम; त्यांच्यामुळे पाहणाऱ्याला करमणुकीच्या पातळीवरचा स्थूल आनंद होतो; त्याचे आणि कलेपासून होणाऱ्या आनंदाचे स्वरूप मूलतः वेगळेच आहे, असे त्यांना वाटते. मी आपला सरसकट सर्कसवादी आहे : भूतदयावाद आणि कलावाद मला परवडण्यासारखे नाहीत. सर्कस आवडणारे आणि सर्कस फार आवडणारे असे जे सर्कसवाद्यांचे दोन प्रकार असतात त्यातल्यासुद्धा दुसऱ्या प्रकारात माझी गणना करावी लागेल.

वर्षसहा महिन्यांच्या अंतराने शहरात सर्कशींचा मुक्काम पडतो. हां, ती एक गंमतच आहे : एकापेक्षा अधिक सर्कशी, अगदी बरोबर एकच वेळ साधून, का येतात, हे मला कधी कळलेले नाही. वास्तविक एका वेळी एकच सर्कस येईल तर तिला स्पर्धारहित एकमेवत्वमुळे चिमटीच्या जागी मुठीचे उत्पन्न होईल. अर्थात दोन वा अधिक सर्कशी शहरात असल्या तर त्या दोन्ही वा अधिक पाहणारे आमच्यासारखे काही नादिष्ट असतातच. दोन सर्कशींमध्ये फारसा फरक नसला तरी एका सर्कसप्रयोगात जे चित्रविचित्र वैविध्य असते ते अन्य कोठेही आढळू शकत नाही आणि कोणत्याही सर्कसमधले ते रम्याद्भुत आणि चित्तथरारक वातावरण : सर्कस म्हणजे ते वातावरण. तसे वातावरण दुसरीकडे कोठेही आढळणार नाही. माझ्यासारख्या बहुकार्यव्यग्र माणसाला सतत वाटणाऱ्या सर्कसोशीचे कारण हे वातावरण. त्या वातावरणाचे चित्रण करणारी 'वाघ-सिंह माझे सखेसोबती.' सारखी पुस्तके मी आवडीने वाचतो; 'द ग्रेटेस्ट शो ऑन द अर्थ,' 'द ट्रॅपीझ'-सारखे चित्रपट अतीव उत्साहाने पाहतो.

पण ते वातावरण निर्माण करायचे काम बहुत खर्चाचे असते. त्यामुळे बहुतेक सर्कसमालकांचे वरून झगमगणारे कपडे आतून नको तेवढे विटलेले असतात. नवल असे वर्तले आहे की आपल्या सरकारच्या ध्यानात ही गोष्ट आली आहे. (केवळ यासाठी देखील सत्ताधारी पक्षाला एक वेळ माझे मोलाचे मत द्यायला माझी तयारी आहे. जाहिरात या गोष्टीची करायची सोडून ते 'दरबारी विदूषक' तेरा कलमी नरोरा-कार्यक्रमाची जाहिरात करून राहिले आहेत. सर्कसमधले विदूषक असली चूक सहसा करत नाहीत.) केंद्रवर्ती सरकारने राज्यसरकारांना, सर्कसदारांना सगळ्या सोयीसवलती उपलब्ध करून द्यायला सांगितले आहे. (करमणूककर रद्द करणे, सर्कसतंबू उभारण्यासाठी नाममात्र भाड्याने जागा मिळवून देणे) कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी खास उपाययोजना करणे, आवश्यक त्या अन्नधान्याचा नियमित पुरवठा करणे, असल्या अश्रुतपूर्व गोष्टी त्यात आहेत. केंद्र सरकार सर्कसबी माणसांच्या आणि मालाच्या वाहतुकीसाठी रेल्वेसेवा सवलतीच्या दरात उपलब्ध करून देणार आहे. (हे वाचल्यावर, त्या टोबी टायलरप्रमाणे—ओटिस नावाच्या लेखकाने सर्कसच्या वातावरणावर लिहिलेल्या हृदयंगम कथेचा नायक—आपणसुद्धा पळून सर्कसमध्ये जावे, असे मला वाटू लागलेले आहे.)

सरकारची ही कृती समजूतदार आणि समयोचित आहे. कारण पैशाचे सोंग आणता आणता सर्कसवाल्यांचे ओंफस होत होते. दहा वर्षापूर्वी भारतात चारशेऐंशी सर्कशी होत्या. पाच वर्षापूर्वी त्यांची संख्या दोनशेवर आली.

हे बरे नव्हे. नष्ट होऊ घातलेली प्राण्यांची, पक्ष्यांची, माणसांची जात जपावी तशी करमणुकीची ही जात आपण जपायला हवी. सरकारने आणि जनतेने एकोप्याने एखादी गोष्ट केल्याने लोकशाहीवर जे संकट कोसळेल त्याला आपण धैर्याने तोंड द्यायला हवे.

—अनंतराव



गुजरातेतून । चंद्रशेखर

# नवनिर्माणवाले व जनतामोर्चावाले यांच्यातील सामना

टाइम्सने ज्या दिवसाचे वर्णन 'डार्क डे' असे केले त्या दिवशी म्हणजे बारा जूनला, अहमदाबादमध्ये व नवी दिल्लीमध्ये काँग्रेस पक्षाला एकाच वेळी जबरदस्त तडाखा बसला. अलाहाबाद हायकोर्टाच्या निकालामुळे वातावरणात निर्माण झालेला औत्सुक्य व अनिश्चितता यांचा ताण दिवस जसजसा चढत गेला तसा वाढत गेला. तीन वाजण्याच्या सुमारास दुपारी, काँग्रेसचे बरेच उमेदवार प्रतिस्पर्ध्यांच्या मागे आहेत हे स्पष्ट झाले होते. जुने सचिवालय व एल. डी. कॉलेज (जेथे मतमोजणी चालू होती) या ठिकाणी हजारोंचा जमाव कोण पुढे आहे, कोण मागे आहे याची एक्सायटेडली चर्चा करीत होता. विजयी उमेदवारांची खांद्यावरून मिरवणूक निघत होती. गुलालाने वातावरण भरून गेले होते. सर्वांत जास्त जल्लोश झाला तो जनता मोर्चा-पुरस्कृत अपक्ष उमेदवार राजकुमार गुप्ता हे काळूपूर मतदारसंघातून विजयी घोषित झाले तेव्हां! गुप्ता हे अक्षरशः वीस-बाविशीचे तरुण विद्यार्थी-नेते आहेत. त्यांनी काँग्रेसचे एक माजी मंत्री व सध्याचे प्रदेश काँग्रेसचे चिटणीस प्रबोध रावळ यांचा पराभव केला. संध्याकाळपर्यंत काँग्रेस पक्षाची सर्वत्र मोठी पीछेहाट झाल्याच्या बातम्या आल्या. प्रदेश काँग्रेस कार्यालयावर अवकळा पसरली. सरदारभवन या जनता मोर्चाच्या मुख्य ठाण्यावर धमाल सुरू झाली. रात्रीपर्यंत हे स्पष्ट झाले की काँग्रेस सत्तेवर येत नाही. जनतामोर्चाच्या विजयाने सर्वसामान्य माणूस उत्तेजित व आनंदित झालेला दिसला. या निवडणुकीत जनतेची सेंटिमेंट फार हेलावत होती. निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा, मागील वर्षातील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जनतामोर्चा यशस्वी होईल असे वाटत होते. मग इंदिरा गांधींनी केलेला जबरदस्त प्रचार पाहून सर्वांना वाटू लागले की काँग्रेस यशस्वी होईल. प्रत्यक्ष मतदान होऊन गेल्यावर पुन्हा असे वाटू लागले की जनता मोर्चा व काँग्रेस समसमान राहतील. प्रत्यक्ष निकाल आता सर्वांसमोर आहेत. कोणाही पक्षाला निर्विवाद बहुमत न मिळाल्याने गुजरातमधील अनिश्चिततेचे वातावरण कायमच राहणार असे म्हणण्यास हरकत नाही.

निवडणुकीतील तीन प्रमुख स्पर्धक काँग्रेस, जनतामोर्चा व किमलोप यांच्या यशापयशाबद्दल वेगवेगळी मते आहेत. सत्ता प्राप्त न झाल्याने काँग्रेसगोटात निराशा पसरली असली तरी सर्वसाधारण भावना अशी आहे की काँग्रेसला ७५ जागा मिळाल्या हे देखील विशेष आहे. येथील काँग्रेस नेतृत्वाची जनतेत अजिबात पत नाही. या ज्या जागा मिळाल्या त्या इंदिरा गांधींचा प्रभाव व ट्रॅडिशनल काँग्रेस व्होट यामुळे मिळाल्या असे एक मत आहे. माझे मत मात्र असे की काँग्रेसचा या निवडणुकीतील परफॉर्मन्स म्हणजे अपयशच म्हटले पाहिजे. केवळ सत्ता मिळाली नाही म्हणून मी हे मूल्यमापन करीत नाही. काँग्रेसची प्रचारमोहीम जनता मोर्चापेक्षा जास्त सुसूत्र, बांधीव व भरीव होती. त्यांच्या उमेदवारांविरुद्ध (ते सत्तेवर नसल्यामुळे) करता येण्याजोगे आरोपही फार नव्हते. तरुण व स्वच्छ उमेदवारांचे प्रमाण नेहमीपेक्षा जास्त होते. या साऱ्याच्या जोडीला इंदिरा गांधींचा प्रचारही काँग्रेसच्या मदतीला होता. असे असूनही मतदारांनी काँग्रेसला स्पष्टपणे नाकारले ही वस्तुस्थिती आहे. हा निर्णय करताना मतदारांनी देशातील काँग्रेस राजवटीचे टोटल चित्र नजरेसमोर ठेवले असावे असे वाटते. काँग्रेसची वाचाळ आश्वासने व कारभार यातील अंतर, महागाई, बेकारी, सत्तेतून उद्भवणारी काँग्रेसची बेपर्वा वृत्ती या साऱ्यांचा मतदारांवर अॅडव्हर्स परिणाम झाला.

अँटि-काँग्रेस फीलिंग येथे पावलापावलाला जाणवते. त्याचाच आविष्कार निवडणूकनिकालात दिसून आला. इतर राज्यांतही हे फीलिंग असते; पण निवडणुकीच्या वेळी मते मात्र काँग्रेसलाच मिळतात. गुजरातमध्ये तसे झाले नाही हे गुजरातचे वैशिष्ट्य.

जनता-मोर्चाचे यशापयश जोखताना जरा व्यापक विचार केला पाहिजे. सुरुवातीस हा मोर्चा म्हणजे निवडणुकीपुरता केलेला समझोता आहे अशी भावना होती. मोर्चाकडे मनुष्यबळ कमी होते. अव्वल दर्जाचे नेते प्रचारासाठी नव्हते. त्यामुळे एक तात्पुरता निवडणूकपवित्रा एवढ्याच दृष्टीने लोक मोर्चाकडे पाहत होते. निवडणूक जसजशी जवळ येऊ लागली तसतसे लोकांना जाणवू लागले की, मोर्चाची बांधणी अधिक पक्क्या पायावर झाली आहे. मोर्चातील पक्षांनी आपली आयडेंटिटी अगदी बाजूला सारली होती व 'मोर्चा' हे इमेज जास्त प्रोजेक्ट केले. हितेन्द्र देसाई हे मोर्चाच्या रचनेच्या विरुद्ध होते. पण त्यांनीही प्रत्यक्ष मतदान होईपर्यंत स्पष्ट विसंवादी सूर काढला नाही. मोर्चाच्या आवाहनात एक प्रकारचा साधेपणा, कळकळ हे नक्कीच होते. एका बलाढ्य पक्षाबरोबर एक नवीन राजकीय प्रेरणा लढत देत आहे असे चित्र तयार झाले.

मोरारजी देसाई यांनी इंदिरा गांधींच्या बरोबरीने प्रचार केला. त्यांच्या सभांना बऱ्यापैकी गर्दी असे. त्यांच्या प्रचाराचे वैशिष्ट्य म्हणजे ते काँग्रेस–निंदेमध्ये फार वेळ घालवीत नसत. मोर्चाची भूमिका पक्केपणाने, सरळपणाने ते लोकांसमोर ठेवीत. काँग्रेसवर शरसंधान करण्याची कामगिरी त्यांनी वाजपेयी, फर्नांडिस, पिलू मोदी वगैरे नेत्यांवर सोपविली होती. मोरारजी यांचा 'लो की' प्रचार गुजरातच्या परंपरानिष्ठ जनतेस मानवला असावा. 'जनता मोर्चा'चा प्रमुख फायदा असा झाला की, संस्था काँग्रेस, जनसंघ, समाजवादी पक्ष व भालोद यांची जुनी आयडेंटिटी पुसली जाऊन एक नवी

पूर्वग्रहरहित अशी आयडेंटिटी विरोधकांना प्राप्त झाली. असे यापूर्वीच्या निवडणूक–आघाडयांच्या वेळी घडले नव्हते. त्या दृष्टीने 'जनता मोर्चा' हे एक नवेच राजकीय 'साधन' ठरू शकेल. हा प्रयोग करून पाहण्यासारखा व फलदायी ठरतो असे गुजरात निवडणुकीने सिद्ध झाले आहे. राष्ट्रीय पातळीवर हा प्रयोग करून पाहण्यात अर्थातच काही अडचणी आहेत. विरोधी नेते या अडचणी कशा दूर करतात हे लौकरच दिसेल. जयप्रकाश नारायण यांनी गुजरात-मध्ये मोर्चाला अधिक साथ दिली असती तर त्याला निर्विवाद बहुमत मिळणे अशक्य नव्हते.

सर्वांत आश्चर्यजनक परफॉर्मन्स चिमण-भाई पटेल यांच्या किसान-मजदूर लोकपक्षाचा आहे. चिमणभाईंचा स्वतःचा पराभव झाला असला तरी त्यांच्या पक्षाला १३ जागा मिळाव्यात हे नवल वाटते. चिमणभाईएवढी जाहीर मानहानी व विटंबना दुसऱ्या कोणत्याही राजकीय नेत्याची क्वचितच झाली असेल. तरी हे गृहस्थ एक पक्ष स्थापन करतात, त्यास काही पाठिंबा मिळतो व निवडणुकीत १३ जागा मिळतात हे नव-निर्माणच्या पार्श्वभूमीवर स्पष्टीकरणाच्या पलीकडचे वाटते. किमलोपचा कार्यक्रमही तसा प्रतिगामी व सधन ग्रामीणधार्जिणा आहे. किमलोपच्या या यशामुळे गुजरात निवडणूक निकालांचे काही रॅशनल स्पष्टी-करण करणे कठीण वाटते. अपेक्षेप्रमाणे चिमणभाईंच्या हातात गुजरातच्या राज-कारणाच्या किल्ल्या गेल्या आहेत. त्यांचा ते पुरेपूर फायदा उठवतील यात काही शंका नाही.

जनता मोर्चा सरकार बनविण्याच्या दृष्टीने किमलोपकडे आशेने पहात असता चिमण-भाईंनी प्रथम ताठर भूमिका स्वीकारली. 'मी भ्रष्टाचारी नाही' असे मोरारजी देसाईंनी जाहीर शिफारसपत्र मला दिल्या-शिवाय कसलीही बोलणी नाहीत आणि पाठिंबा नाही.' अशी गर्जना चिमणभाईंनी केली. हे अर्थातच शक्य नव्हते. १७ जूनला किमलोपनं जनता-मोर्चाला बिनशर्त पाठिंबा दिल्याचे जाहीर झाले आणि सर्वांना आश्चर्य वाटले. गुजरातच्या हिताच्या दृष्टीने व गुज-रातला राष्ट्रपती–शासनापासून वाचवण्या-साठी किमलोपने हा निर्णय घेतला असे पटेल यांनी सांगितलं. कसेही असो आता गुजरात काँग्रेसेतर राजवटीखाली गेला एवढे खरे.

जनता–मोर्चाने किमलोपचे सहकार्य घेत-ल्याने त्याच्यावर टीकेचा भडिमार सुरू झाला आहे. माधवभाई सोळंकी यांनी असा आरोप केला की, मोर्चा व किमलोप यांच्यात निवड-णुकीपूर्वीच गुप्त समझोता झाला होता हे यावरून स्पष्ट होते. जनतेला स्वच्छ कारभार मिळणे शक्य नाही असाही गळा सोळंकी यांनी काढला आहे. जनता–मोर्चा सत्तेच्या मागे होता हेच सिद्ध होते वगैरे सोळंकीकृत भाष्य वाचण्यात निराळीच मझा आहे. विरोधकांचे काम विरोध करणे या सूत्रा-नुसार सोळंकींची प्रतिक्रिया झाली व जनता-मोर्चा तिकडे विशेष लक्ष देईल असे वाटत नाही.

पण नवनिर्माण नेत्यांच्या प्रतिक्रियेस मोर्चाला महत्त्व द्यावेच लागेल. मोर्चा–किमलोप युतीबद्दल नवनिर्माण नेत्यांनी अत्यंत प्रखर व कडवट हल्ला चढवला आहे. हा हल्ला केवळ शाब्दिक राहणार नाही तर प्रत्यक्ष चळवळीचे रूपाने मोर्चा–सरकारला आव्हान देण्यात येईल असे दिसते. नवनिर्माण नेत्यांची ही प्रतिक्रिया दुर्दैवी आहे. एवढा निवडणुकांचा सोपस्कार केल्यावर कोणी तरी सरकार बनविणे आवश्यक ठरते. जनता मोर्चाने किमलोपचे सहाय्य घेतले (दुसरा काही मार्गच नव्हता) म्हणून बिथरून जाऊन आततायीपणा करण्यात काय अर्थ आहे? मोर्चा-सरकारला सहा महिने तरी मुदत नवनिर्माण नेत्यांनी देणे आवश्यक आहे.

लाचलुचपत हा प्रश्न काही असा एका दिवसात मिटणारा नव्हे. किमलोप सध्या तरी सरकारात येणार नाही. म्हणून नवनिर्माण नेत्यांनी उगाच त्रागा करू नये. मोर्चा-सरकार बडतर्फ करण्याची इंदिरा गांधी अगदी वाट पाहत असणार. थोडेही निमित्त मिळाले (व चळवळीने ते मिळेल) की त्या राष्ट्र-पती–शासन लागू करतील.

देशभर काँग्रेसची सत्ता इतकी बेपर्वा, जनताविन्मुख व भ्रष्ट झाली आहे की एखाद्या राज्यात बिगर काँग्रेसशासनाचा प्रयोग होत असल्यास, त्याला थोडे झुकते माप दिले पाहिजे. असे केल्याखेरीज विरोधकांना संधी मिळणार नाही. असा काही विवेक येथील नवनिर्माण व अन्य विरोधकांनी केला तरच मोर्चा–सरकारला थोडा अवधि मिळेल. नपेक्षा गुजरातमध्ये पुन्हा राजकीय अस्थिरता, दंगाधोपा व अखेरीस राष्ट्रपती–शासनाचा बडगा अनुभवावा लागेल. मोर्चा–सरकारचे नेते वेगळे असले तरी खरी सूत्रे मोरारजींच्या हातीच राहणार. असे हे मोरारजी व मोर्चा–सरकारला 'बिनशर्त' पाठिंबा देणारे चिमण-भाई पटेल यांच्यातील बुद्धिबळाचा सामना असे स्वरूप येते काही दिवस गुजरातच्या राजकारणाचे राहील. हा सामना रंगतो की नवनिर्माणवाले सगळा पटच उधळून लावतात हे लौकरच दिसेल. □ □

बॉम्बे डाईंग
एकमेव वितरक
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस

# इंदिरा गांधी

## दुहेरी पराभवाचा हादरा

**वा. दा. रानडे**

बारा जून १९७५ हा दिवस पंतप्रधान श्रीमती गांधींच्या दृष्टीने दुहेरी पराभवाचा ठरला. अलाहाबाद हायकोर्टाने त्यांच्याविरुद्ध निकाल देऊन रायबरेली मतदार संघातून लोकसभेवर झालेली त्यांची निवडणूक रद्द ठरविली आणि गुजरात विधानसभेच्या निवडणुकात त्यांच्या पक्षाने नामुष्कीची हार खाल्ली. या दोन्ही घटना देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम घडविणाऱ्या असल्या तरी अलाहाबाद हायकोर्टाच्या निकालाने श्रीमती गांधींच्या नेतृत्वाला आणि सत्तारूढ पक्षाला मोठा हादरा बसला आहे.

निकालपत्राचा विस्तृत वृत्तांत दैनिक वृत्तपत्रातून येऊन गेला असल्याने त्याची येथे पुनरुक्ति करीत नाही. या निकालातून उपस्थित होणाऱ्या मूलभूत व महत्त्वाच्या प्रश्नांना श्रीमती गांधी व त्यांचा सत्तारूढ पक्ष कसे उत्तर देतो यावरच त्याचे भवितव्य ठरणार आहे. निकालावरील त्यांच्या प्रतिक्रियेवरून मुख्य प्रश्नाला बगल देण्याचाच त्यांचा पद्धतशीर प्रयत्न दिसत आहे. वास्तविक निकाल जाहीर झाल्याबरोबर आपण होऊन राजिनामा देणे हे श्रीमती इंदिरा गांधींचे नैतिक कर्तव्य होते. पंतप्रधानपदासारख्या सर्वश्रेष्ठ अधिकारपदी असलेल्या व्यक्तीचे चारित्र्य संशयातीत असले पाहिजे. अलाहाबाद हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध श्रीमती गांधींनी अपील केले आहे. त्याचा काय निकाल लागावयाचा तो लागेल; पण तोपर्यंत त्यांनी पंतप्रधानपदी रहावयास नको होते. पंडित नेहरू आणि लालबहादुर शास्त्री यांच्या बाबतीत कोर्टाने असाच निकाल दिला असता तर ते असेच वागले असते काय हा विचार मनात आल्याशिवाय रहात नाही. शास्त्रीजी रेल्वेमंत्री असताना दोन मोठे रेल्वेअपघात झाले होते. त्यांची जबाबदारी स्वीकारून शास्त्रीजींनी त्या वेळी रेल्वेमंत्रीपदाचा राजिनामा दिला होता. नैतिकतेचा असा थोर आदर्श श्रीमती गांधींना आपल्या राजिनाम्याने देशापुढे ठेवता आला असता.

अलाहाबाद हायकोर्टाच्या निकालाने श्रीमती गांधींची प्रतिमा डागळली आहे. ती उजळण्याचा प्रयत्न त्यांचे सहकारी व भाट करीत आहेत. पंतप्रधानांच्या नेतृत्वावर आमचा विश्वास आहे. देशाच्या नेतेपदी त्या आम्हाला हव्या आहेत, अशी पत्रके केंद्रीय मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांनी काढली. निरनिराळ्या राज्यांचे मुख्य मंत्री, काँग्रेसचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी अशीच भावना व्यक्त केली. श्रीमती गांधींच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करण्यासाठी राज्यविधिमंडळ, काँग्रेसपक्ष व प्रदेश काँग्रेसच्या खास बैठका बोलावण्यात आल्या. संसदीय काँग्रेस पक्षाचीही सभा झाली. कोर्टाचा निकाल आपल्याविरुद्ध लागला असला तरी त्याचा अर्थ देशाचे नेतृत्व आपण गमावलेले नाही. देशातील जनतेचा आपल्यावर पूर्वीसारखाच विश्वास आहे अशी प्रतिमा जगात आपल्याबद्दल निर्माण करण्याचा इंदिरा गांधींचा प्रयत्न आहे. त्यासाठीच ही निदर्शने, पत्रके, विश्वाससभा यांची पद्धतशीर आखणी होत आहे. पण हा सारा सत्तारूढ पक्षाचा खटाटोप आहे; त्या पक्षाव्यतिरिक्त आणि कम्युनिस्टांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही पक्षाच्या नेत्याने इंदिरा गांधी देशाच्या नेत्या आहेत, त्यांनी राजिनामा देऊ नये असे म्हटलेले नाही. बॅ. एम. सी. चागला, पंडित कुंझरू यांच्यासारख्या विचारवंतांनी इंदिरा गांधींच्या राजिनाम्याचीच मागणी केली आहे.

आणि इंदिरा गांधींवरील विश्वासाचा प्रश्न उपस्थित करून मुख्य मुद्द्याला बगल देण्यात येत आहे. अलाहाबाद हायकोर्टाच्या निकालाने उपस्थित केलेला मुख्य प्रश्न निवडणुकीतील भ्रष्टाचाराचा आणि तोही पंतप्रधानासारख्या सर्वश्रेष्ठ अधिकारपदी असलेल्या व्यक्तीकडून घडलेल्या भ्रष्टाचाराचा आहे. त्याबद्दल एक शब्द ही मंडळी बोलत नाहीत. श्रीमती गांधींनी कोर्टाच्या एका मुद्द्याबाबत आपली बाजू विशद केली आहे. रायबरेलीमधील आपल्या निवडणूकसभांसाठी राज्यसरकारच्या अधिकाऱ्यांनी व्यासपीठे उभारली; पण त्या वेळी सरकार संयुक्त विधायक दलाचे होते, काँग्रेसचे नव्हते असे त्यांचे म्हणणे; पण पंतप्रधानांच्या निवडणूकसभांसाठी राज्यसरकारच्या अधिकाऱ्यांनी व्यवस्था केली पाहिजे. मग राज्यसरकार कोणत्याही पक्षाचे असो, अशी जी सरकारी अधिकाऱ्यांची समजूत झाली आहे तिला जबाबदार कोण? पंडित नेहरूंच्या वेळेपासून ही प्रथा चालत आलेली आहे असे म्हटले जाते; पण हे खरे नाही. पंतप्रधानांच्या सभांचे वेळी सुरक्षाव्यवस्था करण्याबाबत अधिकाऱ्यांना गुप्त सूचना देणारे जे पुस्तक (ब्ल्यूबुक) आहे त्यातील सूचनांतून १९६९ पूर्वी निवडणूकसभा वगळण्यात आल्या होत्या. याकडे अलाहाबाद हायकोर्टाचे न्या. सिन्हा यांनी आपल्या निकालपत्रात लक्ष वेधले आहे. इंदिरा गांधींच्या काळातच ही प्रथा रूढ झालेली आहे असाच याचा उघड अर्थ होतो.

निवडणुकीतील भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी परिणामकारक उपाय योजण्याचा व त्यासाठी निवडणूककायद्यात दुरुस्ती करण्याचा सरकारचा विचार आहे का? पंतप्रधान आणि त्यांच्या सहकाऱ्यांपैकी कोणीही यासंबंधी काही बोललेले नाही. लोकसभा निवडणुकीपूर्वी निवडणूकपद्धतीत सुधारणा अंमलात येण्याची शक्यता दिसत नाही.

पंतप्रधान श्रीमती गांधींच्या जागी दुसरा नेता निवडण्यास अवधी हवा म्हणून निकालाची बजावणी स्थगित ठेवावी असा अर्ज इंदिरा गांधींच्या वकिलाने अलाहाबाद हायकोर्टाकडे केला व तो मान्य करून कोर्टाने वीस दिवसांची स्थगिती दिली; पण दरम्यानच्या काळात दुसरा नेता निवडण्याच्या दृष्टीने सत्तारूढ पक्षाने कोणत्या हालचाली केल्या? इंदिरा गांधी याच आमच्या नेत्या आहेत व राहतील असा ठराव काँग्रेस पक्षाने सर्व पातळींवर पास करून घेतला. आम्ही दुसरा नेता निवडण्याचा प्रयत्न केला पण इंदिरा गांधींशिवाय दुसऱ्या कोणाला नेता निवडायलाच सभासद तयार नाहीत असे भासविण्याचा हा प्रयत्न आहे. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचा प्रश्न आणि त्या पंतप्रधानपदी असण्याचा प्रश्न यांची गल्लत

करण्यात आली. पंडित नेहरूंच्या काळापासून देशाचे नेतेपद आणि पंतप्रधानपद एकाच व्यक्तीकडे ठेवण्याची चूक आपण केली त्याचाच हा परिणाम आहे. नेहरूंनी काही काळ निवृत्त होण्याचा विचार बोलून दाखविला होता त्या वेळीही पक्षात खळबळ माजली होती. नेहरूच आम्हाला पंतप्रधानपदी हवेत अशा तारा व पत्रे त्यांना देशाच्या सर्व भागांतून गेली होती; पण इंदिरा गांधीवर विश्वास व्यक्त करणाऱ्या जशा हुकमी सभा व मेळावे गेल्या काही दिवसांत भरविण्यात आले तसे त्या वेळी घडले नव्हते. दोन नेत्यांच्या नेतृत्वपद्धतीतील हा फरक आहे. इंदिरा गांधींवर विश्वास व्यक्त करण्यासाठी झालेल्या सभांतून त्यांच्या कामगिरीची स्तुती करण्यासाठी गौरवपर शब्दांची स्पर्धा लागली.

श्रीमती गांधींनी राजिनामा दिला असता तर असे काय आकाश कोसळले असते? पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारून पक्षावर आणि सरकारवर त्या यापुढेहि नियंत्रण ठेवू शकल्या असत्या. आपल्या जागी दुसरा पंतप्रधान निवडण्यास त्यांनी पक्षाला सांगितले असते तरी तो पंतप्रधान महत्त्वाच्या धोरणांचे बाबतीत इंदिरा गांधींविरुद्ध जाऊ शकला नसता. कारण इंदिरा गांधींवरच त्याचे पंतप्रधानपद अवलंबून रहाणार होते. राज्यांचे मुख्य मंत्री जसे त्यांनी बदलले तसे पंतप्रधानहि त्या बदलू शकल्या असत्या. असे घडले नाही याचे कारण पंतप्रधानपद हेच आपल्याकडे खरे नेतेपद मानले जाते. पंतप्रधानपद गेल्यावर आपणास कोणी मानणार नाही, आपल्या शब्दास पूर्वीसारखे वजन राहणार नाही असे वाटून राजिनामा न देता पंतप्रधानपदी राहण्याचा त्यांनी निर्णय घेतला असावा असे दिसते.

सुप्रीम कोर्टाचा निर्णय विरुद्ध गला तर काय हा प्रश्न अजून अनिर्णितच आहे. सुप्रीम कोर्टानेहि निवडणूक रद्द केली तर अपात्रता रद्द करण्याचा अधिकार मुख्य निवडणूक कमिशनरांना आहे. मुख्य निवडणूककमिशनर स्वामिनाथन यांनी स्वतःच हे सांगितले. त्यांनी हे निवेदन या वेळीच करण्याची काय आवश्यकता होती? सध्याच्या कायद्याने त्यांना हा अधिकार असला तरी कोर्टात त्या तरतुदीस हरकत घेतली जाईल; पण मुळात ही तरतूद पास झाली त्या वेळी त्यातील अन्याय विरोधी पक्षातील जागरूक खासदारांच्या लक्षात कसा आला नाही याचे आश्चर्य वाटते. ते काहीहि असले तरी या कलमाचा आधार घेऊन इंदिरा गांधींनी पंतप्रधानपदावर राहण्याचा प्रयत्न केला तर त्या पंतप्रधानपदी राहतीलही; पण त्यांची सारी शान जाईल.

## गुजरातचा कौल

गुजरात-निवडणुका ही देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी दुसरी महत्त्वाची घटना. सत्तारूढ कॉंग्रेसने या निवडणुका जिंकण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. अमाप पैसा खर्च केला. पंतप्रधान श्रीमती गांधींनी अकरा दिवस दौरा काढून जवळजवळ प्रत्येक मतदारसंघात भाषण केले. पण एवढी सारी धडपड करून कॉंग्रेस १८२ पैकी अवघ्या ७५ जागा जिंकू शकली. तिला मतेहि ४०·७९ टक्के मिळाली. गुजरात स्थापनेनंतरच्या चार निवडणुकांत जागा व मते दोन्ही दृष्टींनी कॉंग्रेसची सर्वांत जास्त पीछेहाट या वेळी कशी झाली याची कल्पना पुढील आकडयांवरून येईल.

गुजरात विधानसभा-निवडणुका
कॉंग्रेसला मिळालेल्या जागा व शेकडा मते

| | जागा | शेकडा मते |
|---|---|---|
| १९६२ | ११३ | ४९·६२ |
| १९६७ | ९३ | ४५·७४ |
| १९७२ | १४० | ५०·५६ |
| १९७५ | ७५ | ४०·७९ |

पक्षातील गटबाजी, भ्रष्ट कारभार, जनतेचे निकडीचे प्रश्न सोडविण्याकडे दुर्लक्ष यामुळे कॉंग्रेस राजवटीविरुद्ध असंतोष वाढला होता. कॉंग्रेसच स्थिर सरकार देईल या इंदिरा गांधींच्या युक्तिवादाचा काहीहि प्रभाव पडला नाही. कारण प्रचंड बहुमत मिळवूनहि अंतर्गत गटबाजीमुळे कॉंग्रेस स्थिर सरकार देऊ शकली नाही हा अनुभव लोकांपुढे ताजा होता; पण एवढी सारी कारणे असूनही विरोधी पक्षांची एकजूट नसती तर कॉंग्रेसचा पराभव झाला नसता. आदिवासी, हरिजन, मुस्लीम हे आता कॉंग्रेसचे हुकमी मतदार राहिलेले नाहीत हे या निवडणुकीने दाखवून दिले. कॉंग्रेसला १९७२ पेक्षा आदिवासींच्या चार जागा कमी मिळाल्या. हरिजनांच्या जागा तिने १२ पैकी ६ म्हणजे निम्म्या गमावल्या. मुस्लीम मतदार जास्त असलेल्या काही जागा आपण निश्चित जिंकू हा तिचा आशावादहि भ्रामक ठरला. चिमणभाई पटेलांचा किसान-मजदूर लोकपक्ष जनता आघाडीच्या जागा खाईल हा तिचा आडाखाहि चुकला. किमलोपने बरीचशी कॉंग्रेसचीच मते खाल्ली, असे असले तरी गुजरातेत कॉंग्रेस संपली असे मानणे चुकीचे होईल. पक्षवार विचार करता जागा व मते या दोन्ही दृष्टींनी अजून तोच सर्वांत मोठा पक्ष आहे.

संघटना कॉंग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल, समाजवादी आणि राष्ट्रीय मजदूर पक्ष या पाच पक्षांच्या जनता आघाडीने ८६ जागा मिळविल्या; पण निर्णायक बहुमत तिला मिळू शकले नाही व अखेर किमलोप आणि काही अपक्ष यांच्या पाठिंब्याने तिला सरकार बनवावे लागले. या तिच्या यशाच्या मर्यादाही लक्षात घेतल्या पाहिजेत. आघाडी झाली खरी पण ती कितपत टिकेल अशी शंका जनतेच्या मनात होती. निर्णायक बहुमत न मिळण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. जनता आघाडीची तुलना १९७१ च्या लोकसभा निवडणुकीतील बडया आघाडीशी केली जात होती; पण बडया आघाडीस त्या वेळी जेवढी मते मिळाली तेवढी काही जनता आघाडी मिळवू शकली नाही. बड्या आघाडीस १९६१ मध्ये ४७ टक्के मते मिळाली होती. जनता आघाडीस ३९·३९ म्हणजे कॉंग्रेसपेक्षा थोडी कमीच मते मिळाली. जनता आघाडीतील पक्षांना आघाडीमुळे १९७२ पेक्षा बऱ्याच जागा जास्त मिळाल्या, पण, घटकपक्षांची पक्षवार मते पाहिली तर १९७२ च्या स्थितीत फारसा फरक पडलेला नाही. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत संघटना कॉंग्रेसने ३९·७० टक्के मते मिळविली होती. पण १९७२ साली ही मते २३·७० टक्क्यापर्यंत खाली आली. ती १९७५ मध्ये तेवढ्यावरच राहिली. आघाडी असो किंवा नसो, संघटना कॉंग्रेसचे बळ १९७१ नंतर जे घटले ते तिला पुनः वाढविता आलेले नाही.

जनता आघाडी मुख्यतः उजव्या पक्षाची आघाडी आहे. डाव्यांपैकी एकटा समाजवादी पक्ष त्यांच्यात आहे; पण त्याचे गुजरातेत आता काही वजन राहिलेले नाही. आघाडीच्या धोरणावर तो प्रभाव पाडू शकणार नाही. किमलोपच्या पाठिंब्यावर आघाडीचे बहुमत अवलंबून असल्याने सत्ता टिकवायची तर त्या पक्षाच्या हितसंबंधांना बाधक असा कार्यक्रम सरकार हाती घेऊ शकणार नाही. कॉंग्रेसपेक्षा अधिक स्वच्छ कारभार मिळावा एवढीच किमान अपेक्षा या आघाडीकडून करता येईल; पण जनता आघाडीच्या यशाने अशा आघाडया आता लोकसभा निवडणुकीत करण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष करतील. गुजराथमधील पराभवाने कॉंग्रेसला लोकसभा निवडणुका जिंकणे अधिक कठीण जाईल. □

# श्री. शंकरराव ( चुटके ) पाटील यांचे ( सं ) भाषण

सुप्रसिद्ध सहकारमहर्षी, माजी आमदार आणि महाराष्ट्र राज्य सहकारी साखरकारखाना महासंघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. शंकरराव मोहिते पाटील यांनी निफाड सहकारी साखर कारखान्याला नुकतीच भेट दिली. त्यांनी त्यावेळी शेतकरी मेळाव्यात केलेले हे भाषण ( की संभाषण ! ) काडीचाही फरक न करता जसेच्या तसे–

**रघुवीर मुळे**

खरं म्हणजे माझी ओळख करून द्यायला एवढा वेळ घ्यायचं काहीच कारण नाही. पत्रकारांनी मला चांगलंच प्रकाशात ठेवलेलं आहे. 'लक्षभोजनफेम शंकरराव मोहिते' एवढी ओळख आता पुरेशी ठरते. खरं म्हणजे मी जे लक्षभोजन घातलं त्यात कायद्याचं कुठंही उल्लंघन मी केलेलं नाही. सत्तेचा गैरफायदाही घेतलेला नाही; पण वृत्तपत्रांत जे आलं ते अतिरंजित होतं. लग्नाच्या वेळी एका विहिरीत चहा होता न् एका विहिरीत कॉफी होती हे छापलं नाही ही पत्रकारांनी एकपरी माझ्यावर मेहेरबानीच केली आहे. त्या वेळी मी दोन्हीही बँकांचा अध्यक्ष होतो. तीन सहकारी साखर कारखान्यांचा व अठरा प्रमुख सहकारी संस्थांचा अध्यक्ष होतो. १९५२ ते १९७२ पर्यंत वीस वर्षं मी आमदार होतो. या काळात मी आमच्या भागात जिथं जिथं गेलो तिथं तिथं लोकांनी मला प्रेम दिलं. जेवायला घातलं. या सगळ्यांचं कोपरापर्यंत ओघळ येईस्तोवर खाल्लं. मग त्याची मी योग्य वेळी परतफेड केली तर चुकलं कुठं ?

लग्नात डझनभर बँड होते असं पेपरवाल्यांनी छापलं. ही माहिती चुकीची आहे. शेकड्यानं बँड होते. बैलपोळ्याच्या दिवशी माझ्या बैलांची जी मिरवणूक निघते त्या बैलांपुढेच तीनशेची वाजंत्री असते. तेव्हा माझ्या मुलाच्या लग्नाच्या मिरवणुकीत पुढं किती बँड-वाजंत्र्या असतील याचा तुम्हीच (पत्रकारांकडे पाहून) विचार करा. माझ्या मुलाला बड्या बड्या घराण्यातल्या मुली सांगून आल्या. हुंडा म्हणून त्यांनी कोरे चेक माझ्यापुढे टाकले. लागेल तो आकडा टाकून घ्या म्हणायचे; पण मी त्या चेकवाल्यांची मुलगी सून केली नाही. एक पैही हुंडा न घेता सामान्य शेतकऱ्याची मुलगी सून केली. हा आदर्श मात्र पत्रकारांना समजला नाही ! खरं म्हणजे मीच पत्रकारांना या लग्नाला बोलावलं नाही ही माझीच चूक झाली.

सिलिंगबद्दल माझी मते मी जाहीरपणे मांडतो. बागायतदारांचा प्रतिनिधी म्हणून मांडतो. आमची बाजू कोणताही पुढारी मांडीत नाही. सिलिंगवर बोलताना कोणी म्हणतात, १८ एकर ठेवा, कुणी म्हणतात १२ एकर ठेवा तर काही म्हणतात सहा एकर बस्स झाली. मुंबईचे काही शहाणे बॅरिस्टर तर दोन एकरांवर आलेत. जो कमीत कमी आकडा सांगेल तो पुरोगामी ठरतोय् ना. वस्तुतः सरसहा चौपन्न एकर जिरायती जमिनीचे प्रमाण देखील चूकच आहे. जमिनीचा कस, पावसाचं प्रमाण विचारात घ्यायला तडकाफडकी पुरोगामी बनणारे तयार नाहीत. कुठल्याही कुटुंबाला सहा हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्न नको. मग शहरात न् ग्रामीण भागात का फरक करता ? ही काय वचनपूर्ती ? यावर मी एक दृष्टांत सांगतो. मी जपानला गेलो होतो. आमच्या बायकोला घेऊन. जपानला गेलो तरी ड्रेस हाच होता. आम्हाला या ड्रेसमध्ये पाहून तिकडल्या लोकांना कुतूहल वाटायचं. कुठंही गेलो की मंडळी निरखायची न् कॅमेरा सरसावून 'जस्ट मिनिट' म्हणायची. खटका दाबायची न् फोटो घ्यायची. बऱ्याच वेळा असं झाल्यानं आमच्या मित्रालाही लहर आली. तिथं कॅमेरे स्वस्थ मिळतात. त्यानं एक घेतला. फोटो काढण्यासाठी. युक्ती सोपी वाटली त्याला. जस्ट मिनिट म्हणायचं न् खटका दाबायचा, आहे काय त्यात ? समोरून फ्रॉकवाल्या दोन मुली येत होत्या. त्यानं त्यांना जस्ट मिनिट म्हटलं न् खटका दाबला. पण त्या मुलींनी सांगितलं, 'महाराज, ती (लेन्सवरची) कॅप काढायची राहिलीय्.' सिलिंगबाबत नेमकं हेच घडलंय्. शेतकऱ्यांचा स्नॅप मारला. शहरी उत्पादनावरची कॅप तशीच राहिलीय्.

वर काही तरी ठरतं न् मग तसंच खाली पाझरतं. दिल्लीत जे ठरतं तसंच गल्लीपर्यंत येतं. चुकीचं की बरोबर कुणी बोलत नाही. आता एक दृष्टांत सांगतो. खेडेगावच्या एका शाळेत नव्यानंच ड्रिलमास्तर नेमला गेला. पोरांना ड्रिल म्हणजे काय ते माहीतच नव्हतं. मास्तरनं सांगितलं, मी करतो तशी क्रिया करा. मास्तरनं वरती हात केले, पोरांनी केले. मास्तरनं आडवे हात केले, पोरांनी आडवे हात केले. इनमिन पोरं पंधरा होती. मग मास्तर वाकले. एका लाइनीत पोरं उभी होती. वाकल्यावर चौदाव्या मुलाच्या पँटला भोक होतं ते पंधराव्या मुलाला दिसलं. त्यानं 'तिथं' बोट लावलं. चौदाव्यानं तेराव्याच्या 'तिथं' बोट लावलं न् हा कवायतीचाच एक भाग आहे असं वाटून बोट शेवटी सरकत सरकत गुरुजींपर्यंत आलं. तसंच दिल्लीतून गल्लीकडं चाललंय्.

बागायतदार म्हणजे आरोपी, बागायतदार म्हणजे गुन्हेगार हा समज काही पुढारी न् नेते, तज्ज्ञ मंडळी समाजात पसरवत आहेत. पुढाऱ्यांतही प्रकार आहेत. काही स्वयंभू असतात तर काही आशीर्वादाचे पुढारी असतात. फोरमवाले पुढारी हा त्यातलाच प्रकार. आशीर्वाद आहे तोवर पुढारी, आशीर्वाद संपला की घरी. साखरउद्योगावर देशाचं भवितव्य अवलंबून आहे. हा जगन्नाथाचा रथ कोणा एकट्याच्याने ओढला जात नाही; पण फोरमवाल्यांना त्याची कल्पना नाही. त्यांच्याकडे फक्त तत्त्वज्ञानच असते. कृती मात्र नाही. त्याचा एक दृष्टांत सांगतो. एक सोवळा ब्राह्मण होता. नदीवर तो

स्नानाला गेला. बुड्या मारल्या. ओल्या पंचानं काठावर आला. तो त्याचा एका चिमणीच्या विलावर पाय पडला. त्याची चिकित्सा सुरू झाली. चिमणी स्पृश्य की अस्पृश्य ? तत्त्वज्ञानानं त्यानं चिमणी अस्पृश्य ठरवली न् मग पुन्हा नदीच्या पात्रात गेला. तीन वेळा बुड्या मारल्या. आचमन केलं तो त्याच्या लक्षात आलं की आचमन करताना भाताचं एक शीत आपल्या पोटात गेलं. हे शीत कुठून आलं याची त्यानं मग चिकित्सा सुरू केली. काठाकाठानं गेला तेव्हा त्याच्या लक्षात आलं की एका मुसलमानाकडं कंदुरी झाली. बोकड कापला होता. तेच उष्टं शीत आपल्या तोंडात गेलं. ब्राह्मण पुन्हा नदीपात्रात अनुष्ठानाला. अखेरी संध्याकाळी तो गावात आला. इथं कुठं ब्राह्मणाचं घर आहे का म्हणून त्यानं चौकशी केली. तेव्हा गावकऱ्यांनी खालच्या आळीतल्या एका माणसाचं नाव सांगितलं. त्याचं घर शोधत ब्राह्मण त्याच्याकडे गेला. कुणी योगी पुरुष घरी आला म्हणून बाईनं त्याला हातपाय धुवायला पाणी दिलं. आदरातिथ्य केलं. स्वैपाक रांधून जेवायला दिलं. ब्राह्मण यथेच्छ जेवला न् ओसरीत बसला. घरातून बाई आल्या. म्हणाल्या, महाराज, एक विचारू का ? आमचे हे आहेत ब्राह्मण व मी आहे मुसलमान. तेव्हा आम्ही आमच्या मुलांची मुंज करायची की सुंता ? झालं. ब्राह्मणानं एका शितासाठी एवढा त्रास घेतला न् तो तर मुसलमान बाईच्या हातचं जेवण जेवून बसला. आता काय प्रायश्चित्त घ्यायचं ? चिकित्सा केली. नदीकाठी आला. वडाच्या झाडावर रात्रभर जागून प्रायश्चित्त घ्यायचं ठरवलं. मध्यरात्रीपर्यंत जागला पण त्याला डुलकी आली न् या फांदीवरून त्या फांदीवर गडबडत, अंग शेकून निघत कोसळला. कोसळत असतानाच त्यानं मोठ्या मुष्किलीनं एक फांदी पकडून ठेवली न् लोंबकळत उभा राहिला. पहाट झाली. त्यानं खाली पाहिलं तेव्हा जमीन अवघी वीतभर अंतरावर होती. फोरमवाल्यांचं तत्त्वज्ञान हे असं आहे.

सहकारी साखर कारखान्याबाबत बोलतात, मलिदा सरकारचा न् हे पोळ पोसले जात आहेत. तशी वस्तुस्थिती नाही. सरकार फक्त मॅचिंग कॉंट्रिब्युशन देतं. साखर कारखाना उभारायला पूर्वी २० लाख रु. लागत. आता १ कोटी १० लाख लागतात. ऊसउत्पादनात किती भांडवल गुंतवलं जातं हे कुणी विचारात घेत नाही. त्यात ४ कोटी ६० लाख रुपये गुंतलेले आहेत. केंद्रानं काय दिलं ? तर फक्त लायसेन्स. सोळा रुपये पोत्यामागं राज्यसरकारला मिळतात; पण शेतकऱ्याला त्याचा 'रिटर्न' काही मिळतो का ? जवळजवळ एक टनाला १२० ते १२५ रुपये खर्च येतो. कारखाना फार तर १५० रुपये देतो. म्हणजे शेतकऱ्याला मिळतात फक्त पंचवीस रुपये. एकरी सरासरी तीस टन उत्पादन म्हणजे एकरी फक्त ७५० रुपये. तेही शेतकऱ्याला दीड वर्षाने मिळतात. साखर शेतकऱ्याने महाग केलेली नाही. किलोला १ रुपया ४० पैसे ड्युटी आहे. अधिक कर. म्हणजे १ रुपया ६० पैसे किलोला टॅक्स. त्यात प्रोसेसिंगचा खर्च किलोमागे ८५ पैसे. ड्युटी न् परचेस टॅक्समुळेच साखर महाग झालेली आहे. साखरउत्पादक लेव्ही देण्यात आघाडीवर आहेत. एकट्या माळशिरस तालुक्यात चार साखरकारखाने आहेत. त्यांनी पूर्णपणे लेव्ही भरलेली आहे. सोलापूर जिल्ह्यातील ४२ हजार क्विंटल लेव्हीत एकट्या माळशिरसची दिलेली लेव्ही २२ हजारांची आहे. उसाच्या पिकानं जमिनीचा पोत वाढतो. चालू वर्षी २५० कोटी रुपयांचं परकीय चलन साखरेच्या निर्यातीतून देशाला मिळालेलं आहे. एअरकंडिशनमध्ये बसून तत्त्वज्ञान सांगितल्याने काही मिळत नाही. आता काळ बदललाय. साखरकारखान्यांवरच्या टीकेची फळी रोखली पाहिजे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या मालकीचे एखादे वृत्तपत्र पाहिजे.

हल्ली सगळेच संप करतात. नुकताच रेल्वेकामगारांचा संप झाला, सरकारी कर्मचाऱ्यांचाही झाला. शेतकरी कधी संपावर जातो का ? खरं म्हणजे त्यानंही आता संपाचा मार्ग अवलंबावा. आपल्या कुटुंबाला लागेल तेव्हढंच पिकवायचं. पोपटपंची तत्त्वज्ञानानं आणि कायद्यानं समाजवाद येणार नाही. आपली समाजरचना हीच उतरंडीची झालेली आहे. मडक्यावर मडकी. सगळ्यात खाली श्रमकरी, कष्टकरी, त्याचं मडकं, वर श्रीमंतांचं. अन् झाकणीवर नाकातली नथ, कानातले डूल. खालच्या मडक्यानं आता अंग हलवायला शिकलं पाहिजे. जरा त्यानं अंग हलवलं की वरची मडकी खाली यायला काय उशीर ? ती आपोआप खाली येतील. शेतकऱ्यांवर जी टीका होत्ये त्याचं एक कारण म्हणजे काही न करता पुढारीपणाची हाव. एक दृष्टांत देतो. एक कथेकरी देवळात रामायण सांगायचा. शेरडं राखायचं काम करणारं एक गुराख्याचं पोर हे रामायण ऐकायला नियमित यायचं. रामायणाचं आख्यान सुरू झालं की हे पोरगं रडायला लागायचं न् आख्यान संपलं की हे पोरगं आनंदी. शेवटी कथेकऱ्यानं त्याला विचारलं, 'अरे बाबा, हे काय लावलंय्स तू?' पोरगं म्हणालं, 'काय सांगू ? दीड महिन्यापूर्वी,माझ्या कळपात एक दाढीवालं बोकड होतं ते मेलं. तुम्ही रामायण सांगाया लागले की तुमची दाढी हलायला लागते न् मग मला माझ्या बोकडाची आठवण येऊन रडू येतं.

मी हिशेब सांगतो. एक एकराच्या उसामागे तीन हजारांचे उत्पन्न सरकारात जमा होते. महाराष्ट्रात फक्त एक टक्का जमीन उसाखाली आहे. असं असूनही आमच्यावर दात धरला जातो. त्याचा एक दृष्टांत सांगतो. एकदा एका बागेत एक राजा आपल्या प्रधानाबरोबर राज्याच्या हालहवालीवर बोलत बसलेला असतो. तिथं एक बोकड आला. राजा प्रधानाला म्हणाला, प्रधानजी, हा बोकड फारच हडकुळा आहे. याला जर चांगला खुराक घातला तर तो चांगला तयार होईल का ? प्रधानजीने होकार देऊन तयारी केली. पंधरा मिनिटांनी राजाची लहर पुन्हा फिरली. या बोकडाला भरपूर खायला-प्यायला घालायचं, पण त्याचं वजन वाढू द्यायचं नाही. प्रधान म्हणाला, ठीक आहे. बोकडाला खूप खायला दिलं जाऊ लागलं न त्याच्यासमोर वाघाचा पिंजरा आणून ठेवला गेला. वाघानं एक जांभई दिली की बोकडाच्या ×× वाटे खाल्लेले भराभरा पडायचं. शेतकऱ्यांच्या बाबतीत नेमकं हेच घडतंय.

धोरणं वरनं ठरतात. पिकांची विमायोजना कागदोपत्रीच आहे. दोन एकर जमीन ठेवा म्हणणाऱ्यांना मी समजावून सांगितलं. मंत्री सुद्धा मला त्यांच्या चेंबरमध्ये गेलं की म्हणतात, 'तुझं म्हणणं पटतं रे, पण...' वर बोट दाखवतात. मी चेंबरच्या बाहेर आलो की मग मला प्रतिगामी म्हणतात. त्या मंत्र्यांची नावं मी इथं सांगत नाही. कमी आकडे बोलून पुरोगामी होणाऱ्यांपैकीच आहेत ते.

आम्ही जिरायत व बागायत जमिनीतल्या मातीची तपासणी करायची एक लॅबोरेटरी काढलीय्. तुम्हीही काढा. तपासणी केल्यावर खत कमी लागते. कमी खत वापरूनही उत्पादन एक, दोन टन वाढते. खर्च हजारानं कमी येतो. ८ हजार एकरात आमच्याकडे अशा रीतीनं ऐंशी लाखाची बचत झालेली आहे. आपण भूक लागली व एक भाकरीचा आहार असला तर दहा भाकऱ्या खातो का? त्या वायाच जाणार. गरजेइतकंच खत व पाणी जमिनीला दिलं पाहिजे. आम्ही मग एक फॉर्म्युला तयार केला. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष खत द्यायचंच नाही. ते कित्येकदा पिकापर्यंत जातच नाही. स्टाफनेच ते पोचवायचं. शेतकऱ्यांना रोखीची गरज असते. खताचा वापर परंपरेनं चालत आलेला आहे तो बदलला पाहिजे. परंपरेच्या बाबतीतला एक दृष्टांत सांगतो. आषाढी यात्रेच्या दिवशी विठोबाच्या दर्शनाला खूपच गर्दी असते. दोन लायनी होत्या. एक पुरुषांची, एक बायांची. स्त्रियांच्या लायनीत एक बाई होती. तिच्या कडेवर एक मूल होतं. त्याला शौचाला लागली. आता लाइन सोडून जायचं म्हणजे पुन: शेवटी जाऊन दर्शनाला आणखी पाच-सहा तास जायचे. म्हणून बाईनं मुलाला तिथंच 'बसवलं'न् विष्टा दिसू नये म्हणून त्यावर कुंकू बुक्का टाकला. मागच्या बाईनं टाकला न् हळूहळू जी जी बाई पुढं सरके ती पुढच्या बाईचं अनुकरण करून कुंकू बुक्का त्यावर टाकून सरकायची. खाली आहे काय हे कुणी पाहिलंच नाही.

हल्ली शेतकरी जोडधंदा म्हणून म्हशी पाळतात. तिचा खर्च ४२०० रुपये सालीना येतो व उत्पन्न येते २२०० रुपये. वर्षाला १५०० रुपये तोटाच येतो. पण म्हैस आहे ही एक फॅशनच होऊन बसली आहे. दूध देणार म्हैस न् छाती काढणार मालक. पण हिशेब पाहिला का? म्हशीऐवजी दारात क्रॉस ब्रीड गाय घ्या. ती २०–२० लिटर दूध देते. महिलांनी आता दागिन्यांचा हट्ट नवऱ्याजवळ धरण्याऐवजी एक सुधारलेल्या जातीची गाय पाहिजे म्हणून हट्ट धरला पाहिजे. या गाईवरचा खर्च जाऊन दररोज दहा रुपये निव्वळ नफा राहातो; 'हे गावाला भारी न् बायकोच्या आहारी' अशांनीही ध्यानात घेतलं पाहिजे.

शेतकऱ्यांच्या बायकांनीही समजून घेतलं पाहिजे. त्याचा एक दृष्टांत सांगतो. गावचा पाटील घरधनिणीला न्याहारी आणायला सांगून शेताकडे निघाला. वेशीजवळ पोरं विटीदांडू खेळत होती. खेळताना ती विटी शेतावर निघालेल्या पाटलाला सणकन् लागली. एक शिवी हासडून पाटलानं ती विटी खिशात टाकली व तो निघाला. पोरांनी विटी मागितली पण आणखी कोणाला लागून एखाद्याचा डोळा जायबंदी होऊ नये म्हणून त्यानं विटी दिलीच नाही. पोरं माघारी आली ती तडक पाटलाच्या वाड्यात. पाटलीणबाईला त्यांनी सांगितलं. 'पाटील विठीला घेऊन शेताकडं गेले.' हे ऐकून पाटलीण संतापली. चुलीत पाणी ओतून गोधडी पांघरून झोपून राहिली. घरधनीण भाकरी घेऊन आत्ताच येईल, मगच येईल म्हणून वाट पहात पाटील भूक मारून बसला. शेवटी कंटाळून तो घरी आला तर बायको रागात. भाकरी का नाही आणली म्हणून विचारलं तर बाई म्हणाली, 'आणील की तुमची विठी, मी कशाला पाहिजे?' पाटलांनी विचारलं 'तुला कुणी सांगितलं?' बाई म्हणाली, 'पोरांनी!' पाटलांनी हसून खिशातून विटी काढली न् म्हणाला 'हीच ती विठी' तेव्हा गैरसमज करणाऱ्यांपासून आपण सावध राहिलं पाहिजे. □

---

# काकडे विरुद्ध पवार निवडणुकीचा 'ट्रेलर'

**रतनलाल भंडारी**

---

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याची निवडणूक ऐन रंगात आली होती. सर्वत्र सार्वत्रिक निवडणुकीला लाजवील असे वातावरण. साखरेच्या समृद्धीने समर्थ झालेल्या नव्या–जुन्या बागायतदार मंडळींच्या सामर्थ्याची लढत. त्यातच महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेला निंबूतचा आखाडा. लढणारे पट कसून तयार. निवडणुकीच्या डावपेचात तज्ज्ञ असलेले काकडे आणि शरद पवार मैदानात. कोण कुणाची पाठ जमिनीला लावून मानाचे पान जिंकणार याबद्दल उत्सुकता. कोण कुणाला 'धूळ चारणार' याबद्दल खाशा साखरी साम्राज्यात पैजा. वृत्तपत्रांतून 'लोकशाहीतील लढतींच्या राणा भीमदेवी गर्जना. आरोपप्रत्यारोप. निवडणुकीच्या निकालांचे 'ऐतिहासिक' परिणाम सर्वांना ठाऊक. ज्याच्या हाती साखर कारखान्याची किल्ली त्याला सार्वत्रिक निवडणुकीत दिसते दिल्ली!

निवडणुकीपूर्वीचे दोनतीन दिवस. वेळ सकाळची. मी, संभाजीराव काकडे, रामराव काकडे, भूरचंदजी कोठारी व पुण्याचे माजी महापौर सकाळच्या दौऱ्यावर निघण्यासाठी निंबूतमधून बाहेर पडलो. गावाच्या तोंडाशीच एक चौदा–पंधरा वर्षाचे पोर धावत्या 'ॲम्बॅसिडर'कडे टक लावून पहात होते. संभाजीरावांनी त्या पोराला पाहिले आणि रामला म्हटले 'गाडी थांबव. पाहुण्याचे पोर.'

गाडी गच्चकन ब्रेक लावून थांबली. पोर पळतच गाडीपाशी. संभाजीरावांनी विचारले, 'कवा आलास?'

'काल...' पोरगं थोडे अवघडूनच.

'पाव्हणं आले नाहीत?'

'नाही जी. मुंबईला गेलेत.'

'कशाला रे?'

'हायकोर्टातन् 'स्टे' आणायला.'

मी अवाक. पोरगं अशा थाटात बोलत होतं की वडील मुंबईला जाऊन बाजारात 'स्टे' खरेदी करून येणार आहेत. पूर्वी हायकोर्टात जाणे म्हणजे लोकांना दिव्य वाटायचे. हल्ली ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून ते खाजगी दाव्यातही हा हायकोर्टातून आणलेला 'स्टे' म्हणजे मामुली बाब. गाठीला पैसे असलेल्याने सरळ मुंबईला जावे आणि गाठ सोडून 'स्टे' घेऊन यावा.

आज या परिसरात सर्वत्र उसाने हिरव्या सोन्याचे मखमली आवरण पसरले आहे. येथील दारिद्र्य देखील या हिरव्या समृद्धीच्या

थंडगार सावलीत स्वप्नाळू झाले आहे. त्याच्या जीर्ण लक्तरांमध्येही त्याला टी. व्ही. इंपोर्टेड्, बुलेट यांचे रंगीत स्वप्न खुलवीत असते. साखर कारखान्याचा मतदार हा ऊसवाला. त्याच्या खरेदी–विक्रीचे भाव निव्वळ नोटांच्या भाषेत ठरत नाहीत. त्याची त्याला फारशी फिकीर नसते. त्या येतात आणि समृद्धीचे एखादे लेणे दरवर्षी अंगाखांद्यावर चढवून जातात. त्यातल्या त्यात दरिद्री जिरायत भाग. तेथे थोडी मतांची खरेदीविक्री करण्याचा चान्स. तरी सार्वत्रिक निवडणुकीतील गठ्ठा मतांच्या मक्तेदारांचीच मतदारात आघाडी. असाच एक गाव. मूर्टी मोढवे. अवघ्या दारिद्र्याने सर्वांग फुललेल्या गावात दहाबारा मतदार. निवडणुकीच्या आधीचा समय. ना. शरद पवारांच्या पॅनेलमधील 'भालदार' म्हणून प्रसिद्ध असलेल्या मंडळींच्या 'गाडया' गावकुसाला लागलेल्या, मर्यादित मतदारसंघात मतदारांना निवडणुकीपूर्वी एकत्र जमवून 'होळ' 'निबूत 'ला अथवा इतरत्र ठेवणे हा निवडणूक जिंकण्याचा आवश्यक भाग. नाही तर मतदार पळविणे अथवा डोळा घालील त्याच्याबरोबर पळून जाणे अशक्य नाही. तर मुर्टीत या मोहिमेवर नामदारांची मंडळी. 'खर्चाला' म्हणून दोन हजार रुपये देत होती. कुणी घ्यावयाला तयार नाही. आम्हाला डिटेल रिपोर्ट. एकदोघांनी घेतले. दर शेकडयाला एक. आमचे मित्र अशोक शेलार सांगत होते. "× × × भाडयाच्या जवळ चहाला पैसा नसतो. सकाळी नवी नोट काढल्यावरच आम्ही ओळखले. रात्री मासा गळाला लागला. चेष्टा केली तर 'ह्यं ह्यं...' करून फिदी फिदी हसला.'

तेव्हा मुद्दा असा की निव्वळ पैशाने या निवडणुका जिंकणे कठीण. एक तर मतदार 'अर्क' असतो. तसाच तो अतिशय 'कमिटेड्' असतो. काही ठराविक मतदारांकडे तर जावयाचेही नसते. तो काकडे पार्टीचा अथवा पवारांचा 'पित्या' म्हणून प्रसिद्ध असतो. उगा आपलं वेस्ट ऑफ टाइम.

मी ज्या प्रमुख मतदार पुढाऱ्याकडे गेलो त्यापैकी दहा बाराजणांकडे टी. व्ही. होता. जीप वा इतर गाडी काही लोकांच्या दारात दिसे. बुलेट मोजणे हा प्रथम माझ्या मनाचा छंद होता. मग मी तो सोडून दिला. हजार–पंधारशेंना नळीचे जेवण देणे हा प्रयोग प्रत्येक गावात कॉंग्रेसच्या जाहीर वरातीत होता.

साखर कारखान्याच्या निवडणुकीत पक्षाचे राजकारण फारसे आडवे येत नाही. ती असते साखरी संस्थानिक हत्तींची साठमारी. त्यातच कॉंग्रेसविरोधी पक्षांकडे शासकीय धोरणाने एखादा साखर कारखाना जिवंत राहणे कठिण. महाराष्ट्रातील साखर कारखान्याच्या राजकारणाने यशवंतराव मोहित्यांपासून अकलूजच्या मोहिते पाटलांपर्यंत कामगार किसान पक्षातली मंडळी कॉंग्रेसच्या दावणीला कशी बांधली गेली याचा इतिहास जिवंत आहे. पण गेली दहा–बारा वर्षे कॉंग्रेसपक्षाच्या विरोधात या ना त्या कारणाने सोमेश्वर साखर कारखाना आघाडीवर. सर्व विरोधीपक्षीय मंडळींना त्यामुळेच कारखान्याबद्दल व काकडे गटाबद्दल प्रेम. या निवडणुकीत विरोधीपक्षातील मी, आमदार जाधवराव, शे. का. पक्षाचे सासुरवाशी सातारी नेते कॉ. पंजाबराव चव्हाण नि दलित पँथरचे माजी महापौर दिवेकर इ. मंडळी प्रचाराच्या आघाडीवर; पण जोडीला भाई गुलामअल्ली, अर्जुन सस्ते इत्यादी अद्यापही कॉंग्रेस पक्षाचा मळवट भरलेली मंडळी सभातून पवारांवर हल्ले चढवीत होती. पवार गटाची मंडळी आम्ही कॉंग्रेसपक्षातर्फे झुंजत आहोत. असा जाहीर टाहो वृत्तपत्रांतून फोडत होती. पवारांच्या आक्रमक पवित्र्यामागे राजकारणाचे कोणते 'गणित' असेल ते असो; पण नुकतेच शिक्षण खाते सोडून आलेल्या 'नापास' पवार गुरुजींना 'परीक्षेत' हे गणित यश देऊ शकले नाही हे खरे. कारण एक तर पुरंदर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष ननावरे, काकडे गटातून निवडणूक लढवीत होते. त्यांनी तर पवारसाहेबांना निवडणुकीच्या धामधुमीत पेट्रोलपंपावर रात्रीची अनधिकृत वारी करीत असताना गाठले. पवार साहेबांनी कॉंग्रेस पक्षाचा यात पक्ष म्हणून संबंध नसला तरी, त्यांना भावी राजकारणाच्या दृष्टीने (आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या दृष्टीने) यात भाग घेणे क्रमप्राप्त असल्याचे सांगितले. पण तरी देखील निवडणुकीच्या आदल्या दिवशी बारामती तालुका कॉंग्रेसच्या अध्यक्षांनी पवार गटाला मते

पृष्ठ ३१ वर



# पॅपिलॉन

मूळ लेखक
हेन्री शॅरियर
अनुवाद
रवींद्र गुर्जर

## प्रकरण चोवीस

## डेव्हिल बेटावर



बघता बघता टेकडी चढून मी वर आलो. विचार एकच समोर होता की मुकाटयानं पुन्हा आपल्या बिछान्यात जाऊन पडणे. रुग्णालयाच्या व्हरांडयात सहज प्रवेश केला. त्याआधी मला इस्पितळाची भित चढून यावी लागली होती, कारण मुख्य दाराची चावी रोमियोनं कुठे ठेवली होती त्याची कल्पना नव्हती.

माझ्या खोलीची चावी सापडायला मुळीच वेळ लागला नाही. खिडकीपाशी जाऊन मी किल्ली जोरात भिरकावून दिली. ती समोरच्या भितीपलीकडे जाऊन पडली. सरळ बिछान्यावर जाऊन पडलो. भीती फक्त एकाच गोष्टीची वाटत होती. पायातल्या स्लिपर्स भिजून चिंब झाल्या होत्या. उठून त्या मोरीत नेऊन टाकल्या. तोंडावरून पांघरूण घेतल्यावर थोडी थोडी ऊब यायला लागली. वारा आणि खारं पाणी यामुळं अंग पार गोठल्यागत झालं होतं. माझा मित्र खरंच बुडाला होता का ? कदाचित माझ्या विरुद्ध बाजूला तो फेकला गेला असेल आणि बेटाच्या दूरच्या टोकाला पोचला असेल. मी तिथून फार लवकर निघून आलो का ? आणखी थोडा वेळ वाट बघायला हवी होती, खरंच. इतक्या लवकर प्रयत्न सोडून दिल्याबद्दल मी स्वतःला दोष दिला—मित्र बुडाला समजून माघार घेणं चूक होतं.

रॉयेल बेटावर आल्यानंतर काही दिवसातच पॅपिलॉनला एक मोठा धक्का सहन करावा लागला. त्याचा प्रिय मित्र कारवोनेरी याचा खून झाला. खुनी माणसाला त्याच रात्री ठार करून जरी सूड उगवण्यात आला तरी मित्राची अनुपस्थिती पॅपिलॉनच्या मनाला फारच लागली. रॉयेलवर राहणं देखील जिवावर आलं. तेवढ्यात त्याची आणि सिल्व्हेनची गाठ पडली. युद्धपरिस्थितीमुळे तुरुंगातील शिक्षा अत्यंत कडक झाल्या होत्या. सुटकेच्या प्रयत्नाबद्दल तर मृत्युदंडाची शिक्षाच ठरवली होती. पळून जाण्याशिवाय तर गत्यंतरच नव्हतं. त्यावर उत्तम तोडगा असा निघाला की सिल्व्हेननं वेडयाच्या इस्पितळात काम पत्करावं आणि पॅपिलॉननं वेडाचं सोंग आणून रोगी म्हणून तिथे दाखल व्हावं. झालं; ठरल्याप्रमाणे हालचाली झाल्या. त्यानं सोंग तर बेमालूम वठवलं. पण खऱ्या वेडयांच्या सहवासात काळ काढणं सोपं नव्हतं. लवकरात लवकर तिथून समुद्रमार्गे पसार व्हायला पाहिजे होतं. बेत ठरला. दवाखान्यातील दोन पिपं रिकामी करून ती किनाऱ्यावर न्यायची, एकत्र बांधून त्यांचा तराफ्यासारखा उपयोग करायचा आणि लाटांवर आरूढ होऊन पळ काढायचा. त्याप्रमाणे पिपांवरून दोघेही पाण्याबरोबर आत ओढलेही गेले. पण इथेही दुर्दैव आड आलं. समुद्राच्या आत शिरलेल्या मोठ्या खडकावर आदळून पिपांचा चक्काचूर झाला. लाटेच्या जोराबरोबर पॅपिलॉन कसाबसा पोहत पोहत किनाऱ्यापर्यंत पोचला. त्याचा मित्र गायब झाला होता. थोडा वेळ सिल्व्हेनची वाट पाहून तो जड अंतःकरणानं इस्पितळाकडे परतला. पहाटेपूर्वी बिछान्यावर जाऊन पडायला पाहिजे होतं..................................

---

जवळच्या टेबलाच्या खणात झोपेच्या दोन गोळ्या होत्या, त्या पाण्याशिवाय गिळून टाकल्या. जिभेवर तेवढा ओलसरपणा होता.

सकाळी हलवून जागं करीपर्यंत मी झोपून राहिलो. जवळ वॉर्डर उभा होता. खोलीत भरपूर प्रकाश शिरला होता. खिडकी उघडली होती. बाहेरून तीन रुग्ण आत बघत होते. 'काय झालं पॅपिलॉन? तू तर अगदी मेल्यासारखा झोपला होतास. तू कॉफी घेतली नाहीस. बघ थंड होऊन गेली. चल घेऊन टाक.'

मी पुरता जागा झालोच नव्हतो, तरीही एक गोष्ट ध्यानात आली की सारं काही ठाकठीक होतं. 'तुम्ही मला कशासाठी उठवलंत?'

'कारण तुझ्या जखमा आता बऱ्या झाल्या आहेत आणि ही खोली दुसऱ्यासाठी लागणार आहे. तुला पहिल्या खोलीत परत जायचं आहे.'

'ठीक आहे साहेब.' आणि मी त्याच्या मागोमाग गेलो. मला त्यानं यार्डमधे सोडून दिलं. त्याचा फायदा घेऊन मी आधी स्लिपर्स उन्हात सुकवल्या.

सुटकेच्या अयशस्वी प्रयत्नाला तीन दिवस उलटले होते. त्या काळात माझं आत-बाहेर चालू होतं. रोमियोचा पत्ता नव्हता. त्याच्याविषयी चर्चाही ऐकू येत नव्हती. बिचारा नक्कीच मेला होता. तो खडकावर जोरात आपटला असणार. मी थोडक्यात बचावलो होतो. मी थोडा मागे होतो म्हणून बहुधा वाचलो. पण कुणी सांगावं? आता इस्पितळातला मुक्काम हलवला पाहिजे. अर्थात आत येणं जितकं सोपं होतं तितकं बाहेर जाणं सोपं नव्हतं. डॉक्टरची माझ्या प्रगतीविषयी खात्री पटली पाहिजे आणि कॅम्पवर तर परत जायलाच हवं.

'साहेब, रात्री मी थंडीनं काकडून गेलो. कपडे खराब न करण्याचं मी वचन दिलं, तर मला एक विजार आणि सदरा घाल का?' मुख्य अटेंडंटला मी नम्रपणे विचारलं. आश्चर्यचकित होऊन तो माझ्याकडे पाहू लागला. म्हणाला, 'इथे माझ्याजवळ बस पाहू, पॅपिलॉन. हे सगळं काय चाललंय?'

'मी इथे कसा काय आलो? इथे तर सगळे वेडे लोक भरलेत. माझ्या हातून तसला काही प्रकार घडला का? मला इथे का आणलं? तुम्ही मला सांगू शकाल तर मेहरबानी होईल.'

'बिचारा पॅपिलॉन, तुला खूप दिवस बरं नाहीय्. पण आता थोडी सुधारणा दिसतीय्. तुला काही काम करायचं आहे का?'

'चालेल.'

'कसलं काम करायला आवडेल?'

'सांगाल ते.'

मला कपडे देण्यात आले. खोल्या स्वच्छ करण्याचं कामही मिळालं. रात्री नऊ वाजेपर्यंत माझ्या खोलीचं दार सताड उघडं असे. त्यानंतर मात्र पहारेकरी येऊन ते बंद करी.

परिचारकाचं काम करणारा एक कैदी मला भेटला. त्याला मी ओळखलं नाही. जवळपास कोणीही नव्हतं. तो मला चांगला ओळखत असावा. 'यापुढे असं नाटक चालू ठेवणं फायद्याचं नाही, मित्रा?'

'तू काय बोलतोयस?'

'मी काय बोलतोय्? तुझ्या सोंगाला मी फसलेलो नाही. आज सात वर्षं मी वेडयांना ओळखतोय्. पहिल्याच आठवड्यात मला समजलं होतं की तुझी सगळी सुटकेसाठी धडपड चाललीय्.'

'मग तुझं म्हणणं काय?'

'सांगतो, माझं म्हणणं काय ते. रोमियोबरोबरचा तुझा प्रयत्न वाया गेला हे बघून मला खूप वाईट वाटतं. तो तर प्राणास मुकला. तो माझा चांगला मित्र होता. मलाही त्यानं सामील करून घ्यायला हवं होतं, पण जाऊ दे. मी आता त्याला दोष देत नाही. यापुढे तुला काही मदत लागली तर सांग–मला आनंदच होईल.'

तो मनापासून बोलत होता हे मी ओळखलं.

बिचारा रोमियो! त्याच्याबद्दल राहून राहून वाईट वाटत होतं. तो पळाल्याचं समजल्यावर एकच गोंधळ उडाला असेल. पिपांचे तुकडे किनाऱ्यावर सापडले होते. त्याला शार्क माशांनी खाल्लं असणार यात त्यांना शंका वाटत नव्हती. ऑलिव्ह तेल वाया घालवलं म्हणून डॉक्टरनं खूप शिव्या दिल्या. युद्धपरिस्थितीमुळे त्याचा थेंबही पुन्हा दृष्टीस पडणार नव्हता.

'मी आता कसं वागलं पाहिजे ?'

'सामान-सुमान आणण्यासाठी इस्पितळाच्या बाहेर जावं लागतं. त्या कामावर मी तुला नेमतो. त्यामुळं रोज चालणंही होईल. यापुढं नीट वागायला सुरुवात कर. दहातल्या आठ गोष्टी व्यवस्थित दिसू दे. एकदम सगळी सुधारणा दिसून येणंही चांगलं नाही.'

'थँक्स्. तुझं नाव काय ?'

'डनपॉन्ट.'

'ठीक आहे. तुझा सल्ला मी विसरणार नाही.'

यालाही सुमारे महिना लोटला. आमच्या त्या प्रयत्नानंतर सहा दिवसांनी त्याचं प्रेत किनाऱ्याला लागलं होतं. शार्क माशांच्या तडाख्यातून तो बचावला होता. विलक्षण आश्चर्य! बारिकबारिक माशांनी मात्र त्याच्या पायांचे लचके तोडले होते. मी डनपॉन्टला विचारलं की एखादं पत्र मला टाकता येईल का? गालगानीपर्यंत जर ते पोहोचतं झालं तर तो पुढची व्यवस्था गुपचुप करू शकणार होता. मी रोमियो साल्विदियाच्या आईला पत्र लिहिलं. ती इटलीमध्ये होती.

> 'मादाम, तुमचा मुलगा पायात शृंखला नसताना मरण पावला. त्याला समुद्रात वीराचं मरण आलं. पहारेकरी आणि तुरुंगापासून खूप दूर. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी धैर्यानं झगडत तो मुक्तपणे मेला. आम्ही दोघांनीही असं ठरवलं होतं की कोणा एकाला काही झालं तर दुसऱ्यानं त्याच्या घरी पत्र लिहावं. हे दुःखद काम मला करावं लागतंय्. मला तुमच्या मुलाच्या जागी कृपया समजा.'
>
> पॅपिलॉन, तुमच्या मुलाचा मित्र.

हे काम पार पाडल्यावर त्या विषयासंबंधी आणखी विचार न करण्याचा मी निश्चय केला. असं एकूण तिथलं आयुष्य होतं. यापुढे वाट्टेल ते करून डेव्हिल बेटावर जायला पाहिजे. सुटकेचा नवा प्रयत्न तिथून करता येईल.

एका रक्षकानं मला त्याच्या जागेचं काम दिलं. दोन महिने माझी वागणूक चांगली होती आणि बागेतलं माझं काम इतकं चांगलं झालं की तो मूर्ख मला सोडता सोडीना. आणखी एक तपासणी झाल्यावर मला काही काळापुरतं कॅम्पवर सोडण्याची डॉक्टरची तयारी होती. पण त्या रक्षकानं या कल्पनेला जोरदार विरोध केला. शेवटी चिडून जाऊन मी त्याच्या बागेचा पार विध्वंस करून टाकला. इतकं करायला नको होतं; पण दुसरं करणार काय? तो बिचारा रडायलाच लागला.

पण माझ्या या कृतीकडे फारसं गंभीरपणे पाहिलं गेलं नाही. हो, नाही तर पुन्हा पहिल्यापासून सुरुवात! डॉक्टर म्हणाला, 'याला थोडे दिवस तरी कॅम्पवर पाठवून बघू. चांगल्या माणसांमधे राहून त्याचं डोकं पूर्ण ताळ्यावर येऊ शकेल. बागेत त्याला अगदी एकट्यानं काम करावं लागलं म्हणून बहुधा तो तसा वागला असेल. मला सांग, पॅपिलॉन, तू सगळी स्ट्रॉबेरीची रोपटी का उपटलीस ?'

'मला ते सांगता येणार नाही, डॉक्टर. त्याबद्दल मी वॉर्डरची क्षमा मागतो. त्याला स्ट्रॉबेरी फार आवडायची. त्याच्यासाठी आणखी तसली काही पाठवून द्यावी म्हणून मी देवाजवळ प्रार्थना करतो.'

आणि मी कॅम्पवर माझ्या मित्रांच्यात परत आलो. कारबोनेरीची जागा रिकामी होती; पण तो अजून तिथेच होता असं समजून माझा बिछाना त्याच्या कॉटजवळ मी ओढला.

माझ्या सदऱ्यावर डॉक्टरनं एक कापडी लेबल शिवायला लावलं—'खास उपचाराखाली.' त्याच्याखेरीज दुसऱ्या कोणीही मला आज्ञा करायची नाही अशी ताकीद होती. सकाळी आठ ते दहा रुग्णालयांसमोरील पालापाचोळा साफ करण्याचं काम त्यानं मला दिलं. डॉक्टरची पत्नी रोज त्यांच्या घरी मला कॉफी आणि सिगारेट्स द्यायची. माझ्या भूतकाळाविषयी नाना प्रश्न विचारायची. सगळी दुपार मी त्यांच्याबरोबर घालवत असे. मला खूप बोलायला लावलं म्हणजे माझं मन पहिल्यासारखं स्थिर होईल अशी त्यांची समजूत होती.

मला डेव्हिल बेटावर पाठवावं अशी विनंती मी त्याला करायचं ठरवलं. ती मान्यही झाली. लगेच दुसऱ्या दिवशी मला निघायचं होतं. ते माझ्याशी इतकं चांगलं वागले होते की त्यांना फसवू नये असं मला वाटलं. 'डॉक्, यापुढे जास्त काळ मी इथं काढणं शक्य नाही. मला लवकरात लवकर डेव्हिल बेटावर पाठवा. तिथून मी एक तर सुटका तरी करून घेईन किंवा त्या प्रयत्नात खलास तरी होईन. काहीही झालं तरी या गोष्टीचा शेवट आता व्हायला पाहिजे.'

'मला सगळं समजतं, पॅपिलॉन. इथली व्यवस्था पार सडलीय्. मलाही त्याचा वीट आलाय्. म्हणून तुला गुडबाय् आणि गुडलक्.'

हे बेट सगळ्यात लहान होतं. उत्तरेला वारा आणि लाटांच्या मधोमध. समुद्रकिनाऱ्याला लागून एक लांबलचक रस्ता होता आणि वर उंचावर वॉर्डर लोकांची एक खोली. तिथेच कैद्यांसाठीही एक ब्लॉक होता. त्यात दहाएकजण होते. इतर कैदी हे सामान्य गुन्हेगार नव्हते तर राजकीय कैदी होते. त्या प्रत्येकाची एकेक छोटीशीच पण स्वतंत्र झोपडी होती. दर सोमवारी त्यांना कोरडा शिधा देण्यात येई आणि रोज ब्रेड. असे तीसजण होते. तिथे डॉक्टर लेजर काम पाहत असे. स्वतःच्या सगळ्या कुटुंबावर त्यानं विषप्रयोग केला होता. राजकीय कैद्यांचा इतरजणांशी कोणताही संपर्क किंवा संबंध नव्हता. एखाद्या वेळी त्यांनी 'केयेन'कडे कोणा कैद्याबद्दल तक्रार केली की त्याला लगेच रॉयेलवर धाडण्यात येई.

रॉयेल आणि डेव्हिल बेट यांच्यामधे एक वायरचा दोर समुद्रात टाकला होता. कारण समुद्र नेहमीच अशांत असे. होड्यांची ये–जा करताना त्याचा उपयोग होई.

तिथे वॉर्डर होते तीन. प्रमुख सांतोरी नावाचा इसम होता. ते

अतिशय गलिच्छ जनावर होतं. आठवडा आठवडा दाढी करत नसे. 'पॅपिलॉन, तू इथे नीट राहशील अशी मला आशा आहे. माझ्या डोक्याला तुझ्यापासून काही त्रास झाला नाही तर तुला पुरेशी मोकळीक मिळेल. तिकडे कॅम्पवर जा. मी पुन्हा तुला तिथे भेटेन!'

हॉलमधे मला सहा कैदी दिसले–दोन चिनी, दोन निग्रो, एकजण 'बोरडॉक्स'चा आणि एक 'लिली'हून आलेला. एक चिनी इसम मला ओळखत होता. सेंट लॉरेंटवर तो माझ्याबरोबर होता. खुना-बद्दल त्याची चौकशी त्या वेळी चालू होती. चाचेगिरी हा त्याचा मूळ धंदा. होड्यांवर हल्ला करून तो बऱ्याच वेळा त्यातल्या सगळ्या लोकांना ठार करीत असे. अशा रीतीनं त्याची संगत धोक्याची असूनही मला तो आवडायचा आणि माझा त्याच्यावर विश्वासही होता.

'ओ. के., पॅपिलॉन!'

'ओ. के. तूही मजेत आहेस ना, चँग?'

'मस्त. इथं वातावरण चांगलं आहे. तू माझ्याबरोबर जेवत जा. तिथे माझ्याजवळच झोपत जा. मी दोन वेळा रोज स्वयंपाक करतो. पॅपिलॉन मासे पकडील. इथं मासे खूप.'

इतक्यात सांतोरी उगवला. 'अरेच्चा, तू आधीच आपली सोय लावलीस? उद्या चँगबरोबर जाऊन तू डुकरांना खायला घाल. त्यांची दोघांत विभागणी करा. दुपारी चारला तेच काम. हे कामाचे दोन तास सोडले तर तुम्हाला बेटावर काहीही करायला मोकळीक आहे. मासे पकडायचे असतील तर रोज मला फक्त दोन पौंड मासे द्यायचे. तुम्हीही खूष, मीही खूष. काय बरोबर ना?'

'होय, साहेब.'

'तू सुटकेसाठी पागल झाला आहेस हे मला ठाऊक आहे; पण मला काळजी वाटत नाही. डेव्हिल बेटावरून ती गोष्ट अशक्य आहे. रात्री तुम्हाला बंद करण्यात येतं. तरीही काहीजण बाहेर पडतात म्हणा. राजकीय कैद्यांपासून काळजी घ्या. त्यांच्याजवळ मोठमोठे चाकू आहेत. त्यांच्या झोपड्यांकडे कोणीही गेलं तर त्यांना वाटतं की, अंडी आणि कोंबड्या पळवण्यासाठीच तुम्ही आलाय्. म्हणून तुम्ही ठार किंवा जखमी होण्याची शक्यता आहे. कारण तुम्ही त्यांना दिसू शकता; पण ते तुम्हाला आधी दिसत नाहीत.'

दोनशेच्या वर डुकरांना खायला घातल्यावर मी आणि चँग बेटावर मुक्तपणे फिरत असू. त्याला बेटाचा कोपरान् कोपरा ठाऊक होता. डॉक्टर लेजर उंच, बळकट पण घाणेरडा इसम होता. मला तो आवडला नाही.

रोज सकाळ–संध्याकाळ मी विपुल प्रमाणात मासे पकडायचो. लाल म्युलेट विशेषत:. त्यातले आठ–दहा पौंड वॉर्डर लोकांच्या खानावळीत देत असे. सांतोरी बेहद्द खूष होता; कारण इतके विविध प्रकारचे मासे पूर्वी त्याला कोणीच दिले नव्हते.

### ड्रेफसची जागा

काल डॉ. जर्मेन गिबर्ट डेव्हिल बेटावर आला होता. समुद्र शांत असल्यामुळे तो, रॉयेलचा गव्हर्नर आणि श्रीमती गिबर्ट यांच्यासह येऊ शकला. या बेटावर पाऊल टाकणारी पहिली धाडसी व्यक्ति म्हणजे श्रीमती गिबर्टच. नाही तर बाहेरच्या जगातील कोणताही माणूस अद्याप इथे पोचला नव्हता. तिच्याबरोबर मी तासभर बोलू शकलो. ज्या ड्रेफसला फ्रान्सनं माझ्यासारखंच नाकारलं होतं, तो किनाऱ्यावर ज्या जागी बसायचा तिथे मी तिला घेऊन गेलो.

'हा गुळगुळीत दगड जर ड्रेफसचे विचार सांगू लागला तर...' त्याच्या पृष्ठभागावरून हात फिरवत ती म्हणाली, 'पॅपिलॉन, बहुधा ही आपली अखेरची भेट. तू लवकर पळून जाण्याच्या तयारीत आहेस त्या अर्थी तुला यश मिळण्यासाठी मी प्रार्थना करीन. निघण्यापूर्वी याच दगडावर तू क्षणभर बस म्हणजे मला निरोप दिल्यासारखं होईल.'

'गुडबाय्, डॉक्टर; गुडबाय्, मॅडम्.' ते निघाल्यावर मी हात हालवत म्हटलं, होडी दूर जात होती. श्रीमती गिबर्ट भावपूर्ण नजरेनं माझ्याकडे पाहत होती. जणु काही तिला म्हणायचं होतं, 'आमची नेहमी आठवण ठव. आम्हीही तुला विसरणार नाही.'

ड्रेफसची जागा बेटाच्या उत्तर टोकाला, समुद्रपातळीच्या दीडशे फूट वर होती.

आज मी काही मासे मारायला गेलो नाही. एका लोखंडी पिपात मी चार–पाचशे पौंड मासे साठवून ठेवले होते. त्यामुळे आज सुट्टी घ्यायला काहीच हरकत नव्हती. आम्हा सगळ्यांना पुरून उरेल इतकी मासळी जमा झाली होती.

हे १९४१ साल होतं. तुरुंगात येऊन अकरा वर्षं उलटली होती. मी पस्तिशीत शिरलो होतो. आयुष्यातील ऐन उमेदीचा काळ मी एक तर साध्या नाही तर अंधार–कोठडीत घालवला होता. इंडियन वस्तीमधे फक्त सातच महिने स्वातंत्र्य उपभोगलं. तिथल्या दोन्ही बायकांना माझ्यापासून झालेली मुलं आता आठ वर्षांची असतील. काळ किती भयानक वेगानं पुढे जातो! गतकाळाकडे दृष्टिक्षेप टाकल्यावर ते सर्व जिवंत अनुभव पुन्हा एकदा समोर झळकले.

पस्तीस! फ्रान्समधले माझे सखेसोयरे या वेळी काय करीत असतील? माझी पत्नी, निनेट, न्यायालयात मला म्हणतीय्, 'लाडक्या, तू मुळीच काळजी करू नकोस. तू असशील तिथून आम्ही तुला शोधून काढू.' जर्मनांच्या आधिपत्याखाली देश असेल. माझे वडील आणि बहिणींची कुटुंबं कोणत्या परिस्थितीत असतील?

आणि सुटकेचे सगळे प्रयत्न! एकूण झाले तरी किती, गंमत म्हणून बघू की!

पहिला, हॉस्पिटलमधून तीन रक्षकांचा कपाळमोक्ष करून पळालो तो.

दुसरा, कोलंबियामधे रिओ हॅशा तुरुंगातून केलेला. तो सगळ्यात चांगला होता. त्या वेळी मला पूर्णपणे यश मिळालं होतं. मी माझी टोळी कशासाठी सोडली? माझ्या अंगावर सुखद काटा आला. जणु काही मी दोन बायकांबरोबर सुख–संवाद करीत बसलो होतो.

नंतर तिसरा, चौथा, पाचवा आणि सहावा असे चार प्रयत्न बारांक्विला तुरुंगात. चारी खेपेला नशिबानं दगा दिला. चर्चमधील उठाव, अपुऱ्या शक्तीचा डायनामाइट–स्फोट. पुढे भिंतीवरच्या उड्या आणि जोन्सचे पाय मोडणे. आणि सावकाश परिणाम करणारं ते गुंगीचं औषध शेवटी.

सातव्या खेपेला हलकट सेलियरनं दगा दिला. त्यानं घात केला नसता तर आज त्या बिचाऱ्या कारबोनेरीसह स्वातंत्र्य उपभोगत कुठे तरी स्थायिक झालो असतो हे नक्की.

आठवा आणि शेवटचा प्रयत्न, परवा–परवा इस्पितळातून केला. त्या वेळी माझी फार मोठी चूक झाली. समुद्रात शिरण्याची जागा निवडण्याचं काम रोमियोवर सोपवलं. अजून दोनशे यार्डांच्या पलीकडून काम खूपच सोपं झालं असतं.

याच दगडी बाकावर भावडा ड्रेफस बसत असे. सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मानसिक दृष्टचा मात करायचं बळ त्याला इथंच मिळालं होतं. त्याचं उदाहरण मी घ्यायला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत माघार घेणे नाही. होय, या खडकाळ जागेच्या सर्वांत उंचावरील मऊ आणि गुळगुळीत जागेपर्यंत पोचणाऱ्या लाटा मला तेवढी शक्ति देवोत. ड्रेफस अखेरपर्यंत निराश झाला नव्हता. मलाही त्याच्यासारखंच वागलं पाहिजे. 'जिंकू किंवा मरू' हा खुळचट विचार सोडला पाहिजे. 'मृत्यू' या शब्दाला काट. यशस्वी होणे आणि स्वतंत्र होणे याशिवाय कोणताही अन्य विचार डोक्यात येता कामा नये.

त्या जागेवर बसल्या–बसल्या माझं मन इतस्ततः भरकटत असे. कधी भूतकाळात तर कधी सुरम्य भविष्यकाळात. लाटांवरून परावर्तित होणाऱ्या प्रखर किंवा चंदेरी प्रकाशामुळे डोळे दिपून जात. समुद्राकडे मी इतका वेळ एकटक पाहत राही की हळुहळू तिकडे न बघताही लाटांचे सर्व बारकावे माझ्या ध्यानात येऊ लागले. समुद्र स्वतःला किनाऱ्यावरील खडकांवर झोकून देत असे. वादळात तर तो किनाऱ्यावरील एकजात सर्व वस्तू वाहून नेई. त्याच्या तडाख्यातून एकही वस्तू सुटत नसे. खडकांच्या कानाकोपऱ्यात त्या वेळी पाणी पोचत असे. जणु तो म्हणायचा, 'माझ्यापुढे सर्व काही क्षुद्र आहे.'

तिथूनच मी एक महत्त्वाचा शोध लावला. ड्रेफसच्या जागेखालीच असलेल्या प्रचंड खडकांपर्यंत लाटा फेसाळत येत आणि पुन्हा तुफान वेगानं माघारी फिरत. आत येणारं हजारो टन पाणी इतस्ततः पसरू शकत नव्हतं. घोडयाच्या नालासारखा आकार असलेल्या दोन खडकांवर आदळून ते परत जाई. पुढचा मार्ग रोखला गेला होता. उंच पहाडामुळे पाण्याला फक्त मागे जाणंच क्रमप्राप्त होतं.

माझ्या दृष्टीनं तो खरोखरच महत्त्वाचा शोध होता. लाट त्या खडकांवर येऊन आदळल्यानंतर मी जर नारळांच्या पोत्यासह पाण्यात उडी टाकली तर ती लाट मला न चुकता आत समुद्रात घेऊन जाईल यात पुसटशी देखील शंका नव्हती.

ज्यूटची पोती हवी तेवढी मिळू शकणार होती. एकदा नारळ जमा केले की बस्‌ ! पहिली गोष्ट म्हणजे आधी सुटकेची तालीम केली पाहिजे. पौर्णिमेला भरतीचा जोर आणि लाटांची ताकद प्रचंड असे. त्या दिवसापर्यंत थांबलं पाहिजे. एका चांगल्या शिवलेल्या पोत्यात नारळ भरून मी ते लपवून ठेवलं. त्याच पोत्याला दुसरं एक सत्तर–ऐंशी पौंड वजनाचा दगड घातलेलं पोतंही बांधून टाकलं होतं. त्या दोन्ही पोत्यांसह मी प्रवास करणार होतो. माझं वजन दीडशेच्या आसपास असल्यामुळे समतोल राखण्यासाठी मी तो बंदोबस्त केला होता.

या प्रयोगाचे वेळी मी फार उत्तेजित बनलो होतो. बेटाची ही बाजू पूर्णपणे सुरक्षित होती. या संपूर्णपणे उघडया आणि त्यामुळेच जास्त धोकादायक जागेवरून कोणी पळून जाईल यावर कोणाचाच विश्वास बसणं शक्य नव्हतं आणि रॉयेलला न लागता समुद्रात वाहून जाण्यासाठी तीच एकमेव जागा होती.

दोन्ही पोती वाहून नेणं अवघड काम होतं. तेवढं वजन निसरडया खडकांवरून नेताना घसरण्याची शक्यता होती. म्हणून मी चँगजवळ त्याबाबत बोललो. तो मला मदत करणार होता. त्यानं मासे मारण्यासाठी लागणारी आवश्यक ती सर्व सामुग्री जमा केली. कोणी अचानक जर तिथे उपटला तर 'आम्ही शार्क माशांची शिकार करणार आहोत' असं सांगता येणार होतं.

'ओढ, चँग. आणखी थोडंच जायचंय्. ती पाहा आपली जागा.' पूर्ण चंद्रानं किनारा उजळून टाकला होता, जणू काही दिवसच होता. फुटणाऱ्या लाटांच्या गर्जनेमुळे मी बहिरा बनलो होतो. 'तू तयार आहेस ना, पॅपिलॉन ?' चँगनं विचारलं. 'चल, या लाटेमध्ये फेकू या.' भिरभिरणाऱ्या पंधरा फुटी लाटेवर ती परतताना आम्ही पोती ढकलून दिली. आमच्या खालीच ती लाट फुटली होती, पण तिचा फटका इतका बेफाम होता की आम्ही नखशिखांत चिंब झालो. पण लाट जास्तीत जास्त उंचावर असताना आम्ही आमचं काम मात्र पुरं केलं. एखाद्या गवताच्या काडीप्रमाणे पोती वाहून गेली– पार आत, समुद्रात दूर.

'आपण अखेर जिंकली, चँग ! काय धमाल आहे नाही !'

'जरा थांब. ते परत येतं का पाहू.'

आणि मला धक्काच बसला; पाच मिनिटांच्या आतच, आमचं पोतं एका पंचवीस-तीस फूट उंच अशा अजस्त्र लाटेबरोबर परत येताना दिसलं. नारळ आणि दगडांचं वजन तिच्या लेखी पाचोळयासारखं असेल. मूळ जागेच्या थोडं डावीकडे ते वेगानं येऊन आदळलं. दोन्ही पोती फाटून नारळ भिरकावले गेले आणि दगड तळाशी जाऊन पडला.

गारठलेल्या आणि गळून गेलेल्या अवस्थेत आम्ही तिथून मागे फिरलो. माझ्या आशेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या होत्या. पाठीमागे एकही दृष्टिक्षेप न टाकता दोघंही चालत होतो.

'चांगलं नाही, पॅपिलॉन, चांगलं नाही. डेव्हिल बेट सुटकेला वाईट. रॉयेल, ते चांगलं. रॉयेलची दक्षिण बाजू या ठिकाणापेक्षा सुरक्षित.'

'खरं आहे, पण रॉयेलवर सुटका दोन तासात उघडकीस येते. फक्त लाटांच्या जोरावरच पोत्याच्या प्रवासाचा वेग अवलंबून असल्यामुळे तिथल्या तिन्ही होडया मला सहज ताब्यात घेऊ शकतील. इथे एक तर होडीच नाही. दुसरं म्हणजे त्यांच्या सकाळी लक्षात येण्यापूर्वी संपूर्ण रात्र माझ्या पदरात पडली असेल. तिसरी गोष्ट म्हणजे मासे पकडतानां मी बुडालो असं ते धरून चालतील. डेव्हिलवर टेलिफोन नाही. समुद्र शांत नसेल तर बाहेरून होडीला इथे येता येणार नाही. म्हणूनच मला इथूनच गेलं पाहिजे. पण कसं ?

सूर्य दुपारी आग ओकत होता. डोक्याच्या आत मेंदू उकळतोय की काय असं वाटत होतं. तरीही मी पुन्हा नेहमीच्या जागेवर येऊन बसलोच. समुद्राचा अभ्यास करणे– हेच एकमेव उद्दिष्ट समोर होतं आणि या वेळी अचानक माझ्या लक्षात आलं की आपण किती मूर्ख होतो. आमचं पोतं ज्या प्रचंड लाटेनं परत आणून ठिकऱ्या ठिकऱ्या केल्या होत्या, तशी लाट इतर लाटांच्या दुप्पट उंचीची असते आणि दर सात लाटांमध्ये फक्त एकदाच येते.

मध्यान्हापासून सूर्यास्तापर्यंत मी निरीक्षण करत राहिलो; नेहमी असंच घडतं का नाही याचं. सातव्या लाटेची उंची ठराविक असते आणि लयसुद्धा बदलत नाही, केव्हाही त्यात फरक पडत नाही.

नाही. ठराविक वेळेआधी एकदाही मोठ्या लाटेनं येण्याची घाई केली नाही. सहा वीस फुटी लाटा आणि सातवी त्याच्या दुप्पट. त्या राक्षसी लाटेचा विस्तार तीनशे यार्डांहून जास्त असायचा. अगदी सरळ ती आत यायची. पुढे पुढे यायला लागली की उंची आणि आकारमान वाढत जायचं. इतर लाटांसारखा त्यावर फेसही नसायचा. काही अंतरावर वीज कोसळल्याचा भास होईल इतका मोठा सातव्या लाटेचा आवाज असायचा. परत फिरताना मोठमोठे खडकही पाण्याबरोबर आत ओढले जातात की काय असं वाटायचं. ते दृश्य विसरणं शक्यच नाही.

एका पोत्यात चाळीस पौंडी दगड घालून त्यातच मी दहा नारळ भरले. ते पोतं मोठ्ठी लाट परत फिरताना पाण्यात फेकून दिलं. दुसरा प्रयोग.

पांढरे तुषार इतके उडत होते की पोत्याची पुढची हालचाल मला दिसू शकत नव्हती. पण मधूनमधून एकदम ते दिसायचं. पोतं परत माघारी आलं नाही. पुढच्या सहा लाटांमध्ये त्याला परत किनाऱ्यावर फेकण्याचं सामर्थ्य नव्हतं. सातवी लाट तयार होईपर्यंत ते कक्षेच्या पलीकडे जाऊन पोचलं होतं. कारण मला पुन्हा ते कधीच दिसलं नाही.

मी कॅंपवर परतलो. पुन्हा आशा जागृत झाली होती. अखेर मी ते शोधून काढलं. आत शिरण्याची अचूक पद्धत मला सापडली होती. इथे नशिबाला जागा नव्हती. पण पुन्हा एकदा गंभीरपणे परीक्षा घ्यायला पाहिजे. या वेळी कोणताही धोका पत्करायचा नाही. मी चँगला माझा शोध ऐकवला. माझं म्हणणं त्यानं लक्षपूर्वक ऐकून घेतलं.

'छान, छान, पॅपिलॉन. मला वाटतं तुला मार्ग सापडला. माझी मदत आहेच. मोठ्या भरतीपर्यंत वाट पाहा. त्याला आता फार अवकाश नाही.'

ती वेळ आल्यावर आम्ही दोघांनी दोन पोती एकत्र बांधून पाण्यात लोटली. एकात नारळ आणि दुसऱ्यात एकशेसत्तर पौंड वजनाचे तीन दगड होते.

'तू सेंट जोसेफला ज्या लहान मुलीला वाचवण्याचा प्रयत्न केलास तिचं नाव काय?'

'लिझेट.'

'आपण या लाटेला लिझेट म्हणत जाऊ. हीच सातवी लाट एक दिवस तुला वाहून नेणार आहे.'

'जरूर.'

लिझेटचं पाणी इतक्या उंचीपर्यंत चढलं होतं की आम्हाला पोती टाकण्यासाठी काहीच कष्ट पडले नाहीत. आम्ही पार ओलेचिंब झालो. सकाळी दहा वाजता हा प्रयोग आम्ही केला. काळजी काहीच

## आत्मकथेची कथा

'पॅपिलॉन' ही मूळ फ्रेंच भाषेतील आत्मकथा प्रथम १९६९ मध्ये प्रसिद्ध झाली. त्याचा इंग्रजी अनुवाद पॅट्रिक ओ'ब्रायन यांनी केला.

पॅपिलॉन म्हणजे फुलपाखरू. पुस्तकाचा लेखक 'हेन्री शॅरियर,' याचं ते टोपण नाव. ही अशक्य आणि अतर्क्य घटनांची मालिका आपल्याला वाटली असेल; परंतु आहे एकशे-एक टक्के सत्यकथा.

हेन्रीचा जन्म १९०६ मध्ये, दक्षिण फ्रान्समधील 'आर्डिक्' या गावी झाला. त्याचे वडील शाळामास्तर होते. नेव्हीमध्ये सैनिकी शिक्षण पूर्ण झाल्यावर तो पॅरिसला दाखल झाला. थोड्याच अवधीत त्याने शहरातील गुन्हेगारजगामधे महत्त्वाची जागा मिळवली. पुढे पोलिसांच्या कारवाईला बळी पडून त्याला एका खुनाबद्दल अटक झाली. अर्थात त्याचा गुन्हा नसताना. त्यापुढील रोमहर्षक कथाभाग पुस्तकात आलेला आहेच.

यशस्वी पलायनानंतर सुमारे तीस वर्षांनी हे पुस्तक त्याने लिहिले. पुस्तक लिहिण्याची प्रेरणा त्याला कशी मिळाली? तो एक मोठा मजेशीर योगायोग आहे. एका फ्रेंच पुस्तकालयात त्याला 'अल्बर्टाइन साराझिन' या लेखिकेचे तुरुंगातील जीवनावर आधारलेले पुस्तक दिसले. पुस्तकाच्या लालफितीवर 'एक लाख तेवीसहजारावी प्रत' असे लिहिले होते. ते वाचून काढल्यावर पॅपिलॉन म्हणाला, 'पुस्तक निश्चित चांगलं आहे; पण त्या अनुभवी बाईनं, ठिकठिकाणी हिंडून जमा केलेल्या माहितीवर केवळ लिहिलेल्या पुस्तकाचा इतका खप मिळवला; जर माझ्या तीस वर्षांच्या अखंड साहसांनाप्रसिद्धी मिळाली तर त्यापेक्षा तिप्पट विक्री सहज व्हायला पाहिजे!'

त्याने लगेच दोन वह्या विकत आणल्या आणि दोन दिवसांत त्या भरून काढल्या. अशाच आणखी अकरा वह्या आणून त्या पुढील दोन महिन्यांच्या आत पूर्ण लिहिल्या. धंदेवाईक लेखक रोज एक ते दोन हजार शब्द लिहू शकतो; परंतु पॅपिलॉनच्या लिहिण्याचा वेग इतका असामान्य होता की त्याचे रोज सरासरी पाच हजार शब्द तरी होत असतील.

या पुस्तकाची जगातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी एकमुखाने स्तुती केलेली आहे. पुस्तकाच्या खपाबाबतचे त्याचे भविष्यही अपेक्षेहून अधिक खरे झाले आहे. त्याच्या बारा ते पंधरा आवृत्त्या केव्हाच खपल्या आहेत. आपल्या अचाट साहसांच्या जोरावर स्वातंत्र्य आणि यश मिळवणाऱ्या पॅपिलॉनला या पुस्तकामुळे अक्षरश: लाखो डॉलर्स मिळाले.

'बँको : पॅपिलॉन–फर्दर अॅडव्हेंचर्स' हे हेन्री शॅरियरचे दुसरे पुस्तक. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या साहसांचा त्यात समावेश आहे. 'पॅपिलॉन' हा चित्रपट भारतात लवकरच प्रदर्शित होईल.

गेल्या वर्षी २९ जुलैला घशाच्या कॅन्सरने हेन्री शॅरियरचे निधन झाले. मृत्युसमयी तो ६८ वर्षांचा होता. ◻

नव्हती. कारण तिम्ही वॉर्डर या वेळी बेटाच्या दुसऱ्या टोकाला माल-मोजणीत गुंतले होते. आमचं गाठोडं सरळ वाहून गेलं, किनाऱ्या-पासून खूप दूर. आम्हाला ते स्पष्ट दिसत होतं. लाटा जिथे तयार होतात, त्यापलिकडे ते गेलं होतं की नाही, हे सांगणं कठिण होतं. कारण त्याची काही ठराविक खूण नव्हती. पुढच्या लिझेटबरोबर मात्र ते परतल नाही. याचा अर्थ आता त्यावर लाटांची हुकमत चालणार नव्हती.

घाईघाईनं आम्ही ड्रेफसच्या बाकावर येऊन बसलो. पुन्हा ती पोती दिसण्याची संधी मिळते का हे बघायचं होतं. आणि खरंच चार वेळा आम्हाला ती दूर वाहून जाताना दिसली. लाटांच्या शिखरावर; पण त्या लाटा बेटाकडे येत नसून साधारण पश्चिमेकडे जात होत्या. प्रयोग निःसंशयपणे सफल झाला होता. 'लिझेट'च्या पाठीवर स्वार होऊन मी मोठ्या धाडसाला सुरुवात करणार होतो.

'ती येतीय पहा! एक, दोन, तीन, चार, पाच, सहा...' आणि लिझेट आलीच.

'आणि त्या जागेवरून आपण आत उड्या टाकायच्या का? वा, तुझी निवड किती झकास आहे. सुटकेला आपली केव्हाही तयारी आहे; पण ही तर चक्क आत्महत्याच ठरेल. नको रे बाबा!' मी लिझेटचं वर्णन ऐकवल्यावर 'सिल्व्हेन' खूपच भारावून गेला होता. त्याला डेव्हिल बेटावर येऊन अवघे तीन दिवस झाले होते आणि मी त्याला 'बरोबर यायचंय् का?' म्हणून विचारलं होतं. दोघंही अर्थात स्वतंत्र 'वाहना'वरून. त्यानं कबूल केलं तर मेनलँडवर मला साथीदार तरी मिळाला असता; कारण तिथूनही पुढच्या सुटकेचे मार्ग शोधून काढावे लागणार होते. जंगलात एकट्यानं राहणं ही काही सोपी गोष्ट नव्हती.

'तू पूर्णपणे विचार केल्याशिवाय नकार देऊ नकोस. खरोखर, एखाद्याला आधी भीती वाटणं शक्य आहे; पण आपल्याला दूर नेणारी तीच एकमेव सुरक्षित लाट आहे. त्यात धोका बिलकुल नाही.'

'काळजी नको.' चँग म्हणाला, 'आम्ही प्रयत्न केलेला आहे. तुम्ही एकदा पलीकडे गेलात की पुन्हा डेव्हिलला स्पर्श नाही. रॉयेलला तर मुळीच नाही.'

सिल्व्हेनचं मन वळवण्यात एक आठवडा गेला. त्याचं हाडपेर मजबूत होतं. उंची पाच-अकरा आणि शरीर प्रमाणबद्ध.

'ठीक आहे. मी मान्य करतो की आपण वाहून पुढे जाऊ; पण नंतर मेनलँडपर्यंत पोचायला किती वेळ लागेल?'

'खरं सांगायचं तर, सिल्व्हेन, मला माहीत नाही. जास्तही लागेल किंवा कदाचित थोडाही लागेल. हवामानावर सगळं अवलंबून आहे. वाऱ्याचा आपल्याला काहीच उपयोग होणार नाही; कारण आपण जवळजवळ पाण्याला चिकटून असणार; पण वाईट हवा जर पडली तर उंचच उंच लाटा आपल्याला लौकर किनाऱ्याकडे ढकलतील. सात ते दहा भरतीच्या आवर्तनात आपण किनाऱ्यावर फेकले जाऊ. म्हणजे अंदाजे अठ्ठेचाळीस ते साठ तासांचा सगळा प्रवास आहे.'

'हा हिशेब कसा काय केलास?'

'अंतर सरळ कापता आलं तर पंचवीस मैलांहून जास्त नाही; पण लाटांची दिशा पाहिली तर पंचाहत्तर ते शंभर मैल आपल्याला जावं लागेल. आपण जसजसे किनाऱ्याजवळ जाऊ, तसतशा लाटा सरळ तिकडे ढकलतील. वेड्या-वाकड्या मार्गामुळे आपण ताशी सरासरी दीड ते दोन मैल वेगानं जाऊ शकू. तुला नाही असं वाटत?'

तो माझं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होता. त्याला परिस्थितीचा अंदाज बरोबर आला. हुशार बेटा. 'खरं म्हणजे आपण तीसएक तासांत पोचलं पाहिजे; पण भरती-ओहोटीच्या तडाख्यात सापडल्या-मुळे, तुझ्या म्हणण्याप्रमाणे, अठ्ठेचाळीस ते साठ तास लागू शकतील.'

'तुझी खात्री पटली तर? आता तू माझ्याबरोबर येणार ना?'

'जवळजवळ पटलीय्. समज, आपण मेनलँडच्या झाडीत घुसलो; पुढे आपण काय करायचं?'

'आपण 'कुराऊ' गावाच्या हद्दीपर्यंत पोचलं पाहिजे. तिथे एक मासेमार लोकांचं खेडं आहे. शिवाय तिथले लोक रबर आणि सोन्याच्या शोधात हिंडत असतात. त्या भागात कैद्यांचा कॅम्पही आहे आणि चिनी लोकांचा एक 'इनिनी' नावाचा कँप आहे. आपण काळजी घ्यायलाच पाहिजे. खबर देणारी माणसंही कमी नाहीत. एखाद्या कैद्याला किंवा काळ्या इसमाला गाठून 'इनिनी'पर्यंत पोचायला पाहिजे. तो जर चांगला कैदी असेल तर त्यालाही सोबत घेऊ.'

'इनिनीपर्यंत कशाला जायचं?'

'कारण चँगचा भाऊ तिथं आहे.'

'होय. माझा भाऊ तिथंच राहतो. तो तुमच्याबरोबर येईल. तो होडी आणि खाद्यपदार्थांची सोय नक्की करील. तुम्ही 'कुक्-कुक्'ची फक्त गाठ घ्या, पुढची व्यवस्था आपोआप होईल. चिनी लोक कधीही खबर देणार नाहीत. झाडीत कुठल्याही माणसाला तुम्ही कुक्-कुक्बद्दल विचारा.'

'तुझ्या भावाला ते कुक्-कुक् का म्हणतात?' सिल्व्हेन.

'कुणास ठाऊक. एका फ्रेंच माणसानं ते नाव ठेवलं.' तो सांगू लागला, 'हुश्शार राहा. तुम्ही समुद्रातून जेव्हा मेनलँडजवळ जाल, तिथे खूप चिखल असतो. त्यावरून कधीही चालू नका. चिखल वाईट, तो तुम्हाला ओढून घेईल. पुढच्या भरतीची वाट पाहा, तरंगत तरंगतच झाडीत शिरा-फांद्या घट्ट पकडा नाही तर बुडलात म्हणून समजा.'

'ठीक आहे. सिल्व्हेन, किनारा कितीही जवळ आल्यासारखं वाटलं, तरी खाली उतरू नकोस. झाडं-झुडपं जवळ येईपर्यंत वाट पाहा.'

'ओ. के. पॅपिलॉन. मी तुझ्याबरोबर यायचं ठरवलं आहे.'

'आपण दोघांसाठीही सारख्याच आकाराची पोती तयार करू, कारण आपलं वजन जवळजवळ सारखंच आहे. त्यामुळे दोघंही एक-मेकांपासून फार दूर राहणार नाही. पण काही सांगता येत नाही. आपली चुकामूक झाली तर भेटायचं कुठं? इथून 'कुराऊ' काही दिसत नाही; पण तू रॉयेलवर असताना 'कुराऊ'च्या उजवीकडे काही पांढरे खडक दिसले होते का? साधारण दहा मैलांवर? त्यावर सूर्यप्रकाश पडला की ते स्पष्टपणे दिसत.'

'होय, दिसायचे खरे.'

'सर्व किनाऱ्यावर फक्त तेवढेच खडक आहेत. इतरत्र सगळीकडे चिखलच चिखल आहे. पक्ष्यांच्या विष्ठेचा तो पांढरा रंग आहे. तिथे इतर कोणीही जात नसल्यामुळे, ती जागा सगळचात सुरक्षित आहे. आपण बरोबर नेऊ शकू तेवढी अंडी आणि नारळ फक्त खात जाऊ. विस्तव पेटवायचा नाही. जो आधी तिथे पोचेल त्यानं दुसऱ्यसाठी थांबावं.'

'किती दिवस?'

'पाच. तेवढ्या काळात दोघांची गाठ सहज पडू शकेल.'

दोन दोन पोती एकत्र व्यवस्थित बांधून झाली. आपण त्यांना तराफेच म्हणू. त्या तराफ्यांवर तोल सावरून बसणं अवघड काम होतं. दोघंही शक्यतो त्यावर आडवे पडणार होतो; पण झोपून चालणार नव्हतं. जर का एकदा पाण्यात पडलो, तर पुन्हा तराफा हाती लागण्याची शक्यता नाही. एका बाजूला तो कलंडण्याची शक्यता निर्माण झाली तर दुसरीकडे जादा शक्ती लावणं आवश्यक होतं. आम्ही सर्व शक्यता पूर्णपणे विचारात घेतल्या. चॅंगनं मला एक वॉटरप्रूफ पिशवी दिली. त्यात सिगारेट्स आणि लायटर या वस्तूच फक्त ठेवल्या. प्रत्येकानं दहा–दहा नारळ न्यायचं ठरवलं. खोबऱ्यामुळे भूक आणि तहान, दोन्ही भागणार होतं.

रविवारी रात्री दहा वाजण्याची वेळ ठरली. त्या वेळी पौर्णिमा असल्यानं लाटांची उंची पंचवीस फूट तरी राहणार होती. त्यामुळे 'लिझेट' सर्व शक्तीनिशी आत घुसणार हे तर नक्कीच. रविवारी सगळच्या डुकरांना चॅंग एकटा खायला घालणार होता. मी शनिवार आणि रविवार, अखंड दोन दिवस झोप काढणार होतो. दहा वाजता आम्ही निघेपर्यंत आधीच दोन तास भरतीला सुरुवात झाली असणार!

भरती–ओहोटीचा जोर नसताना आम्ही दोघांनीही छोटचा छोटचा लाटांवर रंगीत तालीम केली. सिल्व्हेन तर दिवसभर तेच करीत असे. मी तासन् तास पाण्याचे फटकारे माझ्या पायांवर आणि मांडीवर घेत असे. हा प्रकार गेले कित्येक दिवस चालू होता. त्यामुळे मांड्या व पाय पोलादासारखे मजबूत झाले होते.

बेटावर एक दहा फुटी साखळी पडली होती. तिचा वापर अजिबात होत नव्हता; म्हणून मी ती माझ्या पोत्यांभोवती गुंडाळून ठेवली. एक बोल्टही तयार ठेवला. जास्त काळ सावरून बसता आलं नाही तर मी स्वतःला त्या साखळीनं पोत्याला जखडून ठेवणार होतो. तशा स्थितीत थोडी झोपही काढता येणार होती–पाण्यात पडण्याचा धोका टाळून. तराफा जर उलटा झाला तर पाण्यामुळे जाग येईल आणि मी तो पुन्हा सरळ करीन.

'फक्त तीनच दिवस राहिले, पॅपिलॉन.' आम्ही दोघंही ड्रेफसच्या बाकावर बसून लिझेटचं निरीक्षण करीत होतो.

'होय, तीनच दिवस उरले. आपण यातून सुखरूप पार पडणार यात मला शंका नाही. तुझं काय मत आहे, मित्रा सिल्व्हेन?'

'नक्कीच, पपी. मंगळवारी रात्री किंवा फार तर बुधवारी सकाळी आपण झाडीत असू. पुढं आपलंच राज्य आहे.'

चॅंग आम्हाला दहा–दहा नारळ भेट देणार होता. सोबत चोरलेले दोन चाकूही.

चिनी कॅंप कुराऊच्या पूर्वेला होता. सूर्याची दिशा धरून दिवसा चालत राहिलं की झालं. मार्ग चुकणार नव्हता.

'सोमवारी सकाळी, सांतोरीला वेडच लागेल,' चॅंग म्हणाला, 'दुपारी तीनपर्यंत तू आणि पॅपिलॉन कुठं दिसत नाहीत असं मी कोणालाही बोलणार नाही. तोपर्यंत बॉर्डर लोकांची झोप झालेली असेल आणि पुढे ती उडेल.'

'आम्ही मासे पकडताना मोठ्या लाटेबरोबर वाहून गेलो असा आरडाओरडा तू का नाही करत?'

'नको. मला जास्त गुंतागुंत आवडत नाही. मी सांगेन, 'साहेब, पॅपिलॉन आणि सिल्व्हेन आज कामाला आले नाहीत. मी एकटयानंच काम पुरं केलं.' यापेक्षा जास्त नाही की कमी नाही.'

□

# प्रकरण पंचवीस : यशस्वी पलायन

रविवार : संध्याकाळचे सात. मी नुकताच झोपून उठलो होतो. काल सकाळपासून मस्त ताणून दिली होती. नऊपर्यंत चंद्र उगवला नव्हता. त्यामुळे सर्वत्र काळाकुट्ट अंधार होता. आकाशात काही तारे. डोक्यावरून काळे ढग धावत होते. आम्ही ब्लॉक सोडून बाहेर पडलो. ते जरी नियमात बसत नव्हतं तरी आम्ही नेहमीच रात्री मासे धरायला किंवा बेटावर नुसतं भटकायला बाहेर पडत असल्यामुळे कोणालाच त्यात गैर वाटलं नाही.

मी सिल्व्हेन आणि चॅंग; तिघंजण बेटाच्या उत्तर टोकाकडे निघालो. आम्ही मार्ग वेगानं कापत होतो. एका गुहेत लपवून ठेवलेले आमचे 'तराफे' बाहेर काढले. वारे जोरात वाहत असल्यामुळे विशिष्ट प्रकारचा घोंघावण्याचा आवाज वातावरणात भरला होता. आमच्या अंगावर गारठ्यामुळं काटा आला. दोघांच्या मदतीनं माझा तराफा मी खडकावर वरच्या टोकाला चढवला. अखेरच्या झटकेला मी माझं डावं मनगट पोत्यांना एकत्र बांधणाऱ्या दोराला अडकवायचं ठरवलं. मला एकदम तराफ्यावरचा ताबा सुटायची भीती वाटली होती. एकटाच वाहून गेलो तर तिथेच शेवट व्हायचा. सिल्व्हेन समोरच्या खडकावर तयारीत उभा राहिला. चंद्र बराच वर आला होता. आम्हाला सारं काही स्पष्ट दिसू लागलं होतं.

मी डोक्याभोवती एक रुमाल गुंडाळला. सहा लाटा होईपर्यंत थांबायचं होतं. काही मिनिटांचाच काय तो अवकाश. चॅंग माझ्या बाजूला आला होता. त्यानं माझ्या गळ्याभोवती हात टाकून गालाचं एक चुंबन घेतलं. लिझेट येऊन आपटताना तिचा जोर मला सहन व्हावा म्हणून खडकावर आडवं पडून तो माझा पाय घट्ट धरणार होता.

'अजून फक्त एकच!' सिल्व्हेन ओरडला. 'मग आपण निघायचं.' तो त्याच्या तराफ्यासमोर उभा होता. पाणी उसळून वर आल्यावर तराफ्याचं रक्षण करणं अत्यावश्यक होतं. मीही त्याच स्थितीत होतो. शिवाय चॅंगनं मला घट्ट धरलंच होतं–तोही उत्तेजित बनल्यामुळं माझ्या पोटऱ्यांत त्याची नखं घुसली तरी त्याला पत्ता नव्हता.

आमची लिझेट धावत आली, मोठमोठ्या मनोऱ्यांएवढी उंच. आम्ही होतो त्या दोन्ही खडकांवर आदळली, नेहमीच्याच जोषात. सगळीकडे पाणीच पाणी.

निमिषार्धात मी मित्राआधी मला पाण्यात झोकून दिलं. तोही मागोमाग होताच, आणि आमचे दोन्ही तराफे लीलया पेलून लिझेट समुद्राच्या दिशेला उलट धावत सुटली. पाच मिनिटांच्या आत आम्ही किनाऱ्यापासून तीनशे यार्डापर्यंत वाहत गेलो. सिल्व्हेन अद्याप त्याच्या तराफ्यावर चढला नव्हता. मी दोन मिनिटांतच त्यावर स्वार झालो होतो. चँग घाईघाईनं ड्रेफसच्या जागेवर गेला होता. तिथून तो पांढरा रुमाल हलवत होता—अखेरचा रामराम. आता धोक्याची कक्षा ओलांडूनही पाच मिनिटं लोटली होती. पुढची लिझेट डेव्हिल बेटाला तडाखा देऊन केव्हाच परतली होती. ' लाटा इतक्या नियमित आणि संथ होत्या की त्यांचाच एक भाग बनून मी पुढे सरकत होतो. फेस अजिबात नव्हता. तराफे उडत नव्हते त्यामुळे कोलमडण्याचा प्रश्नच नव्हता.

पुन्हा एकदा लाट उंचावर गेली आणि चँगच्या हातातील रुमाल मला दिसला, तो शेवटचाच. सिल्व्हेन माझ्यापासून फार दूर नव्हता—फार तर पन्नास यार्ड पलीकडे असेल. अनेक वेळा हात उंचावून तो आपला विजयाचा आनंद दर्शवत होता.

त्या रात्री प्रवास सुखाचा झाला. समुद्राची दिशा बदलल्याची जाणीव मला स्पष्टपणे झाली होती. मेनलँडकडे आता आम्ही निघालो होतो.

क्षितिजावर सूर्य दिसू लागला, त्या अर्थी सहा वाजले असावेत. आम्ही इतके पाण्याला चिकटून होतो की किनारा दिसणं शक्यच नव्हतं. पण एवढं कळत होतं की तो आमच्यापासून बराच लांब होता. अंदाजच करायचा तर पंधरा मैल तरी अंतर असेल.

विजय आणि यशाच्या भावनेमुळे मला मनापासून हसू फुटलं. तराफ्यावर बसून बघावं काय ? तसं केलं तर वारा मला जोरात ढकलेल. पाठीमागून त्याचा जोर होता.

मी उभा राहिलो. मनगट सोडवलं आणि ती साखळी पट्ट्याला अडकवली. हात उंचावून ते वाऱ्यावर सुकवले. आता मस्त मजेत सिगारेट ओढावी. मी तिचे प्रदीर्घ झुरके घ्यायला सुरुवात केली, तोंडातून धूर मात्र सावकाश सोडत होतो. माझी भीती आता पार नष्ट झाली होती. खडकावरून पाण्यात उडी घेताना भीतीमुळे माझ्या पोटात केवढा खड्डा पडला होता हे सांगण्यात काहीच अर्थ नाही. हळूहळू मी ताळ्यावर आलो होतो. आता मात्र खरंच शांत झालो. सिगारेट संपल्यावर खोबऱ्याचाही समाचार घेतला. त्यावर पुन्हा सिगारेट. लाटांच्या शिखरावर असताना आम्हाला एकमेकांचं दर्शन होई. तळपत्या उन्हामुळे माझा मेंदू पेटला होता. रुमाल ओला करून मी तो पुन्हा डोक्याला गुंडाळला. लोकरीचा स्वेटर काढून टाकला. त्याच्यामुळं अंगाची लाही लाही होत होती.

बापरे ! माझा तराफा उलटला होता आणि मी अगदी बुडण्याच्या बेतात होतो. त्या लाटांच्या दोन तडाख्यांनी मला हादरवून सोडलं. साखळी पट्ट्याला अडकवलेली असल्यामुळे किती प्रयत्न करूनही तराफा सरळ होता होईना. मला हालचालीला पुरेशी मोकळीकच मिळत नव्हती. अखेर पडत–धडपडत मी कसाबसा पुन्हा त्यावर स्वार झालो. माझे प्राण थोडक्यात वाचले होते. साखळी सोडवून मोकळंच बसावं म्हणून खटपट करू लागलो, पण घाबरून गेल्यामुळं हाताची बोटं गळून गेली होती. साखळी सोडवता नाहीच आली. पाच मिनिटं ! नंतर मात्र ईश्वराच्या कृपेनं मी तिच्यापासून मुक्त झालो. तोपर्यंत पार वेड लागायची पाळी आली !

मी जरी सुरक्षित स्थितीत बसलो होतो, तरीही तराफा पहिल्यासारखा सरळ झाला नव्हता. थकून गेल्यामुळे तेवढी शक्तीही माझ्यात नव्हती. होतो त्या स्थितीत ठेवण्यासाठी फक्त जोर लावत होतो. थोडं कडेला असलो म्हणून काय बिघडलं ! आणि पुन्हा कशातही अडकवून घेण्याचा मूर्खपणा करायचा नाही. एकदा वाचलो होतो, पुन्हा नशीब हात देईलच असं नाही.

निर्दय सूर्य माझे पाय आणि बाहू जाळत होता. चेहराही पेटल्यासारखा जळजळत होता. मला वाटतं पाण्याचा शिडकावा केल्यामुळे परिस्थिती आणखीनच बिघडली. ते सुकल्यावर जखमांच्या वेदना अधिकच वाढल्या होत्या.

वारा पडल्यामुळे गतीच येत नव्हती. त्यापेक्षा वादळ चाललं असतं.

उजव्या पायात एकाएकी गोळे आले आणि मी मोठ्यानं ओरडलोच. जणु काही कोणी धावत येऊन मदत करणार होता ! दुपारचे चार वाजून गेले आणि सूर्य पश्चिमेला कलला. निघाल्यापासून भरती–ओहोटीचं चौथं आवर्तन चालू होतं. आता पूर्वीपेक्षा जास्त वेगानं मी किनाऱ्याकडे जाऊ लागलो.

त्यानंतर मात्र मी सिल्व्हेनला नेहमी पाहू शकत होतो, तोही मला. लाटा फार उंचावर जात नसल्यामुळे तो जवळजवळ केव्हाच अदृश्य होत नव्हता. त्यानं शर्ट काढून टाकलेला दिसला. कमरेच्या वर तो उघडाच होता. त्यानं मला हात केला. तो माझ्यापुढे तीनशे यार्डांवर होता, पण समुद्राच्या बाजूला. सावकाशपणे तो हाताचा उपयोग वल्ह्यासारखा करीत होता. तराफ्यावर आडवं पडून मीही हात मारायला सुरुवात केली. त्यानं गती रोखली आणि मी वेगात गेलो, तर आमच्यातलं अंतर कमी होणार होतं. माझी साथीदाराची निवड चुकली नव्हती. अखेर मी हात थांबवले. शक्तीचा निरर्थक क्षय नको. मला भूक आणि तहानही लागली होती. त्यासाठी तराफा पूर्णपणे सरळ करणं आवश्यक होतं. कारण पाण्याची पिशवी आणि नारळ त्या बाजूला होते. ओठ फुटून जळजळत होते. उसळत्या लाटेच्या विरुद्ध बाजूला लोंबकळून तराफा उलटा होऊ शकणार होता—तोच एक मार्ग होता. पाच प्रयत्नांनंतर मी त्यात सफल झालो, पण थकवा इतका आला की रांगत तराफ्यावर जाऊन बसणंही जमलं नाही.

क्षितिजाला टेकलेला सूर्य काही क्षणातच अदृश्य होणार होता. म्हणजे जवळपास सहा वाजले होते. रात्र सुखाची जावी. सारं शरीर सतत ओलंचिंब असल्यामुळं गळून गेलं होतं.

आधी दोन नारळांचा फडशा पाडून पाणी प्यालो. तृप्त. हात वाऱ्यावर सुकवून सिगारेटचाही आस्वाद घेतला— त्याची गरजच होती. अंधार पडण्यापूर्वी सिल्व्हेननं रुमाल हलवून मला ' गुडनाइट ' केलं. आमच्यातलं अंतर अजूनही तेवढंच राहिलं होतं. पाय पसरून मी आरामात बसलो. स्वेटर त्यातल्या त्यात वाळवून अंगात घातला.

ओला असूनही एकदम ऊब आली. सूर्य पाण्यात बुडल्यावर लगेच थंडी जाणवू लागली होती.

वाऱ्याचा जोर वाढू लागला. तो पूर्वेकडून वाहत होता. त्या बाजूला एकही ढग नव्हता. म्हणजे तूर्त तरी पावसाची शक्यता नाही.

थकवा फार आला तर पुन्हा साखळी पट्टयात अडकवावी का? पहिला अनुभव वाईट आला होता, पण अगदी त्राण खलास झालं तर तोही धोका पत्करावा लागेल. आणि माझ्या लक्षात आलं की साखळीच्या अपुऱ्या लांबीमुळं सगळा घोटाळा झाला होता. तीन, चार फूट, पोत्याला गुंडाळण्यातच वाया गेले होते. एक टोक तराफ्याला अडकवलं तर पुरेशी लांबी मिळणार होती. हालचाली मोकळेपणानं करता येणं शक्य होतं. मागची चूक या वेळी सुधारली, पुन्हा साखळी पट्टयात अडकवली. आता मन निर्धास्त झालं. कोणत्या क्षणी झोप लागेल आणि तराफ्याचा संबंध सुटेल असं एकसारखं वाटत होतं, ती भीती दूर झाली होती.


वाढत्या वाऱ्यामुळं होणाऱ्या समुद्राच्या चढ-उतारातही तराफा उत्तमपणे काम देत होता. आकाशात लाखो तारे चमचम करीत होते. मित्र केव्हाच दिसेनासा झाला होता. आजची रात्र खरी महत्त्वाची, कारण वारा जर आत्तासारखाच वाहत राहिला तर सकाळपर्यंत खूपच अंतर कापलं जाणार होतं. उत्तररात्री वाऱ्याचा जोर वाढतच गेला. हळूहळू समुद्रातून लालसर चंद्र वर आला. त्यावरच्या काळसर ठिपक्यांमुळे तो माणसाच्या चेहेऱ्यासारखा भासत होता.

रात्रीचे दहा. चंद्र जसजसा वर आला, तसतसा अंधार कमी होत गेला. लाटांच्या कडा चंदेरी दिसू लागल्या, त्याचा अनोखा चकचकीतपणा डोळ्यांना फारसा सुखद नव्हता. सूर्य आणि खाऱ्या पाण्यामुळे आधीच ते दुखावले होते, आता चंद्रप्रकाशामुळे तिथे शस्त्र खुपसल्यासारखं वाटत होतं. तशा परिस्थितीतही मी एकामागून एक तीन सिगारेट्स ओढल्या.

तराफा सावकाश पुढे सरकत होता. आता पाय पसरून जास्त वेळ बसणं शक्य नव्हतं. कारण दोन्ही पायांत गोळे आले होते. कमरेपर्यंत मी सतत भिजलेलो होतो. छाती मात्र कोरडी होती. वाऱ्यामुळे स्वेटर पूर्ण सुकला होता. डोळे जड झाले होते. मी ते मिटून घेतले; पण स्वतःला एकसारखा बजावत होतो. – 'भल्या गृहस्था, झोपून चालणार नाही!' बोलणं सोपं होतं; पण आवरणं शक्य नव्हतं. छे! गुंगीविरुद्ध मी एकसारखं झगडत होतो. पूर्ण जागृतावस्थेत आलो की घण घातल्यासारखं डोकं दुखत होतं. शेवटी लायटर काढून मी उजव्या हाताला किंवा मानेला चटके द्यायला सुरुवात केली.

मला भयानक काळजी लागली होती. गाढ झोप लागल्यावर समुद्रात पडलो तरी जाग येईल का नाही? साखळी अडकवणं हिताचंच होतं. तराफ्याची संगत सुटता कामा नये, तो माझा प्राण आहे. पाण्यात कोसळून पुन्हा कधीही शुद्धीवर न येणे हा दुर्दैवाचा कळसच होईल.

ही दुसरी रात्र संपत आली. वाजले किती असावेत? चंद्राच्या पश्चिमेकडील सरकण्यावरून पहाटेचे तीन शक्य आहेत. आम्ही गेले तीस तास समुद्रात होतो. लाटांचं पाणी आता नखशिखांत भिजवत




पॅपिलॉन दुसऱ्या वेळी वरील मार्गाने यशस्वीरीत्या निसटला

होतं. त्यामुळे एक फायदा नक्कीच झाला. झोप पार उडाली. थंडीमुळे कुडकुडत होतो. पाय लाकडासारखे ताठ झाले होते. हाताच्या साहाय्यानं एक एक पाय वळवून मी मांडी घालून बसलो. पायाचे अंगठे बधिर झाले होते.

तशा स्थितीत मी बराच वेळ बसलो. सिल्व्हेनला बघायचा मी प्रयत्न केला; पण चंद्राचा प्रकाश त्या दिशेनं सरळ तोंडावर येत असल्यामुळे काहीच दिसू शकत नव्हतं. त्याच्याकडे तराफ्याला अडकवून घेण्यासाठी काहीच नव्हतं. कोणी सांगावं तो अजूनही पोत्यांवरच होता का नाही. निराश होऊन मी शोध घेत होतो; पण उपयोग झाला नाही.

वाऱ्याचा जोर आणि लाटांच्या लयीला आता मी सरावलो होतो. त्यांचाच एक भाग असल्याप्रमाणे मी तराफ्यावर बसून होतो.

सर्व दिशांना मी डोळे फाड–फाडून इतका वेळ पाहत होतो की त्यामुळेही थकून गेलो. शेवटी एक कल्पना डोक्यात शिरली. हाताची बोटं वाऱ्यावर कोरडी करून-घेतली. अंगठ्याशेजारची दोन दोन बोटं तोंडात घालून मी जीव खाऊन शिट्टी वाजवली. नंतरच उत्तराची वाट पाहू लागलो. सिल्व्हेनला तशी शिट्टी वाजवता येते का ? ठाऊक नाही. निघण्यापूर्वीच आपण तसं का ठरवलं नाही याची मला चीड आली. उत्तर आलंच नाही. पुन्हा दोन्ही हात तोंडाशी कर्ण्यासारखे धरून ' हु–हू ' असा मोठ्यानं आवाज काढला. त्यावर फक्त वाऱ्याचा टाहो आणि पाण्याचं थप्–थप्.

त्यापुढे मला सहन होईना. तोल सावरत मी साखळी धरून उभा राहिलो. लाटांवर आरूढ झाल्यावर सर्वांत वरच्या टोकाला सगळीकडे दृष्टिक्षेप टाकले. डाव्या–उजव्या बाजूला आणि समोर काहीच दिसत नव्हतं. तो माझ्या मागे पडला काय ? उभं राहिलेल्या स्थितीत मागं बघायचं धाडस काही मला झालं नाही. फक्त दूरवर डाव्या बाजूला एक गडद रंगाची ओळ तेवढी दिसली. खात्रीनं ते जंगलच होतं. शंकाच नव्हती. दिवस उजाडला की झाडं स्पष्ट दिसतील, या विचारानं खूप बरं वाटलं. ' सूर्योदयाबरोबर जंगल दिसायला लागेल, पपी. ईश्वराच्या कृपेनं मित्रसुद्धा तसाच दिसावा. '

पहाटेचे साधारण पाच वाजले असावेत. सगळाच अंदाज करायचा ! चंद्र बुडण्याची वेळ जवळ आली. मृगनक्षत्र आणि सप्तर्षि केव्हाच दिसेनासे झाले होते, पण ध्रुवतारा उत्तरेकडे चमकत होता. वाऱ्याचा वेग वाढत होता. याचा अर्थ लाटांची उंची आणि खोली रात्रीपेक्षाही वाढणार होती.

आतापर्यंत सारं काही सुरळीतपणे पार पडलं होतं, हे नाकारण्यात अर्थ नव्हता. यापुढचा काळच कठीण होता. परीक्षेचा तोच दिवस उघडण्याच्या बेतात होता.

काल सकाळी सहा ते संध्याकाळी सहा या वेळात उन्हामुळे मी वाईट प्रकारे भाजून निघालो होतो. आज दिवस उगवल्यावर त्याच संकटाला तोंड द्यायचं होतं. ओठ केव्हाच फुटून गेले होते, तरी अद्याप रात्रीचा गारठा होता. कोपरांच्या पुढील हात तसेच सोलून निघाले होते. निदान दड तरी झाकून घ्यावेत. स्वेटर अंगात ठेवणं सहन होईल का ते बघावं. पोत्यांच्या सतत घर्षणामुळे मांड्यांचा खालचा भागही हुळहुळा झाला होता. खाऱ्या पाण्यामुळे वेदना वाढतच होत्या.

मित्रा, हा धाडसी प्रयत्न खरोखर कौतुकास्पद आहे. मेनलॅंडला पोचण्याची नव्वद टक्के शाश्वती आहे, तेही जिवंतपणे. नक्कीच गौरवपूर्ण कृत्य. तिथे पोचेपर्यंत कातडी जळाली किंवा अगदी अर्धमेला झालो तरी सुटकेसाठी फार मोठी किंमत दिली असं होणार नाही आणि अद्याप एकही शार्क दिसला नाही. कल्पना करू शकता ? ते सगळे सुट्टीवर गेले होते का ? तुझं दैव जोरावर होतं बेट्या ! ही खरी सुटका. इतर प्रयत्न व्यवस्थित आखणी करून, पूर्ण तयारीनिशी केले होते आणि काहीही न योजता, बेदरकारपणे या वेळी टाकलेली उडीच यशस्वी होत आहे. अशा प्रकारे अद्याप कोणीही पळालेलं नव्हतं.

वारा आणि प्रवाहाचा जोर असेच कायम राहिले तर दुपारपर्यंत हमखास जमिनीला स्पर्श करू शकू.

माझ्या मागून जळजळीत गोळा शस्त्र परजू लागला. तावडीत सापडेल त्याला आपल्या आगीत नष्ट करण्याचा त्यानं निश्चयच केला असावा. थोड्याच अवधीत वातावरण बदललं. वारे कोमट होऊ लागले. तासाभरात कडक ऊन्ह पडणार होतं. आपण अजूनही भानावर आहोत, सुस्थितीत आहोत या विचारामुळे पाठीपासून डोक्यापर्यंत एक लहर चमकून गेली. हातावर काटा उभा राहिला. धमन्यांमधून रक्त जोरात धावू लागलं. अगदी पाण्यामुळे थंड पडलेले पायही या नव्या भावनेबरोबर ' जिवंत ' झाले.

आता झाडांचे शेंडे स्पष्ट दिसू लागले. अंतर फार राहिलं नसणार हे लक्षात आलं. सूर्य थोडा वर आला की उभं राहून सिल्व्हेनला शोधावं असं मी ठरवलं.

एका तासाच्या आत उन्हं खूपच चढली. माझा डावा डोळा सुजल्यामुळं अर्धवट बंद झाला होता. पाण्यानं तो चोळल्यावर आग आग झाली. स्वेटर तात्पुरता काढून टाकला. उकाडा मनस्वी होता. फार चटके बसायला लागले तर पुन्हा घालता येईल.

नेहमीपेक्षा मोठ्या लाटेनं तराफ्याला हवेत उचललं. वरच्या टोकाला अचानक क्षणभरच माझ्या मित्राचं मला दर्शन घडलं. तो तराफ्यावर उघडा होऊन बसला होता. माझ्याकडे त्याचं लक्ष गेलं नाही. डाव्या बाजूला थोडं पुढे, सुमारे दोनशे यार्डांवर तो तरंगत होता. वारा त्याच दिशेला वाहत होता. स्वेटरच्या दोन्ही बाह्या हातात घालून, हात जर उंचावले तर त्याचा शिडासारखा उपयोग होऊन आमच्यातलं अंतर कमी होऊ शकणार होतं. अर्धा तास त्या प्रकारे केल्यावर मी थांबलो. कारण हातातली ताकद संपुष्टात आली होती, पण अंतर थोडं तरी कमी झालं असावं !

हुर्यो ! पुन्हा सिल्व्हेन दिसला. आमच्यात शंभर यार्डांचंही अंतर नसावं. पण तो करतोय् काय ? त्याला माझ्याबद्दल काळजी वाटतीय् का नाही ? लाटांच्या हेलकाव्यांबरोबर तो दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदाही दिसला. डोळ्यावर आडोसा धरून तो समुद्रात मला शोधत होता. मूर्ख माणसा ! मागे पहा की. त्यानं एकदा पाहिलंही, पण मी बहुधा दिसलो नाही.

उभा राहून एक जोरदार शिट्टी वाजवली. पुढच्या लाटेवर आरूढ झाल्यावर तोही उभा असलेला दिसला. त्यानं मला पाहिलं होतं. हातातला स्वेटर हलवून त्यानं ' गुडमॉर्निंग ' केलं. कमीतकमी वीस वेळा गुडमॉर्निंग केल्यावरच आम्ही खाली बसलो. लाटांचा चढ-उतार एकाच लयीत चालला असल्यामुळं–दोन्ही ठिकाणी–वरच्या स्थितीत

दर वेळी आम्ही इषारे करू लागलो. गेल्या पाळीला त्यानं जंगलाकडे हात केला. किनारा फार तर सहा मैलांवर असेल. काही तपशीलही दिसू लागले होते. मित्राकडे आणि झाडांकडे बघण्याच्या नादात तोल जाऊन मी एकदम तराफ्यावर आडवा झालो—अत्यानंदामुळे मला इतकं भरून आलं की मी वेड्यासारखा रडायलाच लागलो. अश्रूंमुळे सुजलेल्या डोळ्यांना आराम वाटला, ते स्वच्छही झाले. देव आज तुझ्या सोबत आहे, पपी. तो निसर्गाच्या सगळ्या तत्त्वांमध्ये भरलेला आहे. समुद्राच्या अथांगपणात, कधीही न संपणाऱ्या लाटांमध्ये, समोरच्या प्रचंड झाडांमध्ये. भोवतालच्या भव्य गोष्टींपुढं आपण किती क्षुद्र आहोत. अशा रीतीनं मुद्दाम शोध न घेताच ईश्वराचा साक्षात्कार होत असावा—तो आपोआप जाणवायला हवा. अंधारकोठडीमध्ये हजारो तास घालवतानाही काळोखात मला त्याचं अस्तित्व असंच जाणवलं होतं. त्या वेळी काळोख होता, आत्ता भर उजेडात मी देवाला स्पर्श करू शकतो. तो माझ्यात आणि सभोवार भरलेला आहे. तो कानात कुजबुजलासुद्धा, 'तू दुःखात आहेस आणि अजूनही खूप दुःखं बाकी आहेत; पण या वेळी मी तुझ्या पाठीशी राहायचं ठरवलेलं आहे. मी तुला आश्वासन देतो की तुझा विजय होईल आणि तू स्वतंत्र होशील!'

माझ्यावर कोणतेही धार्मिक संस्कार झाले नव्हते. धर्माचा श्रीगणेशाही मला ठाऊक नव्हता. माझं ज्ञान इतकं अगाध होतं की जीझसचा बाप कोण आणि आई खरंच मेरी होती का ते अद्याप ठाऊक नव्हतं. पण इतकं घोर अज्ञान असूनही परमेश्वरप्राप्ति शक्य होती. त्यात कशाचीही आडकाठी आली नाही. त्याला वारा, सागर, सूर्य, जंगल, तारे यांच्यात—इतकंच काय पण माशांमध्येही—बघता आलं पाहिजे.

सूर्य भराभर वर येऊ लागला. सकाळचे दहा वाजले असावेत. रुमाल ओला करून मी पुन्हा डोक्याला गुंडाळला. खांदे, पाठ आणि दंड प्रचंड भाजत असल्यामुळे स्वेटरही चढवला. पाय सतत पाण्यात होते तरीही लालबुंद झाले होते.

किनारा अगदी जवळ आल्यामुळे लाटा त्या दिशेला सरळ जात होत्या. झाडीचा बारीकसारीक तपशील दिसू लागला होता. त्यावरून गेल्या चार–पाच तासांतच खूप अंतर काटलं असावं. सुटकेच्या पहिल्या प्रयत्नाचे वेळी अंतर कसं मोजावं हे शिकलो होतो. स्पष्टपणे वस्तू दिसू लागल्यावर तुम्ही फार तर तीन मैलांवर असता. इथून तर झाडांच्या घेरामधील फरक आणि पाण्यात शिरणाऱ्या फांद्याही समोर दिसू शकत होत्या.

पक्षी वरून उडू लागले! दुपार झाल्यामुळे सूर्यही बरोबर डोक्यावर आला होता. मला जिवंत जाळायचा त्याचा विचार असावा. डोळ्यांची आग सतत होत होती. ओठ आणि नाकाची त्वचा तर केव्हाच निघून गेली होती. लाटांचा आवाज कानठळ्या बसवत होता.

सिल्व्हेन जवळजवळ सतत दिसत होता. तो क्वचितच अदृश्य होई.

किनारा अर्ध्या मैलावर आला. गुलाबी आणि पांढरे पक्षी चिखलात आपल्या चोची बुडवत होते आणि पाण्यावर उड्या मारत होते. हजारो पक्षी. सहा फुटांच्यावर ते सहसा उडत नव्हते. ते सुद्धा पाण्याच्या तुषारांपासून बचाव करण्यासाठी. पिवळसर गढूळ रंगाचा चिखल सर्वत्र पसरला होता. आम्ही इतके जवळ आलो होतो की पाण्याची किनाऱ्यावरील शेवटची निशाणीही दिसत होती.

थप्, थप्. नंतर दोन–तीन यार्ड आगेकूच. मी तराफ्यावरून चिखलात शिरलो होतो. तरंगण्याइतकं पुरेसं पाणी आता तिथे नव्हतं. दुपारचे दोन वाजले असावेत. म्हणजे निघून चाळीस तास लोटले होते. तीनच्या सुमारास भरती सुरू होईल. रात्र पडण्याच्या बेताला मला झाडीत शिरता येईल. तोपर्यंत धीर धरला पाहिजे. आता साखळी जास्त घट्ट धरली पाहिजे. या अखेरच्या धोकादायक क्षणी तराफ्यावरून खाली कोलमडायला नको, कारण या वेळी पोती पुढे न सरकता लाटा सरळ अंगावर येत होत्या. दोन तीन तास तरी अजून खाली उतरून चालणार नव्हतं.

सिल्व्हेन आता उजव्या बाजूला सुमारे शंभर यार्डांवर होता. काहीसा आघाडीवरच. माझ्याकडे पाहून त्यानं हात उंचावले. मला वाटलं की त्याला काही तरी बोलायचं होतं; पण घशातून शब्द फुटत नव्हते. लाटांचा आवाज कमी झाला होता. आम्ही चिखलावरच होतो, पाणी जवळजवळ नव्हतंच. जंगलापासून मी पाचशे यार्डांवर होतो; सिल्व्हेन यापेक्षाही जवळ होता. पण तो मूर्ख माणूस आता हे काय करतोय्? उभा राहून त्यानं तराफा सोडला होता. त्याचं डोकं ठिकाणावर नाही का? निदान त्यानं चालायला तरी सुरुवात करू नये; नाही तर जसजसा तो एकेक पाऊल पुढे जाईल, तसा चिखलात फसेल. त्याला परत तराफा गाठणंही जमणार नाही. मी शिट्टी वाजवायचा प्रयत्न केला, पण ते जमलं नाही. त्याला थांबवण्यासाठी ओरडावं म्हटलं तर आवाजही उमटेना. चिखलातून बुडबुडे येत होते. हा प्राणी बघता बघता त्यात पुरता फसला. बहुतेक त्याचे दिवस भरले होते. बहुतेक काय, नक्कीच!

सिल्व्हेन मागे वळला. माझ्याकडे पाहून त्यानं काही खुणा केल्या. त्या मला बिलकूल समजल्या नाहीत. मीही रागारागानं खूप हातवारे केले. मला सांगायचं होतं 'नको, नको!' तराफ्यापासून हलू नकोस! नाही तर तुला जंगलापर्यंत कधीच जाता येणार नाही!' पोत्यांपासून तो किती दूर होता ते इथून नीट समजत नव्हतं, आधी वाटलं की अंतर जास्त नाही, त्यामुळे त्यानं हात लांबवले तर तराफा पकडता येईल.

पण लगेच माझ्या लक्षात आलं की तो बराच पुढे गेलेला होता. मागं फिरणं आता अशक्य झालं होतं. चिखलात तो पुरता अडकला होता. मला एक आरोळी ऐकू आली. लगेच पोत्यावर आडवं पडून मी चिखलात बाजूनं हात मारायला सुरुवात केली, सर्व शक्तीनिशी. त्याचा उपयोग होऊन सुमारे वीस यार्ड मी पुढे आलो. नंतर पोत्यावर उभं राहिल्यावर माझा प्रिय साथीदार स्पष्टपणे दिसू लागला. बिचारा आता कमरेपर्यंत बुडला होता. त्याच्या तराफ्यापासून तो तीस फूट पुढे सरकला होता. बंद पडलेली माझी वाचा त्या दृश्याच्या धक्क्यामुळे पुन्हा सुरू झाली. मी मोठ्यानं ओरडलो, 'सिल्व्हेन! हलू नकोस! चिखलात स्थिर उभा राहा. पाय बाहेर काढता येतात का ते पाहा. वाऱ्याबरोबर माझे शब्द त्याच्यापर्यंत गेले. मान हलवून त्यानं होकार दिला. मी पुन्हा हात मारायला सुरुवात केली. काळजीनं बेभान झाल्यामुळे माझ्यात अतिमानवी शक्ति निर्माण झाली होती. आणखी तीसपस्तीस यार्ड अंतर मी काटलं. त्यात एक तास गेला, पण मी आता त्याच्या बराच जवळ आलो होतो—साधारण दीडशे फुटांवर. नीट दिसेना.

मग पुन्हा बसलो. हात, चेहरा, अंग—सगळं चिखलानं माखलं होतं. डाव्या डोळ्यात खारा चिखल शिरल्यामुळे आग–आग होत

---

**'हे ईश्वरा! तुझी कार्यपद्धती अगम्य आहे; तुझ्याविरुद्ध माझी कसलीही तक्रार नाही!'**

---

कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा

# तुम्ही सौ.ला विसरू शकता!

आपल्या पश्चात् आपल्या आयुर्विम्याची रक्कम आपल्या पत्नीला मिळावी अशी व्यवस्था लग्नानंतर करण्यास कित्येकजन विसरतात ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे.

**यासंबंधी तुम्ही काय करायला हवे या आणि इतर अनेक प्रश्नांची उत्तरं खाली दिली आहेत.**

### १ विमाअर्जात संपूर्ण माहिती भरा

आवश्यक ती सर्व माहिती आपण मुळातच भरली आहे याची खात्री करुन घ्या. त्यामुळे पुढील विलंब टळतील.


### २ पॉलिसीची काळजी

तुमची पॉलिसी म्हणजे एक महत्वाचा दस्तऐवज तिची नीट काळजी घ्या. ती कुठे ठेवली आहे हे आपल्या पत्नीस वा जवळच्या स्नेह्यास सांगून ठेवा.



### ३ तुमच्या एजंटांशी संपर्क ठेवा

पॉलिसीविषयक सर्व कामे व मार्गदर्शन ते आनंदाने करतील.



### ४ हप्त्यांचा भरणा

तुम्ही एखादी पॉलिसी घेता तेव्हा तीवरील हप्ते कुठे भरावयाचे हे तुमचे एजंट किंवा आयुर्विमा महामंडळ तुम्हांला कळविते. हप्ते भरण्याच्या तारखांची नीट नोंद करुन ठेवा. हप्ते वेळच्या वेळी भरत चला. तसे न झाल्यास पॉलिसी रद्दबातल होण्याचा संभव आहे. ती पुन्हा चालू करावयाची झाल्यास आरोग्य-विषयक तपासणी पुन्हा करावी लागेल.

## काय कराल? कोठे जाल? कुणाला लिहाल?



पुढे उल्लेखिलेल्या कोण-त्याही कामासाठी, तुमच्या अखेरच्या हप्ते-पावतीत उल्लेखिलेल्या महामंडळाच्या कचेरीशी, किंवा तुम्ही विभागीय मुख्य कचेरी असलेल्या शहरात रहात असल्यास संबंधित कचेरीशी संपर्क साधा.

### ५ हप्ते भरण्यासंबंधीची नोटीस


केव्हा केव्हा या नोटिसा पोष्टात गहाळ होतात. खरं तर त्यांची तशी आवश्यकताही नसते. हप्ते भरताना पॉलिसी नंबर, हप्ते भरण्याची नियमित तारीख, पैसे रोखीने वा कसे भरले याची माहिती इ. तपशील देणारे चलन बरोबर जोडा. ( आधीच्या हप्ते-पावतीचा वा पॉलिसीचा उल्लेख करा).

### ६ कर्जावरील व्याज

कर्जावरील व्याज नियमित व वेळच्या वेळी भरा. नाही तर पॉलिसी रद्दबातल होण्याचा संभव आहे.

### ७ पत्त्यातील बदल

पत्त्यात बदल झाल्यास तत्संबंधी आवश्यक तो तपशील व पॉलिसी नंबर देऊन संबंधित कचेरीस कळवा.



### ८ पॉलिसीचा विभाग बदलल्यास

अखेरचा हप्ता तुम्ही ज्या कचेरीत भरला असाल ती कचेरी यासंबंधी सल्ला देईल. तोवर त्याच कचेरीत हप्ते भरीत रहावे हे श्रेयस्कर.

### ९ वारसाच्या नावातील बदल

तुमची पहिली पॉलीसी तुमच्या लग्नाआधी काढली असल्यास, तशी तुमची इच्छा असेल तर, ती आपल्या पत्नीच्या वा मुलाच्या नांवे करू शकाल.



### १० पॉलिसीचे पुनरूज्जीवन

हप्ते वेळीच न भरल्याने पॉलिसी रद्द करण्यात आली असेल तर ती पुन्हा चालू करून घेणे तुमच्या हिताचे आहे.

### ११ पॉलिसीच्या अटी-नियमांतील बदल

या बाबतीत नजिकची विभागीय कचेरी वा आपले एजंट यांना भेटा.

### १२ पॉलिसी हरवल्यास

दुसरी प्रत मिळविण्यासाठी ती जेथून घेतली असाल किंवा जेथे तत्संबंधीची सेवा घेत असाल त्या कचेरीशी संपर्क साधा. पॉलीसी कशी हरवली, ती शोधण्यासाठी तुम्ही केलेले प्रयत्न यासंबंधी तपशीलवार माहिती द्या. शक्य तर पॉलिसी नंबर, हप्ते रोखीने वा कसे भरत होता तेही कळवा.



### १३ क्लेम्स

क्लेम्स करतांना, पुढची कामे विनाविलंब व्हावीत यासाठी आवश्यक ते सर्व दस्तऐवज पुरवा. कोणते दस्तऐवज लागतील त्यांची माहिती विभागीय कचेरीत मिळेल.

## महत्वाचे

**आयुर्विमा महामंडळाशी पत्रव्यवहार करताना प्रत्येकवेळी तुमच्या पॉलिसीचा नंबर लिहा. आपल्या चालू पॉलिसींची संख्या कित्येक दशलक्षांच्या घरात आहे. तुम्ही चुकीचा पॉलिसी नंबर लिहिल्यास तुमची पॉलिसी एवढ्या प्रचंड कागदपत्रांतून शोधून काढणे जवळ जवळ अशक्यच आहे. त्यामुळे वेळेचा नसता अपव्यय होईल. दगदग नि वैतागही वाटेल. एवढ्यासाठी पॉलिसीचा नंबर अचूक लिहा.**

*संदर्भासाठी ही जाहिरात कापून जवळ ठेवा.*

## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया

योगक्षेमं वहाम्यहम्

कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा • कापून ठेवा

RADBUS/LIC/AS-7

होती, तो स्वच्छ करायचा प्रयत्न केला; पण त्यामुळे उपयोग तर झालाच नाही, उलट दुसरा डोळाही निरुपयोगी झाला; त्यानंही दिसेनासं झालं. आधीच 'सुखात' होतो, त्यात ही भर. अखेर तो दिसला. त्याचा छातीखालचा भाग चिखलात अदृश्य झाला होता.

पुढची लाट तशीच वाहून गेली. मी पुढे सरकलो नव्हतो. त्याच्याही अंगावरून ती गेली होती. मी विचार केला की 'अशीच मोठी लाट आली तर चिखल मऊ होईल. काहीही करून त्याच्यापर्यंत पोचलं पाहिजे.'

एखादी आई आपल्या मुलाला वाचवण्यासाठी जशी झगडेल, तसाच मी जीव खाऊन त्याच्या दिशेला जायचा प्रयत्न करीत होतो. तराफा सोडणं तर शक्यच नव्हतं. तो माझ्याकडे मूकपणे, एकटक पाहत होता, मीही त्याच्यावर नजर स्थिर केली होती. निश्चलपणे तो उभा होता. त्याच्यावरील एकाग्र दृष्टी काढण्यात अर्थ नव्हता. तशाच स्थितीत मी चिखलातून हात मारत होतो; पण आता वेग फारच कमी झाला होता. पुढच्या मोठ्या लाटेनं तर मला जवळजवळ पोत्याबाहेर फेकायचा प्रयत्न केला, कसाबसा त्यातून सावरलो. सिल्व्हेन गळ्यापर्यंत बुडला होता. आमच्यात शंभर फुटांचं अंतर अद्याप होत. डोळ्यांत प्राण आणून तो माझ्याकडे बघत होता. त्याला मृत्यू समोर स्पष्ट दिसत होता. केवळ तीनशे यार्डांसाठी तो दुर्दैवी प्राणी मरणाला सामोरा गेला.

आमची नजर बांधली गेलीच होती. त्यानं मान हलवून 'माझ्यासाठी जास्त झगडू नकोस' अशी खूण केली. तरीही माझे प्रयत्न चालूच होते. ऐंशी फूट अंतर राहिल्यावर, आलेल्या जोरदार लाटेनं पंधराएक फूट आणखी पुढं ढकललं.

आणि समोर पाहिलं तर सिल्व्हेन दिसेनासा झाला होता. पृष्ठभागावर नाममात्र पाणी असलेला चिखल मऊमऊ होता. शेवटचा निरोप देण्यासाठी माझ्या मित्राचा हातही वर राहिला नव्हता. निराशेमुळे स्वार्थी जनावराप्रमाणे डोक्यात विचार चमकून गेला. 'तू जिवंत आहेस, पपी; पण एकटा. जंगलात साथीदाराशिवाय शिरणं किती धोक्याचं आहे. हे पलायन यशस्वी होणं कठीण दिसतंय.'

पाठीवर येऊन आदळलेल्या लाटेमुळे मी भानावर आलो. तराफा काही यार्ड पुढे ढकलला गेला. झाडं जवळ आलेली दिसत होती. सिल्व्हेनविषयी मला तीव्रतेनं वाईट वाटत होतं. 'मित्रा, आपण जवळजवळ पोचलोच होतो. तू थोडक्यासाठी घाई केली नसतीस तर! वृक्षांपासून आपण अवघ्या तीनशे यार्डांवर होतो. का? तू का असला गाढवपणा केलास? चिखलाचा पृष्ठभाग चालता येण्यासारखा आहे असं तुला वाटलं तरी कसं? उन्हामुळे? चमकण्यामुळे? कसं कळणार? तुला जास्त काळ तग धरणं कठीण झालं होतं का? तुझ्यासारखा माणूस काही तासांकरता इतका अधीर व्हावा?'

लाटा एकामागून एक गर्जना करीत येतच राहिल्या. त्यांचा वेग आणि आकारमान वाढत होतं. पाच वाजेपर्यंत हा खेळ चालला. त्यानंतर मात्र एकदम पाण्याची पातळी वाढली. सिल्व्हेनचा तराफा तर केव्हाच झाडीत जाऊन अडकला होता. मी जंगलापासून आता पन्नास फूटही दूर नव्हतो; पण एखादी भक्कम फांदी किंवा मूळ हाताला लागेपर्यंत जागचं हलायचं नाही असं मी पक्कं ठरवलं होतं. त्यामधे पुढचा एक तास सहज गेला असेल. फेसाळत, घनगंभीर आवाज करीत आलेल्या त्या लाटेबरोबर मी अक्षरशः झाडांमध्ये फेकला गेलो. पटकन साखळी सोडवून घेतली आणि मोकळा झालो. ती फेकून मात्र दिली नाही. तिचा उपयोग होण्यासारखा होता.

वेळ न गमावता मी झाडीत प्रवेश केला.

## समाप्त

### निवेदन

या अंकातील दोन प्रकरणाबरोबरच 'पॅपिलॉन' लेखमाला पूर्ण होत आहे. मूळ पुस्तकातील 'मेनलँड ते व्हेनेझुएला' हा अखेरचा प्रवास या ठिकाणी वगळण्यात आला आहे,याची कारणे दोन. एक : पृष्ठसंख्येची मर्यादा. आणि दोन : मला व्यक्तिशः असे वाटते की आपल्याला सर्वस्वी अपरिचित अशा जगाची ओळख या मुक्कामापर्यंत बहुतांशी झालेली आहे. पॅपिलॉनचा आत्मविश्वास, धाडस आणि त्याच्या शारीरिक मानसिक वेदना या साऱ्या गोष्टी त्याच्याच शब्दातून प्रगट झालेल्या आहेत. सुटकेच्या अखेरच्या पर्वात दिसतो तो पूर्ण स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी आलेल्या अडचणींचा इतिहास : ज्या अडचणी आधीच्या कालखंडातील प्रतिकूल परिस्थितीपुढे काहीच नव्हत्या.

म्हणूनच या ठिकाणी थांबावे असे प्रामाणिकपणे वाटते.

पॅपिलॉन या वेळी पळाला तो पळालाच. मेनलँडवर झाडीत शिरल्यानंतर त्यानं लवकरच चँगचा भाऊ 'कुक् कुक्' याच्याशी संधान बांधलं. आणखी दोन चिनी साथीदारांसह सर्वांनी आगेकूच केली. याही खेपेला एका होडीतून समुद्रमार्गानं जाऊन त्यांनी 'जॉर्जटाउन'मध्ये प्रवेश केला. तिथे पोलिसांच्या चौकशीला तोंड द्यावं लागलं, तरीही त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आली नाही. या शहरातही पॅपिलॉननं एक नवा संसार थाटला.

मूळ स्वभावाप्रमाणे आणखी काही धाडसी उद्योग केल्यानंतर त्यानं जॉर्जटाउनमधूनही पळ काढला. डेव्हिल बेटापासून त्याचा जो प्रवास सुरू झाला तो यशस्वी स्वातंत्र्याच्या दिशेनंच झाला. अनंत अडचणी, पोलिसांचा ससेमिरा आणि धाडसांची परंपरा यामधून पार पडून तो 'व्हेनेझुएला'मध्ये आला. त्या ठिकाणी मात्र तो पूर्णपणे स्वतंत्र झाला. अखेर त्या देशानं पॅपिलॉनला आश्रय दिला. एक स्वतंत्र नागरिक म्हणून त्यानं आपल्या नव्या जीवनाला आरंभ केला.

पुस्तकाच्या अखेरीस पॅपिलॉन म्हणतो :

'तेरा वर्षांच्या तुरुंगवासानंतर आणि अखंड झगड्यानंतर हे स्वातंत्र्य पदरात पडलं होतं. त्या वेळी अंगावरच्या कपड्यांखेरीज जवळ काय सामान होतं तर फक्त तीन सदरे आणि एक विजार! नवं जीवन सुरू करणं हे सदऱ्याला गुंडी शिवण्याइतकं सोपं नाही हे मला कळत होतं.

'आज पंचवीस वर्षांनंतर स्वतःच्या मुलीसह, व्हेनेझुएलाचा नागरिक म्हणून कॅरॅकसमध्ये मी सुखात काळ घालवत असलो तरी: इथपर्यंत पोचण्यासाठी मला खूप नवनवीन साहसं करावी लागली आहेत, मोठमोठ्या संकटांना तोंड द्यावं लागलं आहे. त्यात काही वेळा यशस्वी ठरलो, बऱ्याच वेळा सपशेल मारही खाल्ला; पण काही झालं तरी एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून त्या वेळी मी वावरत होतो. देशाचा एक सन्मान्य नागरिक म्हणून.

'एखादे दिवशी, इतर अनेक उल्लेखनीय कथांसह त्याचाही इतिहास मी सांगेनही. परंतु तूर्त या पुस्तकात तेवढी जागा नाही.'

—अनुवादक

# श्री. ना. पेंडसे : लेखक आणि माणूस

## स्वसाहित्याचे परखड परीक्षण करणारे (आत्म) चरित्र

श्री. ना. पेंडश्यांचे हे नवे पुस्तक चरित्र नसून आत्मचरित्रच आहे हे 'पश्चात्–बुद्धी' हे शेवटचे प्रकरण न वाचताही लक्षात येते. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे शैली हे तर आहेच. त्यांच्या खास 'पेंडसे-शैलीचा' अनुभव वाचकाला त्यांच्या कोणत्याही रचनेतून जाणवतोच. शिवाय ज्या पद्धतीने, अतिशय सूक्ष्मतेच्या साह्याने व्यक्तिगत भावजीवनातले प्रसंग उभे केलेले आढळले त्यावरून हे आत्मचरित्रच आहे. याबद्दलची शंका अधिकाधिक दृढ होत जाते.

वामन गानू हा आपला मित्र हे चरित्र लिहितो आहे असे कल्पून स्वत: श्री. ना. पेंडसे जेव्हा आत्मचरित्र लिहितात तेव्हा चरित्र व आत्मचरित्र यांपैकी प्रामुख्याने कोणत्या निकषावर ते रसिकमनाने अनुभवायचे हा थोडासा प्रश्न पडतो. त्याचप्रमाणे जे त्यांनी या पुस्तकातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे ते ह्याच पद्धतीने सांगायला हवे होते का हाही एक प्रश्न आहे. सर्वसाधारण (प्रथमपुरुषी) आत्मचरित्राच्या साह्याने हा हेतू साध्य झाला नसता का ?

चरित्र खरेच जर वामन गानू किंवा तत्सम कोणी लिहिले असते तर इतके ते रोचक होते ना हे एक उघड सत्य आहे. अगदी व्यक्तिगत, खाजगी व क्वचित फक्त मनातील तरंगच अशा स्वरूपाचे अनुभव मग दूर राहते व ठळक ऐकीव, कागदोपत्री सिद्ध झालेल्या किंवा प्रत्यक्ष सान्निध्यातून फक्त जाणवणाऱ्या स्थूल अनुभवांचे चित्रण झाले असते. त्यात सच्चेपणा, कलात्मकता येऊ शकत नाही असे नव्हे; पण प्रत्यक्ष आत्मचरित्रकाराच्या जाणिवांचे वास्तवदर्शन– जे सहजच कलात्म होण्याची शक्यता अधिक असते. (पेंडश्यांच्या बाबतीत तर हे अधिकत्वाने सत्य आहे)– आपोआपच घडत जाते.

'आपली आपण प्रशंसा किती करून घ्यावी' हाही एक प्रश्न अशा वेळी पडलेला पेंडसे सांगतात. पण पेंडश्यांसारख्या तशा रोखठोक व स्पष्टवक्त्या माणसाने हा प्रश्न मोठ्या खुबीने सोडविला आहे. मित्रच आपले चरित्र लिहितो आहे म्हणून खैरात नाही व आपणच खरे तर ते लिहितो आहोत म्हणून खोटा संकोचही नाही.

मग आता जर विचार केला तर लक्षात येते, की जो form त्यांनी येथे स्वीकारला आहे तो अपरिहार्य नाही. पेंडश्यांनी आत्मवृत्त म्हणूनही जरी या पुस्तकाचे लेखन केले असते तरी त्यात फारसा फरक पडला नसता असे वाटते. उलट त्यामुळे त्रयस्थ व्यक्तीने श्री. नां. च्या मनाचा काढलेला आलेख असे जे स्वरूप दिसते आहे ते तरी दूर झाले असते. कदाचित् हा form स्वीकारल्यामुळे टाळावेसे वाटलेले पण उत्कट व कलामूल्य असलेले अनुभव गोवता येऊन आहे त्यापेक्षाही या परखड विश्लेषणाचे मोल निश्चितच वाढले असते.

श्री. नां. च्या लेखनाची प्रेरणा व त्यांचे आयुष्यातील स्फूर्तिस्थान जो गारंबीचा परिसर व तेथील पेंडसे घराणे येथपासून ते सेवामुक्तीचे जीवन जगणारे श्री. ना. येथपर्यंत आयुष्याचा चित्रपट लेखकाने चितारलेला आहे. हा सगळाच चित्रपट दृष्ट लागण्यासारख्या रेखीवपणे आपल्या डोळ्यांपुढे येतो. प्रत्येक बारीकसारीक तपशिलासह, चिंतनासह व लेखकाच्या त्याबद्दलच्या स्वत:च्या खास ठशांसह तो येतो त्यामुळे ही नुसती जिकिरीने कलाकुसर न वाटता त्यात आपोआपच जिवंतपणा येत जातो. ठसठशीतपणा हे जे पेंडश्यांच्या सर्वच लेखनाचे वैशिष्ट्य आहे ते येथेही जाणवत राहते.

संपूर्ण वाचनात आपण एका अतिशय संवेदनक्षम, निग्रही, अमाप जिद्द असलेल्या व प्रसिद्धिपराङ्‌मुख वृत्तीच्या माणसाच्या सहवासात असतो. हा माणूस अतिशय कष्टातून पुढे आलेला व कसलीही भीड-भाड न ठेवता आपली स्पष्ट मते उघडपणे सांगणारा आहे. पण तेवढाच कृतज्ञ आहे. कृतज्ञता, आप्तांबद्दलचा जिव्हाळा व थोडासा तऱ्हेवाईक,-छांदिष्ट स्वभाव यांचे एक विचित्र व विलोभनीय मिश्रण त्यांच्या व्यक्तित्वात झाल्याचे आपल्याला जाणवत राहते. साहित्यिक जगापासून, त्यातील क्षुद्र हेव्यादाव्यांपासून, परदेशी साहित्यिकांच्या पुढे पुढे मिरवण्यापासून हा माणूस खूप दूर आहे. यशाची धुंदी केव्हा त्याला आलेली दिसत नाहीच उलट त्या त्या वेळेला तो अंतर्मुखच झालेला दिसतो. मिस्किलपणा, मित्रांचा सहवास, व्यक्तिगत आवडी-निवडी आणि घरगुती वागणे यांच्या छोटया छोटया रेखाचित्रांनी 'असेही शिरुभाऊ' व 'हेही शिरुभाऊच' ही दोन प्रकरणे नितांत रमणीय झालेली आहेत.

अशा रेखाचित्रांबरोबरच श्री. नां. नी काढलेली जी अनेक व्यक्तिचित्रे आहेत ती विलक्षण सुंदर वठली आहेत. व्यक्तिचित्रणकौशल्य हे त्यांचे असाधारण यशाचे गमक आहेच. येथे मोजकेच बोलणारे, साहित्याची सखोल समज असणारे श्री.पु.भागवत,काटकसरीतआंबे कसे खरीदावे ह्याची 'साहित्य सहवास' मधून निघाल्यापासून कंटाळवाणी कॉमेंटरी लावणारे विंदा करंदीकर, प्रख्यात लेखक ई. एम्. फॉर्स्टर, बडा उद्योगपती पण गावी गेल्यावर पंचा लावून गावकऱ्यांबरोबर विडी ओढत बसणारा महादेव जोशी अशा अनेक व्यक्ती आपल्याच होऊन जातात.

'माणूस' म्हणून आपले व्यक्तित्व स्पष्ट करताना, रंगविताना, पेंडसे अधिक खोलात मात्र जात नाहीत. आपल्याला आलेल्या सर्वच कडू-गोड अनुभवांचा विचार ते फारसा तटस्थपणे किंवा सखोलपणे करीत नाहीत. एक थोर कादंबरीकार व ज्याने बरेचसे जग पाहिलेले आहे, ज्याच्या प्रतिक्रिया अतिशय तीव्र आहेत त्याच्याकडून हे अपेक्षित असते की या सगळया जीवनातील प्ररणांचा, दु:खांचा वेध घेऊन कुठे तरी माणूस व त्याला नगण्य समजणारी नियती यांचा संबंध कळावा, कुठे तरी हे नाते जाणावे, जीवनाचाच तळ शोधावा; पण व्यक्तिगत मते, काही नोंदी किंवा वरवरच व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया यांच्यापलीकडे जाणारे पेंडसे आपल्याला दिसत नाहीत.

पण ही उणीव त्यांनी आपल्या साहित्याची जी परखड परीक्षणे केलेली आहेत त्यात भरून निघाली आहे. स्वत:चे भिक्कार लेखनही कसे उत्कृष्ट व कसदार आहे हे जाणवून देण्याची धडपड करणारे जे लेखक असतात त्यांना पेंडश्यांनी एक सुंदर आदर्शच घालून दिला आहे. हे काम मुळीच सोपे नाही. एक लोकप्रिय कादंबरीकार आपल्याला काय साधायचे होते व काय साधले याचा अतिशय अलिप्तपणे विचार करतो आहे, आपल्या कादंबऱ्या–नाटकांचे यश शोधतो आहे, अपयश अतिशय मोकळेपणाने कबूल करतो आहे. कादंबऱ्यांची नाटके करणाऱ्या उद्योगाबद्दल मित्रांनी केलेली थट्टा मनमोकळेपणाने सांगतो आहे, आपली भाषाशैली कशी घडत गेली त्याचा शोध घेतो आहे व काही कादंबऱ्यांना वाचकांनी का डोक्यावर घेतले याचा अचंबाही व्यक्त करतो आहे. हे सर्व विलक्षण तटस्थपणे व जणू कोणा दुसऱ्याच्याच कादंबऱ्यांचे परीक्षण करीत आहोत या सुरात केल्याने पेंडश्यांच्या पुस्तकाचा दुसरा भाग –'लेखक'– हा अतिशय उत्तम साधला आहे.

मराठीत चरित्र व आत्मचरित्रवाङ्‌मय तसे फार नाही. जे उत्तम आहे ते थोडेच आहे व इतर भरताड खूपच आहे. पेंडशांच्या या चरित्रवजा आत्मचरित्राने या साहित्याच्या दालनात घसघशीत अशी भर घातली आहे. आपल्या लेखनामागच्या प्रेरणा शोधणे, जीवनाच्या प्रवासातील अनुभवांचे सिंहावलोकन करणे व लेखनाचे यशापयश तपासणे या उद्दिष्टांमुळे व त्यांच्या आविष्काराच्या प्रामाणिकपणामुळे हे (आत्म) चरित्र उत्तम साधले आहे.

**–सु. म. घाटे**

['श्री. ना. पेंडसे : लेखक आणि माणूस' – एक मित्र. मौज प्रकाशन, मुंबई ४, मूल्य रु. ५५]

# निवडणुकीचा ट्रेलर : पृष्ठ १५ वरून

देण्याचे आवाहन करणारे पत्रक काढलेच.

या ननावरेमहाशयांची एक गंमत. निवडणूक संपली. पेटया 'सील्' होऊन बारामतीला प्रांतकचेरीत निघाल्या. बरोबर जाम पोलिसबंदोवस्त. निवडणुकीत काही हाणामाऱ्या घडतील म्हणून काळजीत असलेले प्रांतसाहेब थोडेसे आनंदी. हत्ती निघून गेला होता. शेपूट राहिलेले. ननावरेसाहेब प्रांतसाहेबांकडे गेले. अहो, पेटयांबरोबर दोन्ही पार्टीचा एकेक डायरेक्टर पाहिजे.

'माझी हरकत नाही. पण कशाला?' प्रांत.

'पेटयांचे काही झाले तर.'

'पोलिस आहेत ना?'

'वाटेत फोडल्या तर...?'

'आपण येऊ शकता. बिचारे प्रांतसाहेब दुसरे काय बोलणार? एका तालुक्याच्या कॉंग्रेस अध्यक्षांचा हा विश्वास. ननावरे भाऊसाहेब, मी व राम ही गंमत पहात होतो. तिथे येऊन म्हणाले, मी पेटयांसंगे जातोय. नाही तर हे काहीपण करतील.

'तुम्ही जाच. तुमच्यापेक्षा अधिक तज्ज्ञ माणूस आम्हाला कोण मिळणार?' मी प्रश्न केला. ते क्षणभर गोंधळून पहात राहिले.

या निवडणुकीतल्या प्रचारसभा म्हणजे गंमत होती. कॉंग्रेस पक्षाने बारामतीच्या साडेतीन शहाण्यांच्या हाती प्रचाराचा डांगोरा दिलेला होता. युवक कॉंग्रेसला मैदानात उतरण्याचा जाहीर आदेश नामदारसाहेबांनी दिला होता. त्यामुळे ही मंडळी पाच–सहा ट्रकांमधून व दहा–पंधरा जिप्समधून झुलत-डुलत येत. कोठे तरी डायरेक्टरकडे (उमेदवाराकडे) जेवण असे. मंडळी किमान हजार. मग जाहीर सभेला जात. जाताना काकडयांचा मुर्दाबाद नि शरदराव झिंदाबाद. शाहीर जंगमस्वामींचा 'काकडे गौडबंगाल' हा वग. हा एक विचित्र माणूस. निवडणुकीच्या धामधुमीपूर्वी गुजराथला प्रचाराला जातो म्हणून आमदार संभाजीराव काकडेंकडून पैसे घेऊन गेलेला. गुजराथ राहिले तापीतीरी आणि हा प्राणी निरेच्या काठावर कार्यक्रमाला हजार रुपये या दराने शरदरावांच्या पॅनलच्या बाजूने मैदानात उतरला. कुणीतरी विचारले, 'स्वामी, ही पलटी कशी?'

'पोट, रावसाहेब.' असे उत्तर स्वामींनी दिले.

सभांचे संयोजक इतके हुशार की निरा गावात हाताच्या बोटांवर मोजण्याइतके सभासद. तरी तिथे बाजारात स्वामींचा वग. त्यातच कुणी तरी बाबालाल काकडेंच्या बंगल्यातून तुमचे भाषण टेप करीत आहेत म्हटल्यावर बंगल्याजवळची सभेची जागा तर बदललीच; पण स्वामींच्या बेलगाम वाणीला गच्च लगाम बसला. पुन्हा सभेत लोकांनी टाळ्या वाजवल्या तरी त्यांत मतदार हवेत ना!

बारामती तालुक्यातल्या सभांचे एक वैशिष्टय. इतर महाराष्ट्राच्या मानाने सभला जमवलेली, जमलेली गर्दी अधिक. वक्ते नेहमी कुणाला कसा 'सोलला' या भाषेत अधिक बोलतात. व्यक्तिपूजा व द्वेष यांचा भाषणातून सतत उल्लेख. निवडणुकांच्या सभेत अथवा इतरत्र शरदचंद्रजी अथवा शऱ्या या नावाने उल्लेख करणारे इरसाल वक्ते येथे आहेत. एखादाच माणूस माननीय शरद पवार असा सोपा सरळ उल्लेख करतो.

नेहमीच्या वेळेपेक्षा या वेळेस काकडयांची प्रचारआघाडी फारच मजबूत होती. एकतर १७५० मतदारांत ३८१ मतदार निंबूत-मध्येच होते. मुरूम हे त्याहून मतदार अधिक असलेले गाव. तेथे जवळजवळ साडेचारशे मतदार; पण तिथे दोन्ही पॅनलमध्ये मिळून नऊ उमेदवार उभे. त्यातच काकडयांचा प्रभाव अधिक. इतरत्र विखुरलेल्या मतदारांत वडगाव, होळ, लाटे, शिरास्ने इत्यादी गावांत मतदारांचा भरणा अधिक. निंबूतचा बंदोबस्त या वेळी फारच मजबूत होता. गावातले मतभेद काकडयांनी आधीच मिटविले होते. त्यातच शरदसेना बारामतीवरून काकडयांवर 'चाल' करून येत असल्याचा थाट असल्यामुळे किरकोळ मतभेदांना मूठमाती मिळाली होती. निंबूत फुटावे म्हणून शरद पवारांनी उभे केलेले श्री. खंडेराव काकडे फारसे परिचित नव्हते. गावात इतरत्र प्रचार करण्याची त्यांची हिंमत होत नव्हती. वाडयातोडया निंबूतच्या तरुण पोरांनी स्वतःच्या आधिपत्याखाली घेतल्या होत्या. शरद आणि कंपनीची हिंमत या पोरांना हटकण्याची नव्हती.

एकदा मी व राम नीरा–बारामती-रोडने जात होतो. या रोडला निघाल्यावर दिवसा, विशेषतः रात्री गाडी फारच हळू चालवावयाची असते. रस्त्याच्या कडेला उभ्या राहिलेल्या मंडळींवरून उसाच्या फडात शिजत असलेल्या राजकारणाचा 'वास' येतो. भर दुपारच्या वेळी एका वाडीच्या प्रवेशरस्त्यापाशी कॉंग्रेसची दहा ट्रक मंडळी (त्यात एकावर 'चांदणी चौक–बारामती' अशी पाटी) होती. सात–आठ जिप्स् होत्या. पण एकटा सतीश काकडे आपली गाडी आडवी उभी करून वाडीच्या तोंडाशी उभा होता. कुणाची हिंमत त्याला गाडी बाजूला कर म्हणण्याची होत नव्हती. मंडळी आल्या पावली शरद पवारांचा जयजयकार करीत पुढे सरकली. रामने सतीशला म्हटले, 'सत्या लेका, खवंडळ काढली असती तर?'

'कुणाची माय व्यालीया–' ओठावर नसलेल्या मिशांवर हात फिरवीत सतीश म्हणाला.

या निवडणुकीत दगडांनी थोडेसे काम केलेच. कॉंग्रेस प्रचारकांच्या ट्रक्समधील एक दगड पूर्वी शरद पवारांच्याकडे असलेल्या भगवानराव काकडयांच्या (माजी जि. प. सदस्य) चिरंजिवांना लागला. कॉंग्रेसवाल्यांचा खुलासा असा, की दगड टायरमधून उडाला; पण या एका दगडाने किती तरी पक्षी मेले. वानेवाडीच्या जाहीर सभेत माझ्या भाषणानंतर एक दगड आमच्या जीपवर पडला. अल्ल्या वानेवाडीने दगड मारणारांना लाख शिव्या मोजल्या. एकंदरीत सार्वजनिक निवडणुकीत नव्हे तर चिल्लर निवडणुकांमध्ये 'दगडांचे' महत्त्व कमी लेखता कामा नये. नुकत्याच पाहिलेल्या 'आँधी'मधील दगडांची कामगिरी डोळयांसमोरून हालत नव्हती.

नामदार शरद पवारांच्या पॅनलची मोट मोठी मजेशीर होती. होळचे माझे मित्र श्री. बाळासाहेब गीते (माळेगांव सहकार साखर कारखान्याचे उपाध्यक्ष.) हे शरद पॅनलचे अध्वर्यू. मोठा उदार आणि दिलखुलास माणूस. पण मागे एकदा ते मुरूमचा सोमेश्वर कारखाना होळला जावा म्हणून प्रयत्नशील होते. त्यांचे जवळचे नातेवाईक निवडणुकीला उभे. (हीच मंडळी काकडयांना नातेवाइकांचे राजकारण का करता असा प्रश्न विचारीत होती.) त्यामुळे त्यांच्याबद्दल बहुसंख्य मतदारात आत्मीयता नव्हती. बाकी एक अण्णा पाटील (कोऱ्हाळे) सोडले तर सर्व डायरेक्टर्स धरून बांधून गोळा केलेले होते. एक

तर काकडयांशी वैर आणि स्वतःची असलेली ताकद त्यांना ठाऊक होती. त्यामुळे सर्वजण खाजगीत भेटल्यावर स्वतःला एक मत मागत अथवा 'झक् मारली नि नामदारांच्या हट्टापायी यात पडलो म्हणत.' या पॅनलमधील एक डायरेक्टर बाळासाहेब गीतेंच्या जीपमध्ये बसून पॅनलला शिव्या घालत होता. त्यातच बाळासाहेबांच्या 'मळी' प्रकरणाचे उत्तर कधीच त्यांना देता आले नाही.

उच्च स्तरावरून या निवडणुकीत अनेकांना रस होता. शालिनीबाई पाटील यांनी तर सणसरला आधीच शरद पवारांवर जाहीरपणे निमसरकारी तोफ डागलेली होती. मंत्रीमंडळाच्या बैठकीत नीरेच्या डाव्या अंगावरचे बारामतीतील तीन साखर कारखाने जिंकण्याचा विडा नामदारसाहेबांनी उचलला, तेव्हा ते दोन कारखान्यांचे 'अधिपती' होते. निवडणुकीत सोमेश्वरची निवडणूक स्थगित झाली. सणसरला शरद पवारांच्या स्वतःच्या गावच्या क्षेत्रात (काकडयांचीवाडी.) काकडयांनी बाजी मारली. माळेगावमध्ये काकडयांनी चार डायरेक्टर्स निवडून आणले. येथे शरद पवारांचे शेपटावर निभावले; पण हे पराभव नामदार शरद पवारांना भलतेच महागात पडले. न्यायालयात 'सोमेश्वर' प्रकरण गेल्यावर नामदारांनी निवडणूक स्थगित होणे शक्य नाही असा जाहीर दम भरला होता; पण न्यायालयाने व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्यहक्काखाली निवडणुकीला 'स्टे' देऊन सहकारात नवा इतिहास घडविला. निकालपत्रात मंत्र्याच्या वर्तनाबद्दल, निर्वाचनअधिकाऱ्यांच्या वर्तनाबद्दल ताशेरे ओढून श्री. बाबालाल काकडेंचा निवडणूक-अर्ज वैध असल्याचा उच्च न्यायालयाने निर्णय दिला. शरद पवारांच्या नैतिक पराभवाचा श्रीगणेशा झाला. शालिनीबाईंच्या भापेतल्या अर्ध्या कारखान्याच्या मंत्र्यांची टुरटूर थांबून राजकीय अस्तित्वासाठी अपरिहार्य धडपड सुरू झाली.

मध्यंतरी या कारखान्याच्या निवडणुकीत समझोता व्हावा म्हणून पुण्याचे काही आमदार प्रयत्नशील होते. लोणावळयाला एका हॉटेलमध्ये बसून वाटाघाटी कराव्यात असे ठरले. वाऱ्यावर उडत बातमी मंत्रिमंडळातील खाशा मंडळींच्या कानी गेली. लाइटनिंग कॉल झाले. आणि लोणावळयाच्या शिखरपरिषदेचा पट उधळला गेला. या निवडणुकीत पडद्याआडून अनेक गोष्टी सातत्याने घडत होत्या.

मला एक उदाहरण आठवते. वडगाव हे 'तीन राजांचे गाव' येथे राजेमंडळी भलतीच फॉर्मात. पण तीन राजांच्या नेहमीच तीन तऱ्हा. धाकटी पाती, थोरली पाती, मधली पाती. ही पाती नेहमीच संघर्षाच्या पावित्र्यात. अशा या गावातील एका जाहीर सभेत उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या आधारे, नामदारांनी निर्वाचन अधिकाऱ्यावर आणलेल्या दडपणाच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी नामदारांना जाब विचारावा, अशा तऱ्हेचे काहीसे मी बोललो होतो. वृत्तपत्रातून त्याला फारशी प्रसिद्धी मिळालेली नव्हती.

पण निवडणुकीच्या दिवशी सोमेश्वरच्या गेस्टहाऊसमध्ये बाबासाहेब मोरेंचा खास परिचय झाला. मुंबईत माझ्या भाषणांची फारच चर्चा चालू आहे असे हे गृहस्थ सांगत होते. त्यांची ओळख करून देताना 'सोमेश्वरच्या संपादकांनी फक्त नामपरिचयच करून दिला होता. मी थोडयाशा विनयाने व आश्चर्याने वृत्तपत्रातून हे भाषण फारसे उल्लिखिले न गेल्याचे जेव्हा त्यांच्या निदर्शनास आणून दिले, तेव्हा ते गृहस्थ मा. यशवंतराव चव्हाणांचे जवळचे नातेवाईक असल्याचा खुलासा पलसेंनी केला. या कारखान्याच्या निवडणुकीत घडणाऱ्या घटनांचे रिपोर्टिंग तर शासकीय वा अशासकीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर होत होते. एक सी. आय. डी. इन्स्पेक्टर आपल्या बोटांचे तुकडे पडायची वेळ आली असल्याची रास्त तक्रार करीत होता. सारखे वरून येणारे 'रिपोर्ट पाठवा' हे आदेश पाहून हबकून जात होता.

वडगावच्या सभेतील आणखी एक गंमत. पुण्याचे माजी महापौर श्री. शांताराम दिवेकर यांनी कोऱ्हाळयाच्या 'धोंड पाटलांचे' हरिजनांच्या जमीन खरेदी प्रकरणाचे आख्यान लावले. येथील जमिनी अल्पमोलामध्ये या धोंड पाटलांनी बळकावल्या असल्याबद्दल गंभीर इशारा देऊन दलित पँथरची मंडळी हिसका दाखविणार असल्याची घोषणा त्याने केली. पण धोंड पाटील महा वस्ताद. त्यांनी काँग्रेसच्या सभेत घोषणा केली की 'हरिजनांच्या जमिनीच परत द्यावयाच्या असतील तर माझा विरोध नाही. पण शेजच (ओळ) लावायची असेल तर एक तर निंबूतच्या बाजूने लावा नाही तर काश्याच्या वाडीहून लावा. (निंबूत हे काकडयांचे गाव तर काश्याचीवाडी हे शरद पवारांचे गाव) मधीआधीच कोऱ्हाळयाला खुरपे लावणे शानपनाचे नाही.'

या निवडणुकीत आपले सहकारी मतदारांपर्यंत पोचू शकत नाहीत, लोक 'स्वयंस्फूर्ती'ने सोमेश्वराचा अंगारा घेऊन काकडे पॅनलला मते देण्याच्या आणाभाका घेत आहेत याची जाणीव नामदारमहाशयांना दोन तीन दिवस आधीच आली होती. पण आता खूप उशीर झाला होता. तरीही होळला सभा घेऊन कार्यकर्त्यांना अजूनही वेळ गेली नाही असा दिलासा नामदारांनी दिला. पाटकरी, तलाठी यांना 'लेव्हीच्या' नोटिसा घेऊन मतदारांना गाठण्याचा आदेश दिला गेला. पण अशा 'सरकारी' प्रचारकांचा पंचनामा करायला काकडेमंडळी आणि मतदार बसलेच होते. एका तलाठयाला बाबालालनी असा काही हग्या दम दिला, की बिचारा तीन दिवस गावात फिरकलाच नाही, शासकीय यंत्रणेचा प्रच्छन्न उपयोग नामदारांची अब्रू सावरण्यास उपयोगी पडला नाही. कारण लढाईत ज्या गावच्या बाभळी त्याच गावच्या बोरी होत्या.

काकडयांचा सोमेश्वरचा कारभार हा आदर्श कारभार आहे असा याचा अर्थ नव्हे. तसा दावा ती मंडळी करीत नाहीत; पण महाराष्ट्रातल्या इतर साखरी संस्थानांच्यामानाने हे संस्थान ठीक आहे, एवढेच. बारामती तालुक्यातील इतर साखर कारखान्यांच्यामानाने सोमेश्वर चार पावले सभासदहिताच्या दृष्टीने थोडे आघाडीवर आहे. सोमेश्वरच्या पडत्या काळात कोल्हापूर-चिपळूणपासून अक्षरशः झुंजून काकडयांनी ऊस जमा करून कारखाना तारला. त्यामुळे एखाद-दुसरा गुन्हा माफ करायला मतदार तयार होता. मतदारांच्या तक्रारीचे स्वरूपही किरकोळ होते. कुठे कारखान्याने नळयाच उचलून नेल्या, कुठे कारखान्याचे लोक ऊस तोडीला उशीरा आले, अशा तक्रारी असत. या तक्रारींच्या ज्वालांवर आपण आपली पोळी भाजून घेऊ असा नामदारांचा इरादा होता. पण त्यांत फक्त त्यांचे हातच भाजले. काकडयांना स्वतःच्या शक्तीचे नेत्रदीपक यश लोकांसमोर साकार करता आले त्यातच एक गोष्ट नक्की, सणसरच्या पराभवाने खच्ची झालेली पवारमंडळी धडपणे उभीच राहिली नाहीत. त्यात भवानीनगर साखर कारखान्यातील विजयी वीर चोपडे-निंबाळकर कोल्हापुरी

फेटा बांधून सातत्याने मतदारांमध्ये वावरत होते. पवार कंपनीने केलेले अनेक आरोप बुमरँगसारखे उलटत होते. उदाहरणच सांगतो. किरकोळ आहे पण महत्त्वाचे.

सोमेश्वरला शैक्षणिक क्षेत्रात महाराष्ट्रातील स्त्रियांचे एकमेव इंदिरानिकेतन हे पॉलिटेक्निक उभे आहे. शेजारीच टेकडीच्या कुशीत नवे आर्टस्-कॉमर्स कॉलेज उभारण्यात आले आहे. त्याचे नाव आहे 'मुगुटराव साहेबराव महाविद्यालय'. या महाविद्यालयात २५० विद्यार्थी शिक्षण घेतात. गीते पॅनलचे ऑब्जेक्शन असे की महाविद्यालयाचे नाव काकडे कॉलेज का? आमदार संभाजीरावांनी याला मोठे समर्पक उत्तर वानेवाडीला सासुरवाडीच्या सभेत दिले. ते म्हणाले, 'महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण कॉलेज आहे, बाळासाहेब देसाई कॉलेज आहे. या सर्व, पाटचा शरद पवारांना चालतात. त्यांनी त्या पाटचा उतराव्यात आम्ही आप्पांच्या (मुकुटराव) नावाची पाटी लगेच खाली काढतो. यावर काही समर्पक उत्तर पवारांच्या भात्यात नव्हते.

नेहमीच्या आपल्या पद्धतीतही काकड्यांनी बऱ्याच सुधारणा केल्या होत्या. मतदारांना सोडून ते आपले शक्तिप्रदर्शन करण्याच्या फंदात पडले नाहीत. त्यांचे मतदान अचूक व्हावे म्हणून तरुण पोरांनी तर शाळाच चालवली होती. मतदानपत्रिका अडीच फूट लांब होती व त्यातील एकतीस नावातून नेमक्या बारा फुल्या द्यावयाच्या होत्या. यावरून मतदारांची अडचण लक्षात यावी. आमच्या गाडीतील काका धुमाळ हे तर गाडीतून उतरले की सुरवातच करीत 'घ्या कोरी मतपत्रिका, डाव्या बगलेला सहा, तराजू, ट्रॅक्टर...उजव्या बगलेला सहा...' हे महाशय तर परीक्षा घेऊन 'विद्यार्थ्याला' सर्टिफिकेट देत. अगदी शेवटच्या दिवशी तर निवृतला जमलेल्या वा जमविलेल्या पाचसहाशे मतदारांना संभाळण्यासाठी लोकनाट्याचा कार्यक्रम ठरवावयाचे ठरले. आम्ही काही मंडळी उगाच टीकेला विषय नको म्हणून विरुद्ध. भूरचंद कोठारी तर रोशन सातारकरांना आमंत्रण द्यावयाला गुडघ्याला बाशिंग बांधून तयार. अनेकांच्या मते काही तरी करमणूक हवीच. नाही तर ही जमा केलेली मंडळी कशी सांभाळावयाची याचा मार्ग सांगा म्हणत. हो ना करता भूरचंदजी जेजुरीहून फडाच्या संयोजकांना घेऊन आले; पण पावसाने या सर्व उत्साहावर पाणी फिरवले. हा पाऊस काकडे मंडळींना निवडणुकीच्या दृष्टीने आणि प्रांतसाहेब बुधवंतांना व्यवस्थेच्या दृष्टीने फारच उपकारक ठरला. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी तर बहुतेक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मैदान बारा वाजल्यानंतर सोडले होते. असे म्हणतात की ही कार्यकर्ती मंडळी होळला नामदारांना आपले तीन तरी उमेदवार बारामध्ये हमखास येणार याचे रिपोर्टिंग करीत होती.

या सर्व निवडणुकीचा अर्थ नामदार पवार जनतेमध्ये लोकप्रिय नाहीत असा कुणी काढला तर ते सत्य नव्हे. महाराष्ट्रातल्या सचिवालयापासून तालुकापातळीपर्यंत जातीय (विशेषत: देशमुखी) राजकारणाचा, नातेवाइकी गोतावळ्याच्या राजकारणाचा एक अबोल खेळ सुरू आहे. या निवडणुकीत नामदार शरद पवार हे उच्चकुलीन कसे नाहीत याचे रसाळ वर्णन वडगावचे एक राजे इतक्या बहारीने करीत होते, की ही माणसे अजून लोकशाहीच्या युगात राहतात काय, याचा प्रश्न पडावा. उलट संभाजीराव, राम आणि मी त्या तथाकथित कथांमध्ये तथ्य नसल्याचे आवर्जून सांगत होतो. ना. शरद पवारांच्या ९६ कुळी मराठेपणातल्या कमतरतेबद्दल, मी मागे अनेकदा अनेक कथा 'खानदानी' मराठ्यांनी 'खानदानी' पद्धतीने सांगितल्याच्या ऐकल्या होत्या. त्याला आता व्यक्तिद्वेषाचे विषारी पाणी देण्यात आले आहे. काकडे पॅनलवर 'बारा बलुतेदारांचे पॅनल' असा आरोप करून काकड्यांना बळकट करण्याचे कामही पवार पॅनलच्या मंडळींनीच केले. सध्याच्या महाराष्ट्राचा एक विशेष. आपण कुणीच व्यक्तिगतदृष्ट्या जातीयवादी नाही—नसतो. आधुनिक शिक्षणाने आणि विज्ञानाने आपण तसे राहूही शकत नाही. पण आपले सामुदायिक मन निर्णायक क्षणी जातीयवादाच्याच कुबड्यांवर रांगत राहते. पवार गटाने व्यक्तिगत काकडेद्वेषावर सोमेश्वरच्या राजकारणात आपली घोडी नाचवली. पराभव अटळच झाला. पण तेच व्यक्तिद्वेषाचे राजकारण कुणी खेळेल तर अपयशाचेच धनी होण्याची शक्यता अधिक.

कोऱ्हाळ्याच्या भगतवस्तीवर एका वयोवृद्ध म्हाताऱ्याने मला सांगितलेली गोष्ट मी कधी विसरणार नाही. तो आत्मीयतेने सांगत होता. 'बघा साहेब, संभाजी नं शरद, आमच्या तालुक्याची दोन पोरं. भिमथडीची लेकरं. ती दोघंबी आमदार–नामदार. जो तो आपलं नाव कमावतोय. पण आता या निवडणुकीनं ही दोन पोरं हितच आपसात जुपली. कुणाच्या बाजूने कौल द्यावा कळंना. सोमेश्वर मर्जी देईल तसं व्हायाचं.'

साखर कारखान्याच्या निवडणुकीचा पहिला अंक संपला. काकड्यांनी बाजी मारली. पुढचे अंक अजून बाकी आहेत. त्याच्या रंगीत तालमी गावोगाव सुरू आहेत. कधीकाळी मनात विचार येतो, सोमेश्वरच्या राजकारणापासून, निवडणुकीपासून नामदार पवार अलिप्त रहाते तर......

जर–तर ला राजकारणात अर्थ नसतो. कऱ्हाडच्या म्युनिसिपालिटीच्या राजकारणात पवारांचे गुरु भाग घेतात. मग हे तर बोलून-चालून चेलेच! □




# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २८–६–७५ ते ४–७–७५

### गुजरात : बाबुभाई पटेल यांच्या कारकीर्दीचा शुभारंभ

मिथुन लग्न व तूळ रास उदित असताना गुजरात राज्यात जनता आघाडीचे मंत्रिमंडळ अधिकारावर येत असून श्री. बाबूभाई पटेल हे मुख्य मंत्रीपदावर आरूढ होत आहेत. या वेळी मंगळ-गुरूची युती उपकारक ठरली असून रवी-शनी यासारखे राजकारण व सत्ता या दोन्हीचे कारक ग्रह अनुकूल आहेत. मुख्य मंत्री श्री. बाबूभाई पटेल यांची कारकीर्द सुरुवातीला तरी जनतेचे मन आकर्षून घेतील. काही तडकाफडकी असे निर्णयही ते घेतील. त्यांच्या कारकीर्दीची सुरुवात शुभकारक होईल; पण आघाडीचे एकूण स्वरूप चिरेबंद राहील असे समजणे निदान ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने तरी फारसे आशादायक वाटत नाही. धुसफूस चालू राहीलच. मोरारजींची करडी नजरदेखील असंतोषाला आमंत्रण देऊ शकेल. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या विरुद्ध उठलेले वादळ थोडे कमी होऊ लागेल. इंदिराजींच्या वागण्या-बोलण्यातदेखील मुत्सद्देगिरीचा प्रत्यय येऊ लागेल. विरोधी पक्षांकडून नव्या डावपेचांचा प्रयत्न झाला तरी गर्जनेपलीकडे फार काही घडणार नाही. मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे 'हिरो' ठरावेत असे महाराष्ट्रात घडेल.

### मेष : प्रभाव वाढेल

हा आठवडा तुम्हाला फार छान अनुभव घ्यायला लावणार आहे. बलवान आणि समर्थ ग्रहांची अशी कृपा क्वचितच माणसाच्या वाट्याला येते. तुम्हाला मंगळाची मोठी मदत मिळणार असून तुमच्या बौद्धिक कर्तृत्वाला हे एक मोठेच आव्हान ठरणार आहे. अशक्य आणि अद्वितीय वाटणाऱ्या घटना या वेळी तुमच्या सहज हाती येणार आहेत. नोकरी-व्यवसायात नवे तेज प्रकट होणार असून तुमच्या कर्तृत्वाने अनेकांचे डोळे दिपून जातील. शेती, खते, कापूस व अॅल्युमिनियमची भांडी या उद्योगात प्रगतीचे नवनवे टप्पे तुम्ही गाठू शकाल. नोकरीत प्रामुख्याने सामान्य प्रशासन व इंजिनियरिंग खाते यात तुमच्या कर्तबगारीला वाव मिळेल. नव्या नव्या कल्पना प्रत्यक्षात आणता येतील. पैशाच्या बाबतीत मात्र काळजी घ्या. अंथरूण पाहून पाय पसरा. कर्ज काढण्याच्या तसेच लॉटरी व रेस यांच्या नादी लागू नका. मोह कोणत्याही प्रकारचा असला तरी टाळा. सोमवारी प्रवास व नव्या उद्योगाची सुरुवात टाळा. गुरुवारी शुभ घडेल. महिलांनी स्वभावातील तापटपणा कमी करावा. नव्या कोणत्याच योजनांची सुरुवात करू नका. शुभराशी ३–५–६.

### वृषभ : यश पदरात पडेल

रवी-शनी तेवढेसे अनुकूल नाहीत म्हणून विशेष दक्षता बाळगावी लागेल. राजकारणात सध्या तरी तुमचा टिकाव लागणे कठीण आहे. संघर्ष तर होईलच; पण शंभर टक्के यश पदरात पडेल याची फारशी खात्री बाळगू नका. सध्या माघार घेणे योग्य होईल. स्थावर मिळकतीचा खटला किंवा तंटा कोर्टात नेऊ नका. मंगळाची स्थिती तुम्हाला फारशी अनुकूल नाही. जुना आजार उचल खाईल अशी भीती आहे. अचानक खर्चाची नवीनवी प्रकरणे उद्भवतील. तुम्ही कलापदवीधर असाल तर सरकारी नोकरीत उत्कर्षाचा काळ येईल. बांधकाम, महसूल, माहिती, प्रसिद्धीखाते यात नोकरी मिळेल. रविवारी प्रवासाला जायला अनुकूल आहे. महत्त्वाची व्यक्ती भेटेल. उपासनेने मानसिक स्वास्थ्य मिळू शकेल. सोमवार, गुरुवार व शुक्रवार नव्या कामाला अनुकूलता आहे. एकदम पैसा वा नफा मिळवून देणारा कोणताही व्यवसाय करा. प्रेमात पडणाऱ्यांना लोकांची टीका सहन करावी लागेल. संसारात भांड्यावर भांडे आपटले तरी फुटणार नाही. महिलांना स्वतंत्र उद्योगात मोलाची संधी मिळेल. नोकरीत बदलीची शक्यता. शुभराशी ३–६–७

### मिथुन : प्रवासात भाग्योदय

भाग्यस्थ चंद्रावर या आठवड्याची सुरुवात होत आहे. ही अनुकूल अशीच बाब आहे. राशीत सध्या रवी-शनी आहेत. विचारपूर्वक व मुत्सद्देगिरीने पावले टाकली तर या आठवड्यातील अनुकूलतेचा फायदा करून घेता येईल. अकरावा मंगळ बरेच काही घडवणार आहे. स्थावराचा लाभ अपेक्षित आहे. तुम्ही तुमच्या परिस्थितीनुरूप जमिन, शेती विकत घेऊ शकता. स्थावराचा तंटा चालू असेल तर तो तुमच्या बाजूने होईल. फ्लॅट अगर जागेसाठी पैसा गुंतवला असेल तर धोक्यात असलेला हा पैसा एक तर वसूल होईल किंवा जागा तरी मिळेल. सोमवार मंगळवार नोकरीत त्रास व वरिष्ठाकडून विनाकारण बोलणी खावी लागतील. पण तेवढ्याने निराश होऊ नका. कारण बुधवार ते शुक्रवार तुमचे काम होणार आहे. बेकार असल्यास बँक, इंजिनियरिंग उद्योग, बांधकामखाते, पुरवठाखाते व विद्युतपुरवठाखाते येथे नोकरीचे जमेल. या वेळी तुम्हाला समुद्रावरचा प्रवास घडणार असून प्रवासात भाग्यकारक घटना घडतील. श्रीमंत उद्योगपतीचा विश्वास तुम्ही संपादन करू शकाल. महिलांनी एखाद्या स्पर्धेत अगर नोकरीविषयक स्पर्धेत अवश्य भाग घ्यावा. त्यांना पैसा मिळेल. शुभराशी ४–७–९.

### कर्क : चाणाक्षपणाची गरज

आठवा चंद्र, दहावा मंगळ व बारावा रवी-शनी अशी या वेळची ग्रहस्थिती आहे. पैसा अफाट खर्च होणे व नोकरीधंद्यात महत्त्वपूर्ण प्रगतीच्या वाटा खुल्या होणे हे या वेळच्या ग्रहमानाचे वैशिष्ट्य आहे. तुम्हाला सोमवारी महत्त्वाची व्यक्ती भेटणार आहे. विरोधकाकडून प्रेम व विश्वास मिळणार आहे. विज्ञान, बँकिंग व कला या शिक्षणात तुमची गती चालेल. तुम्ही चित्रपट काव्य, कादंबरी या लेखनाचा या आठवड्यात प्रयत्न करा. चालू नोकरीत स्थलांतराची म्हणजे बदलीची शक्यता आहे. बदलीने थोडा त्रास झाला तरी ती स्वीकारा. कारण त्याचा मागाहून फायदा होईल. शेतीचा धंदा करा. फळविक्री, प्लॅस्टिक, अल्युमिनियम, विजेची उपकरणे, कागद, तेलबिया, यांचा व्यापार व उद्योग सुरू करा. तुमच्यापैकी कुणी वकील असेल तर त्याला चांगले

दिवस आहेत. व्यापारी लोकांनी अगर जमिनदारांनी चाणाक्षपणाने वागण्याची गरज आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनी परीक्षेत पास होतील. मेडिकलला जाण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी प्रयत्न करावा. या राशीच्या तरुण तरुणींना प्रेमात यश येईल. महिलांनी संसारात अडचणी निभावून न्याव्यात. खर्च फार होईल. शुभराशी ६-९-१०.

### सिंह : राजकारणात जिंकाल

राशीस्वामी रवी जरी शनीच्या सहवासात असला तरी राजकारणात तुम्ही या वेळी जिंकाल. तुमचे डावपेच इतरांच्या सहज लक्षात येतील. तुमचे माघारीचे दिवस आता संपलेले आहेत. ज्यांनी तुम्हाला टिवल्या-बावल्या दाखवल्या, तुमची चेष्टा केली त्या सर्वांना 'पाणी पाजण्याची' सुवर्णसंधी या आठवड्यात तुम्हाला मिळणार आहे. तुमचे प्रतिस्पर्धी तुमच्या समोर नांगी टाकतील. त्यांच्या गर्जना हवेतच विरून जातील. सर्व सामान्यदृष्टया आठवडा फार वाईट नाही की फार चांगला नाही. तुमची सारी कामे, नव्या योजना व नव्या कल्पना याच आठवड्यात पुऱ्या करून घ्या. आता लवकरच तुम्हाला साडेसाती सुरू होणार आहे. नोकरीची स्थिती तशी वाईट असणार नाही. संसारात एखादी शुभकारक घटना शनीवारी वा रवीवारी घडेल. पतीपत्नीत प्रेम निर्माण होईल. संसारातील तंटे सामोपचाराने मिटतील. चालू नोकरीत वरिष्ठांनी सांगितलेले काम अदबीने करा, मतभेद होऊ देऊ नका. नवे वाहनखरेदीत फसवणूक होण्याची शक्यता. महिलांनी चालू नोकरीत आपली कर्तबगारी दाखवावी. त्यांना पुढे येण्याची संधी मिळेल. शुभराशी ७-८-१०.

### कन्या : आर्थिक सुधारणेला सुरुवात.

आठव्या मंगळाची कारकीर्द सुरू होत आहे. म्हणून एवढे घाबरून जाऊं नका. एक तर हा आठवा मंगळ तुमचे काही तरी भलेच करील. गेल्या अनेक दिवसांच्या आजाराने तुमचे मन भीतिग्रस्त बनले आहे हे खरे; पण हा मंगळ स्वगृही असल्यामुळे तुमच्या खर्चाची निर्माण झालेली मोठी दरी तो दूर करील. अनेकांचे सहकार्य या वेळी तुम्हाला मिळणार आहे. मध्यंतरी दुय्यम व्यवसायाचे थांबलेले काम पुन्हा जोरात सुरू होईल. अनेक लाभ दृष्टिपथात येतील. प्रसिद्धी व कीर्ती मिळू शकेल. आर्थिक बाबतीत आता कोणतेही धाडस करायला हरकत नाही. नवे करारमदार करू शकाल. तुमची जुनी येणी वसूल करण्याचे जारीने प्रयत्न करा. वसुली होईल. लेखनात तुमच्या बुद्धीचे कौतुक होईल. लेखनामुळे नोकरीत फायदा होईल. तुमच्यापैकी वकिलीचा व्यवसाय करणारे, इनकम्-टॅक्स, सेलसटॅक्स याचा व्यवसाय करणाऱ्यास नव्या नव्या कल्पना सुचून त्याचे कौतुक होईल. संसारातील कटुता कमी होऊन प्रेम व स्नेहार्द्रता निर्माण होईल. महिलांना लेखनात वाव मिळेल. लग्नाच्या मुलींचे विवाह ठरतील व त्रासाशिवाय पार पडतील. शुभराशी ३-४-९.

### तूळ : प्रगतीकडे पाऊल.

भाग्यस्थानी रवि-शनि आहेत तर सातव्या स्थानी मंगळासारखा उग्र ग्रह आहे. काही चांगले अनुभव येणार आहेत. हर्शल-शनि यांचा त्रिकोणयोग आहे. काही दिवस तुम्हाला भेडसावणारे गेले. मनःस्थिती दोलायमान होती; पण आता काळजीचे कारण उरलेले नाही. प्रामुख्याने तुमच्यापैकी जे कुणी कलावंत असतील त्याचे गेलेले मार्केट पुन्हा येणार आहे. दुरावलेली लोकप्रियता व दुरावलेली माणसे पुन्हा मिळणार आहेत. राजकीय यश मोठे ठरेल. तुमच्या आशा-आकांक्षा पालटतील असेच काही तरी उत्साहवर्धक घडेल. तुमचा दूर राहलेला क्लेम प्रस्थापित होईल. व्यवसायातील मंदी आता औषधाला सुद्धा उरणार नाही. औषधी व्यवसाय, रेडिओ व कापडव्यापार तेजीत येऊन नुकसान भरून निघेल. नोकरीत प्रगती. महिलांचे कौतुक होईल. त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. शुभराशी. ४-५-११

### वृश्चिक : यशस्वी योजना

हर्शलाने तुमचे आर्थिक जीवन दुर्बल बनवलेले आहे. पण अंधारांत देखील आशेचा किरण दिसावा तसे या आठवड्यात होईल. तुमच्यावर गुरूसारख्या तेजस्वी ग्रहाची कृपा आहे. तो तुमचे मनोरथ पूर्ण करणार आहे. तुम्ही जर औषधी कारखान्यात अधिकारी असाल किंवा कोणत्याही सरकारी नोकरीत असाल तर तुमचे अधिकार वाढणार आहेत. मंत्रिपदासारखे मोठे पद तुमच्या अंगणात चालत येणार आहे. शेतीपदवीधर, कला-



पदवीधर व इंजिनीयर तुम्ही असाल तर नोकरीपेक्षा तुम्ही स्वतंत्र उद्योगांत लक्ष घालावे. त्यात तुम्हाला सर्व मदत मिळू शकेल. कर्जाचा प्रयत्न यशस्वी होईल. शेतीत नफा होईल. राहाण्याच्या जागेचा प्रश्न सुटेल. तंटेबखेडे सुटतील. विवाहाच्या प्रश्नांत प्रगती. महिलांनी स्पर्धापरीक्षेत भाग घ्यावा. त्यांना नोकरी वरच्या दर्जाची मिळेल. शुभराशी. ५–६–८

### धनु : अडचणीतून मार्ग

मेष राशीत स्वगृही उच्चीचा मंगळ हा एकच उत्तम योग आहे. या एकाच योगामुळे तुमच्या आशाआकांक्षा सफलतेच्या नंदनवनात फुलू लागतील. त्रास, अपयश, आजार अशा काटेरी कुंपणावर तुमचे जीवन सध्या हिंदकळत आहे. पण त्याची खंत बाळगण्याचे आता मुळीच कारण नाही. तुमच्या मनात अनेकदा स्वतःचे घर वा फ्लॅट असावा असे वाटत आहे. पण त्याची पूर्तता या वेळी होऊ शकेल. चालू जागेतील त्रास कमी कमी होत जाईल. मालक व भाडेकरू हे तंटे मिटतील. नोकरीत तुम्ही नव्या योजना आखून त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी तुमच्या मालकांसमोर अगर वरिष्ठांसमोर मांडा. त्या मंजूर होऊन तुम्हाला मोठी शाबासकी मिळेल. नोकरीत मात्र तुम्ही हाताखालच्या लोकांचा विश्वास संपादन करा. तो तुमच्या फायद्याचा ठरेल. महिलांनी चांगल्या नोकरीसाठी प्रयत्न करावा. माहेरची मदत मिळेल. शुभराशी ५–७–१०.

### मकर : मानसिक ताण

सध्या माघारीचे दिवस असले तरी तेवढयाने तुम्ही हतबल होण्याचे कारण नाही. रवी-शनी तुमच्याविषयीचा विरोध वाढवणार आहेत; पण त्याप्रमाणे तो विरोध मोडून काढण्यात तुम्हाला यशदेखील देणार आहेत. मंगळ चौथा तुमचा मानसिक ताण वाढवणार आहे. कामाची धांदल, अपमान, अगतिकता असे काही तरी तो निर्माण करणार आहे. पण त्याचबरोबर तुमचा जागेचा प्रश्न तो सोडणार आहे. तुमच्या परिस्थितीप्रमाणे तुमची राहण्याची, बंगल्याची इच्छा पुरी होणार आहे. रक्तदाब, पित्त अशा काही त्रासाने सोमवार ते शुक्रवार या दरम्यान तुम्हाला सक्तीची विश्रांती घ्यावी लागणार आहे. तुम्ही या वेळी जमिनीच्या खरेदी–विक्रीचा व्यवहार अवश्य करा. त्यात तुमचा फायदा होईल. शेतीच्या व्यवसायात फायदा होईल. कापूस, वायदा, शेअरव्यवहार फायद्याचा ठरावा. नवीन व्यापारात पडू नका. चालू उद्योगात काही अडचणी निर्माण होऊ शकतील. आर्थिक हानी फारशी नाही. महिलांना डोके शांत ठेवण्याची गरज आहे. काही त्रास संभवतो. शुभराशी ६–७–१०.

### कुंभ : विशाल यश

तुमची कोंडी संपवणारा असा हा आठवडा आहे. या आठवडयात अनेक अडचणींवर, अपयशांवर व असमाधानावर तुम्ही मात करणार आहात. तुमचा केवढाही लहान-मोठा आजार असो, निराशा असो ती दूर होऊन मनाला उभारी निर्माण होईल. उराशी बाळगलेली उत्तुंग स्वप्ने साकारण्याच्या अनेक युक्त्या–प्रयुक्त्या तुमच्या हाती येतील. शनिवार ते सोमवार चंद्र अनुकूल आहे. या वेळी अनेक कामे होऊ शकतील. प्रामुख्याने अर्थविषयक तुमची घसरगुंडी थांबवण्याचे अनेक मार्ग तुम्हाला सापडतील. शेती, इंजिनियरिंग उद्योग, खते व साखर, गूळ व फळे यांच्याशी निगडित असे उद्योग करा. आश्चर्य मानू नका. मिठाच्यासंबंधी एखादा उद्योग घरगुती प्रमाणात सुरू केल्यास त्याला चटकन स्थैर्य येईल. कृषी, वाणिज्य, कायदा, राजकारण यांच्या अभ्यासकांना प्रोत्साहन व पैसा मिळण्याचे उद्योग सुरू करून मिळतील. नोकरीत प्रमोशन. महिलांनी लॉटरीचे तिकीट काढावे. त्यांच्या हाती खूप पैसा येणार आहे. शुभराशी ६–८–९.

### मीन : प्रसन्नतेची सुरुवात

राशीस्वामी गुरु तुमच्या राशीत आहे. तो तुमच्या योजलेल्या प्रत्येक कामात अनुकूल वळण देणार आहे. चौथा रवी-शनी मानसिक अस्थिरता व असमाधान देणारा असला तरी गुरूच्या कृपेने त्याचा तुमच्या दैनंदिन कार्यक्रमावर कोणताच परिणाम होणार नाही. लेखकांना सरकारी पुरस्कार मिळणार आहे. पत्रकार व वाङ्मयसेवक यांना लोकप्रियता मिळणार आहे. एखाद्या पत्रकाराला मालकाच्या किंवा वरिष्ठाच्या रोषास बळी पडावे लागणार आहे. धंद्याच्या बाबतीत सोने व पितळ यांच्या उद्योगांना मोठे यश लाभणार आहे. सूत, कापूस, औषधे व सुगंधी तेलाचा व्यापार सुधारेल. या आठवडयातील रविवार, बुधवार व गुरुवार नोकरी मिळवण्याच्या दृष्टीने लाभदायी आहेत. पदवीधरांना उत्तेजनार्थ तात्पुरती मदत मिळेल. लघुउद्योग सुरू करता येईल. महिलांना नोकरीत बढती मिळेल. हवाईदलात चांगली नोकरी मिळेल. शुभराशी ४–६–७.

□ □

---

## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : ( जलमार्गे )

पंचावन्न रुपये

---

# झिलमिल सितारे

# दो जासूस – चैतन्यहीन

अरुणा अंतरकर

या सिनेमाचे निर्माते भलतेच प्रामाणिक आहेत. जाहिरातींमधून त्यांनी आधीच सांगून टाकलं आहे की, हा सिनेमा ५ ते ६५ वयाच्या मुलांसाठी आहे.
उघडच आहे, हा कथेच्या तपशिलात नाक न खुपसण्याच्या जातीचा सिनेमा आहे. इथे कथा वा विषय, त्यातली तर्कसंगती यांना महत्त्व नाही. महत्त्व आहे ते रोचक प्रसंगांना आणि ते गतीनं पुढं सरकण्याला.
' दो जासूस 'ची श्रेयनामावली तर आशादायकपणे सुरू होते. कार्टून्सच्या धाटणीवर घेतलेल्या या नामावलीची अक्षरं सुस्पष्ट दिसतात, डोळ्यांना त्रास न देता पुढे सरकतात, ही दुसरी समाधानाची गोष्ट.
आवश्यक तितक्या शालेय शिक्षणापर्यन्तही गाडी न पोचलेले, बावळट आणि अव्यवहारी समजले जाणारे पण अखेर ' हीरो ' ठरणारे चक्रम नायक आपल्याला अपरिचित नाहीत. इंग्रजी आणि हिन्दी सिनेमांमध्ये आपण त्यांना मुबलक पाहिलं आहे. ' दो जासूस 'चे धरमचंद-करमचंद समाजसुधाराचं व्रत घेऊन खाजगी गुप्तचर बनतात. घरातून पळून गेलेल्या एका मुलीच्या निमित्तानं ते नानाविध लफड्यांमध्ये सापडतात, आपल्या स्वभावानं ते या लफड्यांचा घोळ यथाशक्ती वाढवत रहातात. शेवटी अर्थातच तो व्यवस्थित निस्तरला जातो आणि सारे काही गोड गोड होते.
' दो जासूस 'मधे राजकपूर आणि राजेन्द्रकुमार यांना एकत्र आणताना ' व्हिक्टोरिया नंबर २०३ 'ची अशोककुमार आणि प्राण ही जोडी नजरेसमोर होती हे उघड आहे. ' व्हिक्टोरिया 'ची कथा रचणारे के. ए. नारायण हेच ' दो जासूस 'चेही कथा-पटकथालेखक आहेत. पण ' व्हिक्टोरिया 'त जमलेली भट्टी काही त्यांना इथे जमलेली नाही. तशी तर्कसुसंगत कथा ' व्हिक्टोरिया 'लाही नव्हती, पण धमाल प्रसंगांची त्यात नुसती उतरंड लावलेली होती. अशोककुमार आणि प्राण यांची ' व्हिक्टोरिया 'तली कामगिरी उत्स्फूर्त वाटत होती. ' व्हिक्टोरिया 'चा दिग्दर्शक ब्रिज हा देखील एक चलाख कारागीर आहे. सरसर गतीने धावणारे सिनेमे देणे हा त्याचा हातखंडा खेळ आहे.
' दो जासूस 'चा दिग्दर्शक नरेशकुमार मुळातच बेताच्या वकूबाचा आहे. हा एकच का, ' गंवार ', ' तांगेवाला ' हे त्याचे सारे चित्रपट सुस्त वाटतात. जुनाट वळणाचे वाटतात.
' व्हिक्टोरिया 'तल्या प्रसन्न मोकळेपणाची कुठे चुणुकदेखील ' दो जासूस 'मधे दिसत नाही. उत्कंठा वाढवीत नेणारं रहस्य गुंफण्याची ब्रिजची हातोटी नरेशकुमारजवळ बिल्कुल नाही. निखळ करमणूक देणारा, पोटभर हसवणारा सिनेमा आपल्याला पहायला मिळणार ही आशा मध्यंतरापूर्वीच मावळते.
अभिनयाकडून तरी काही समाधान मिळावं? –नाव नको. राजेंद्रकुमारकडून अभिनयाची अपेक्षा कधीच नव्हती. विनोदी अभिनय हा त्याचा प्रांतच नव्हे. ' दो जासूस 'मधे जी भूमिका त्याच्या वाट्याला आली आहे, तिला चपळ हालचाली लागतात– चेहेऱ्याच्या आणि शरीराच्याही. राजेंद्रकुमारचा एरवीचा वावरदेखील कधी सहज वाटत नाही; मग इथली गोष्ट कराच कशाला? नाचण्यागाण्याचा प्रसंग येतो तेव्हा, वजनानं राजेंद्रकुमारपेक्षा किमान दीडपट असणारा आणि वयानंदेखील मोठाच असणारा राजकपूर पायांच्या चपळ हालचाली करतो, एखाद्या हातवाऱ्यानं मजा निर्माण करतो. राजेंद्रकुमार अशा प्रसंगी अवघडल्यासारखा वाटतो. त्याच्या विनोदनिर्मितीचा सगळा भर आहे तो चित्रविचित्र पोशाख करण्यावर.
अर्थात अभिनयातून विनोद निर्माण करण्याचा सगळा भार राज कपूरवर पडतो. बॉसला सुंदरीच्या आमिषानं बाथरूममध्ये कोंडून खिजवण्यात किंवा शेवटी भन्नाट फटफटी चालवण्यात तो अपेक्षित रंग भरतोही. पण ही पुन्हा तुकडेजोड झाली. सबंध सिनेमावर राज कपूरनं आपलं वर्चस्व ठेवलंय अशी एकदाही जाणीव होत नाही. आम्ही पाहिलेल्या श्रेष्ठ नटांपैकी हा एक होता, अशी त्याची ओळख प्रेक्षकांच्या नव्या पिढीला करून देण्यासारखं राज कपूरच्या या कामात काहीही दिसत नाही. तो स्वतः या भूमिकेत रमला आहे असं चुकूनदेखील वाटत नाही. अर्थातच अशी स्फूर्ती येण्याजोगा कोणतीही मदत त्याला पटकथालेखक, संवादलेखक वा दिग्दर्शक यांच्याकडून झालेली नाही हेही खरंच.
जुने लोक दमले-भागले म्हणून सोडून देऊ. सिनेसृष्टीत पहिलं पाऊल ठेवणाऱ्या तरुण चेहेऱ्यांनी तरी उल्हासाची, चैतन्याची हो उणीव भरून काढावी? तेही नाही.
' बॉबी ' फेम शैलेन्द्र सिंगचा अभिनयाचा हा पहिला प्रसंग. (प्रेक्षकांवर तो चक्क ' ओढवलेला प्रसंग ' ठरणार आहे.) गोडगोड हसलं म्हणजे आपलं काम झालं, अशी त्याची समजूत दिसते. स्वतःचं गाणं स्वतः म्हणायची संधी याला ' दो जासूस 'मधे लाभलेली आहे. त्या गाण्याच्या चित्रणाच्या वेळीसुद्धा हा निर्विकार वाटतो. गाण्याच्या प्रसंगी हा एक–दोनदा नायिकेकडे पाहिल्यासारखं करतो आणि उरलेला वेळ अनुक्रमे समुद्र, आकाश, झाडी यांच्यावर आपल्या हसऱ्या कृपाकटाक्षांची पखरण

# संगीतकार : रवीभाई

## दो जासूसच्या निमित्ताने

'सौदागर' आणि 'चोर मचाए शोर' या गेल्या वर्षीच्या चित्रपटाद्वारे संगीतक्षेत्रात एका नव्या गुणग्राही संगीतकाराचे पदार्पण झाले. आज रवींद्र जैन यांना मोठमोठ्या निर्मात्यांच्या आगामी चित्रपटांच्या संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी त्यांच्या कारकीर्दीच्या पूर्वार्धातच लाभली आहे. 'दो जासूस' (राजकपूर, राजेंद्रकुमार) हा त्यांचा चित्रपट गेल्या आठवड्यात प्रकाशित झाला.
रवींद्र हे मूळचे अलिगडवासी, त्यांचे पिताजी इंद्रमणी जैन ही तिकडची एक प्रतिष्ठित व्यक्ती. आपल्या तरुणपणी रवींद्र यांनी प्रयाग संगीत विद्यालयात 'बॅचलर ऑफ म्युझिक'ची पदवी मिळविली व सात वर्षे कलकत्त्यात संगीताचा अभ्यास केला. १९६९ मध्ये प्रख्यात कवी रामरिख मनहर यांनी मुंबईला आयोजित केलेल्या एका सांस्कृतिक कार्यक्रमात रवींद्र यांच्या कलेचाही नमुना त्यांनी 'दुख तेरा हो दुख मेरा हो, दुख की परिभाषा एक है' या मनोहर काव्याद्वारे हार्मोनियमवर पेश केला व रसिकांना तोषविले. या रसिकात एन्. एन्. सिप्पी हे एक होते. त्यांनी रवींद्रमधील कलावंत हेरला व त्यांना करारबद्ध केले. मात्र रवींद्र यांचा 'सौदागर' हा प्रथम प्रकाशित झाला. माझ्या अंदाजाप्रमाणे सध्या तरी मुंबईच्या फिल्म इंडस्ट्रित रवींद्रसारखा एकही असा संगीतकार नाही की जो संगीतकारा-व्यतिरिक्त गायक व गीतकार आहे. रवींद्र यांचा आवाज मधुर नसला तरी 'चोर मचाए शोर' मधील 'घुंघरू की तरहा बजता ही रहा हूं' हे गीत जर किशोरकुमार ऐवजी त्यांनीच म्हटले असते तर या दर्दभऱ्या गायकाच्या शोधार्थ संगीतप्रेमी भटकले असते. इतके खोल दुःख ते हे गीत म्हणताना ऐकणाऱ्याला होते. दुर्दैवाने लहानपणापासूनच त्यांना दिसत नाही. त्या संबंधाने 'कांच और हिरा' या चित्रपटातले गीत 'नजर आती नही मंजिल' ही रवींद्र यांच्या जीवनाची हकिकत आहे. संगीतकार हा कलावंत असतोच, परंतु सदाचारी माणूस म्हणून रवींद्र यांचा खास उल्लेख केला पाहिजे. विनोदी, दूरदर्शी, तसेच भावुक व शांतिप्रिय हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे खास गुण. म्हणूनच प्रसन्नता, आनंद, उत्साह त्यांच्या जीवनात भरलेला दिसतो. काव्य, गजल, शेरशायरीचा रवींद्र यांना अत्यंत नाद असल्याने अनेक लोक त्यांचे चाहते आहेत. त्यांच्या मैफिली सदैव आबाद असतात. इतरांच्या कार्यापेक्षा रवींद्र यांची प्रसंशनीय विशेषता म्हणजे दृष्टी नसल्याने त्यांची बुद्धी कुशाग्र व अत्यंत तीक्ष्ण आहे. गाणे तयार झाल्यावर ते पाठ करतात व लक्षात ठेवतात. त्यांनी अशी अनेक गीते हृद्‌गत केली आहेत. 'चोर मचाए शोर'च्या प्रकाशनापूर्वी रवींद्र निराश होते. परंतु आज त्यांच्याकडे इतके काम आहे की, त्यांना वेळ मिळत नाही. अनेक चित्रपटांचे संगीत कम्पोज करण्याबरोबरच सध्या ते कल्याणजी आनंदजी यांच्या 'कालीचरण' या चित्रपटासाठी गीते लिहीत आहेत. एका संगीतकारासाठी दुसऱ्याने गीते लिहिण्याचा असा प्रसंग क्वचितच घडला आहे. गीत गाता चल, तूफान, सलाखे दिवानगी, राम भरोसे, डाकू और महात्मा, एक गावकी कहानी, फकिरा आदि त्यांचे अनेक चित्रपट एकामागोमाग प्रकाशित होणार आहेत. अलीकडे त्यांच्या चित्रपटाबद्दल त्यांना नॉर्थ इंडिया लॉयन्स क्लब व दिल्ली सिने गोवर्स क्लबची दोन पारितोषिके मिळाली आहेत.
स्वतःविषयी बोलताना रवींद्र मला म्हणाले की 'आज मी सिनेमात संगीतकार व गीतकार म्हणून उभा आहे. अलीकडे चांगला सहयोग मिळतो आहे. 'सौदागर' मुळे रसिकांना मी इतका आवडेन याची मला शाश्वती नव्हती.'
पश्चिमी संगीत उपयुक्त नाही असे समजणाऱ्यात मी नाही. पण कोणत्याही पद्धतीच्या संगीतात माधुर्य हे कटाक्षाने असलेच पाहिजे, हा माझा नियम आहे. माधुर्यानेच केवळ संगीताला खास असे स्थायित्व प्राप्त होते. जरी कॅब्रे नृत्यामध्ये संगीताची जलदगती ऐकण्यास आनंद वाटला तरी त्यात माधुर्य आणि शब्दलालित्याची गुंफण केल्याविना कम्पोझिशन यशस्वी होत नाही. मी स्वतः कविहृदयी असल्याने गीते म्हणून अपरिहार्य शब्दजुळवणी नापसंत करतो. कारण कविता आणि संगीत हे एकमेकांचे पूरक असतात. या दोन्ही गोष्टी जेवढ्या समर्थ, तेवढेच संगीत प्रभावशाली, परिणामकारक उतरते.'
गेल्या दहा वर्षांच्या संगीताविषयी विचार व्यक्त करताना रवींद्र यांचा कल भारतीय संगीताकडे अधिक दिसला. 'दहा वर्षांच्या या कालखंडात संगीतक्षेत्रात अनेक प्रयोग झाले. आज पाश्चात्य संगीताचा जोर आहे. परंतु त्या प्रभावापुढे नव्या पिढीला भारतीय लोकसंगीत व शास्त्रीय संगीताविषयी काही स्वारस्य राहिलेले नाही, असे प्रमाणित करणे म्हणजे असत्याचाच पाठपुरावा केल्यासारखे होईल. कारण नाही तर मग आजच्या वेस्टर्न मेलडीच्या वादळात 'पाकिजा'चे संगीत एका वृक्षपर्णाप्रमाणे उडून कुठे तरी दूरवर जाऊन पडले असते.
वास्तविक पाहता शास्त्रीय व लोकसंगीताबद्दल मला फार प्रेम वाटते. तथापी चरित्रचित्रण आणि वातावरणाच्या दृष्टीने देखील चित्रपटाच्या कथानकात भारतीय संगीत नवीनतम अर्थाने 'वापरण्यास पुष्कळ वाव असतो. पाश्चात्य संगीताचा उपयुक्त आणि आकर्षक सुंदर प्रयोग आमच्याकडे काही संगीतकारांनी केला आहे. अशा प्रकारचे नाविन्य आले पाहिजे. मीसुद्धा त्याचा पुरस्कर्ता आहे. फिल्मी संगीतात सध्या भारतीय व पश्चिमी संगीताच्या समन्वयाचा काळ चालू आहे ही घटना मला वावगी वाटत नाही. कारण ज्यात माधुर्य असते तेच संगीत चिरंजीव झालेले आहे आणि माधुर्याची कसोटी कलेच्या कुठल्याच विभाजनावर आधारलेली नसते.'

—दिलीप रुद्राक्ष

करण्यात घालवतो. अर्थात त्यामुळे सभ्य गृहस्थ म्हणून त्याची ख्याती होईल, नटयांच्या अम्मा नि मम्मा आपल्या पोरीबाळींना हाच हिरो मिळेल अशी काळजी घेतील; पण प्रणयदृश्यांमध्ये इतका थंड, निरुत्साही, निर्विकारादी सकलगुणसंपन्न नायक प्रेक्षकांना पसंत पडेल की काय शंकाच वाटते. पार्श्वगायनाचं तंत्र या तरुण गायक–नटानं चांगलं आत्मसात केलं आहे. पण त्याचा आवाज अगदीच सौंदर्यहीन आहे. आत्ताच तो फुटल्यासारखा वाटू लागला आहे.

पूर्वाश्रमीच्या डिम्पल कापडियावर बेतलेल्या भावना भटची स्थिती शैलेन्द्रहून वेगळी नाही. ती जर नायिका होऊ शकते तर एखाद्या जोशांच्या मंदानं किंवा साठयांच्या शकूनं नायिका बनण्याची स्वप्नं पहायला काहीच हरकत नाही.

' दो जासूस 'च्या बऱ्या वाटणाऱ्या गोष्टीत पुण्याची लोकल्स निवडण्यात दाखवलेलं औचित्य बाबूभाई उदेशीची फोटोग्राफी आणि रवींद्र जैन यांचं संगीत एवढंच आठवता येईल. रवींद्र जैनची प्रत्येक चाल पूर्वी ऐकल्यासारखी वाटते; पण त्याच्या चाली कानांना गोड लागतात खऱ्या. एका वेळी काही शेकडा वाद्यं तो एकाच वेळी वाजवत नाही, ह्या एकाच गोष्टीमुळेसुद्धा त्याचं संगीत श्रवणीय वाटतं. झटपट गीतं लिहिण्याच्या मामल्यात देखील रवींद्र जैन आता तरबेज झालेला दिसतो. ' दो जासूस 'मधली दोन्ही द्वंद्वगीतं त्यानं सांकेतिक शब्दांमधे लिहिली आहेत; पण चांगल्या चालींमधे आणि ठेक्यात बसवली आहेत.

' दो जासूस ' हा रंगीत असला तरी काही प्रचंड खर्चाचा चित्रपट नव्हे. बरंचसं चित्रण पुण्यातल्या लोकलसवर झालेलं दिसतं. गुंडांची गुहा म्हणून खडकीजवळच्या एका जुनाट चर्चचा खुबीनं वापर केलेला दिसतो. प्रत्यक्ष सेट न उभारता बऱ्याचदा योग्य त्या बाह्य चित्रणानं या मंडळींनी काम जमवलेलं आहे. मराठी चित्रपट आता रंगीत होऊ लागले आहेतच; बाह्य चित्रणावरही भर देऊ लागले आहेत. त्या चित्रणात अधिक खर्चात न पडता वैविध्य आणण्याच्या दृष्टीनं ' दो जासूस ' त्यांना काही तरी सांगू शकेल असं वाटतं. ■

## चोरी मेरा काम....

हिंदी साहित्यिकांना आता आपल्या कथा रजिस्टर करण्याआधी त्यांच्या शीर्षकांचे कॉपीराइट मिळवण्याची तरतूद करावी लागेल. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांवर चित्रपट बनवायला जावं, तर मूळ कथा-कादंबऱ्यांची शीर्षकं आधीच दुसऱ्या एखाद्या निर्मात्यानं ' उचललेली ' असतात असं आढळून येतं.

' तीसरी कसम 'चे लेखक फणीश्वरनाथ रेणू यांच्या ' मैला आंचल ' या सुविख्यात कादंबरीला चित्ररूप द्यायचा विचार नवेंदु घोष यांच्या मनात आला. कादंबरी आधीच इतकी गाजली आहे, तर तेच नाव सिनेमाला देणं लाभाचं, हा नबेंदूबाबूंचा विचार मात्र प्रत्यक्षात उतरू शकला नाही. कारण सुरेंद्र कपूर या निर्मात्यानं याच शीर्षकाचा चित्रपट जवळजवळ पुरा करीत आणला आहे, असं त्यांच्या कानावर आलं. नबेंदूबाबूंच्या चित्रपटाच्या निर्मात्यानं सुरेंद्र कपूरना याबद्दल विचारणा केली— आणि ऐकलेलं उत्तर ऐकून ते हतबुद्ध झाले. सुरेंद्रबाबू म्हणे म्हणाले, ' फणीश्वरनाथ रेणूंनी ' मैला आंचल ' या नावाची कादंबरी लिहिलीय हे मला ठाऊक नव्हतं आणि त्यावर सिनेमा तयार होतोय याची तर गंधवार्ता नव्हती. ' (' नशीब, फणीश्वरनाथ रेणू कोण ' म्हणून सुरेन्द्रबाबूंनी विचारलं नाही.)

' मैला आंचल ' या रेणूंच्या कथेचं नाव आता ' डागदरबाबू ' असं ठेवण्यात आलं आहे. आपल्याच कथेकरता दुसरं नाव शोधण्याची वेळ आलेले रेणू हे पहिले लेखक नव्हेत. ' धर्मयुग 'चे संपादक डॉ. धर्मवीर भारती यांच्या ' गुनाहोंका देवता ' या कादंबरीबाबत हाच प्रकार घडला आहे. त्यांच्या प्रस्तुत कादंबरीवर आधारित चित्रपट तयार होतो आहे, त्याचं नाव आहे— अगदी संपूर्ण फिल्मी नाव आहे : ' एक था चंदर, एक थी सुधा ', ' गुनाहोंका देवता ' हे त्यांच्या कादंबरीचं शीर्षक देवी शर्मा नावाच्या एका निर्माते–दिग्दर्शकानं ५।७ वर्षांपूर्वी वापरून टाकलं. जीतेंद्र आणि राजश्री यांच्या भूमिका असलेला तो सुमार दर्जाचा चित्रपट पडेलच ठरला ही गोष्ट वेगळी. पण त्यानं धर्मवीर भारतींना आपल्याच कथेचं दुसऱ्यांदा बारसं करायला लावलं. ■

## —आणि हाही प्रकार !

या प्रकारानं आश्चर्य वाटायला नको. हिंदी चित्रपटांबाबत अशी आश्चर्यं रोजरोज घडताना दिसतात; पण सिनेमांसाठी गाजलेल्या कथा–कादंबऱ्यांच्या शीर्षकांवर डल्ला मारणारे लोक आहेत, तसे आपल्या कादंबऱ्यांसाठी गाजलेल्या (वा वाजलेल्या) सिनेमांच्या नावांचा उपयोग करून घेणारे काही महाभाग आहेत. दर मिनिटागणिक मुद्रा आरक्त होणाऱ्या नायिकांच्या किंवा दर पळाला आळीपाळीनं नायिकेच्या अगर साहस-संकटाच्या बाहुपाशात शिरणाऱ्या मर्द नायकांच्या कथा चवीचवीनं लिहिणारे लेखक हिंदीत मुबलक आहेत आणि हिंदीत अतिशय लोकप्रिय ठरलेल्या पॉकेटबुक्स सीरिजनी त्यांच्या या सततोद्योगी वृत्ताला खतपाणी घालत ठेवलं आहे.

आकाशवाणीवर तुफानी जाहिरात केल्या जाणाऱ्या हिंदी पुस्तकांमधे राजवंशच्या कादंबऱ्यांचा अग्रक्रम लागेल. गुलशन नंदाच्या या प्रतिस्पर्ध्याच्या काही कादंबऱ्यांची नावं पाहा : ' सांझ और सवेरा ', ' अभिमान ', ' वासना ', ' उपासना ', ' मदहोश '.

राजवंशचा धाकटा भाऊ म्हणावं अशा लोकदर्शीनं चित्रशीर्षकं लंपास करण्याबाबत दाखवलेला दूरदर्शीपणा म्हणजे ' अभिलाषा ', ' दीवाना ', ' मंजिल ', ' हारजीत ' ही ताजी प्रकाशनं.

आरिफ मारहर्वी (' नमकहराम '), राजदीप (' खुशबू '), गुरुदत्त (' अग्निपरीक्षा '), समीर (' आवारा ', ' तलाश ') हे उपरोल्लेखित मंडळींचे काही नामी भाईबंद. एखादा सिनेमा लोकप्रिय झाला रे झाला की, या मंडळींपैकी एका ना एकाच्या पुढल्या कादंबरीचं शीर्षक तिथल्या तिथे निश्चित होतं.

आणि तरी काही मंडळींनी सिनेमाचा आणि साहित्याचा एकमेकांशी संपर्क राहिलेला

नाही म्हणून ओरड करावी ना? त्यांच्या अज्ञानाचा हा घ्या दुहेरी (आणि सज्जडसुद्धा) पुरावा.

## शबाना, टी. व्ही. आणि 'परिणय'

यंदाच्या राष्ट्रीय पारितोषिक-स्पर्धांमध्ये, राष्ट्रीय एकात्मतेच्या विषयावरचा उत्तम चित्रपट म्हणून मान पटकावणारा 'परिणय' टेलिव्हिजनच्या काठापर्यंत पोचून परत आला. तो तिथपर्यंत न पोचण्याचं श्रेय शबाना आझमीला देण्यात येत आहे. 'परिणय'चे पाय खेचायला जबाबदार कोण–शबाना की टेलिव्हिजनचे अधिकारी वीरेन्द्र शर्मा, ही चर्चा सध्या चित्रवर्तुळात जोरानं चालू आहे.
शबानाच्या नाराजीला एवढं कारण तरी काय झालं? तिला शर्मांनी कार्यक्रमासाठी निवडलेली दृश्यं पसन्त नव्हती. नायक-नायिकेच्या विवाहाची बोलणी पक्की झाल्यावर नायिका आपल्या आईच्या घरात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या नोकराच्या पाया पडते, ह्या दृश्याचा समावेश व्हायला शबानाचा कडाडून विरोध होता.
पण टेलिव्हिजनचे अधिकारी श्री. शर्मा यांनी हा विरोध मानला नाही. त्यांचं म्हणणं 'चित्रावलोकन' या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी टेलिव्हिजनची आणि आणि तिथं काम करणाऱ्यांची आहे. एखादा कार्यक्रम कशा प्रकारे सादर करायचा याबद्दलचं संपूर्ण स्वातंत्र्य त्यांना मिळायला हवं. 'चित्रावलोकन' हा काही निर्मात्याकडून सादर होणारा, जाहिरात-वजा प्रेषित प्रोग्रॅम नव्हे..'
शबानच्या अभिनयगुणांबद्दल पूर्ण आदर बाळगूनही, 'परिणय'चे पाय मागे ओढण्याचा ठपका तिच्यावरच येतो. शर्मांच्या म्हणण्यात काय चूक आहे? 'चित्रावलोकन' हा चित्रपट-रसग्रहणाचा कार्यक्रम आहे. ज्याच्या हाती तो सोपवण्यात येईल, तो त्याच्या दृष्टिकोणानुसारच कार्यक्रमाची आखणी करणार हे उघड आहे. त्याच्या चित्रपटाबद्दलच्या प्रतिक्रिया व्यक्त करणारी दृश्यं निवडण्याचं स्वातंत्र्य त्याला नाकारण्यात शबानानं कोणतं औचित्य वा कलादृष्टी दाखवली?
'कलाकाराच्या काही इच्छा असू शकतात' हे तिचं म्हणणं एरवी खरं आहे; पण आपल्या इच्छा व्यक्त करताना ती दुसऱ्याचं मतस्वातंत्र्य का हिरावून घेते आहे? आपली नाराजी ती नंतर जाहीरपणे व्यक्त करू शकली असती.
'चित्रावलोकनाचा हा कार्यक्रम 'लाइव्ह प्रोग्रॅम' म्हणून सादर होणार होता. म्हणजे प्रत्यक्ष मुलाखतीतसुद्धा ती आपला विरोध कुठे ना कुठे व्यक्त करू शकली असती.
सगळ्यात मोठी गंमत पहा. 'परिणय'चे दिग्दर्शक कान्तिलाल राठोड हे ह्या तंटयाच्या वेळी टेलिव्हिजन स्टुडिओत प्रत्यक्ष हजर होते. शर्मांनी निवडलेल्या दृश्यांना विरोध करायचा त्यातल्या त्यात त्यांना हक्क होता; पण दिग्दर्शक गप्प राहतो आणि नायिका वरचष्मा चालवते, तोसुद्धा सिने-स्टुडिओत नव्हे, तर जिथे तिचा काहीही संबंध पोचत नाही अशा ठिकाणी! खुद्द सिनेमात ढवळाढवळ करण्याची जिला काडीचाही हक्क नाही ती त्याच्या संबंधीच्या कार्यक्रमात कसा काय हस्तक्षेप करू शकते? ज्या कार्यक्रमाचं स्वरूप समीक्षात्मक आहे, तिथे चित्रपटाची नायकनायिका काय, दिग्दर्शकसुद्धा काही बोलू शकत नाहीत. कान्तीलाल राठोड यांनी हा संकेत पाळला. पण आपल्या नायिकेला सौम्यपणे ताकीद देण्याऐवजी, आपल्या सिनेमाचा कार्यक्रम ऐन वेळी रद्द होणं त्यांनी सहन केलं.
'का, कशासाठी' हे प्रश्न आता त्यांना विचारण्यात काय हशील आहे? शबानाचा तरी विरोध नेमका कशासाठी होता? इतक्या निरुपद्रवी दृश्यात तिला काय खटकलं?–याबद्दल काही न बोलता शबानानं टेलिव्हिजनवर तोंडसुख घेतलं आहे. 'मला किंवा माझ्या करीअरला टी. व्ही. चा काय लाभ होणार आहे? टी. व्ही. वर माझ्या येण्यानं मला लाभ मिळणार नव्हता–लाभ मिळणार होता टी. व्ही. ला. निदान एवढी जाणीव ठेवायची त्यांनी!' शबानाच्या या तोऱ्याच्या उत्तराला शर्मांनीही तेवढीच झणझणीत प्रतिक्रिया दाखवलेली आहे. 'तिची वागणूक शिष्टाचाराला धरून नव्हती,' अशी तक्रार त्यांनी केली.
शबाना आझमी आणि वीरेन्द्र शर्मा यांच्यातलं वाक्‌द्वंद्व एवढं रंगत गेलं की, कान्तिलाल राठोड यांचा समजावणीचा सूर त्यात साफ विरून गेला. शबाना म्हणे, 'मी हा प्रोग्रॅम मंजूर करणार नाही.' शर्मा कडाडत, 'बाईसाहेब, मी तुमचा वरचष्मा चालू देणार नाही.' अखेर हा वाद 'परिणय'च्या मुळावर आला.
यानं काय झालं?
समान्तर सिनेमाच्या वर्गातला एक चांगला चित्रपट म्हणून कुतूहल निर्माण करणाऱ्या 'परिणय'ला प्रेक्षकांपर्यंत पोचायची संधी लाभली नाही, नुकसान शबानाचं झालं नाही. नुकसान शर्मांचं झालं नाही किंवा टी. व्ही. चंही झालं नाही. नुकसान झालं 'परिणय'चं. सद्‌हेतूनं चित्रनिर्मिती करणाऱ्या त्याच्या निर्मात्यांचं. चांगलं काही तरी देण्यासाठी सतत धडपड करणाऱ्या एका उमेदीच्या तरुण दिग्दर्शकाला प्रेक्षकांशी हितगुज करायची संधी मिळाली नाही. नवीन सिनेमाकडे उत्सुकतेनं पहाणाऱ्या, त्याच्याविषयीची समज वाढवू पहाणाऱ्या आमच्यासारख्या सामान्य प्रेक्षकांचं नुकसान झालं. 'व्यावसायिक चित्रपटांमध्ये काम करण्यात माझा हेतु वेगळाच आहे. तियल्या माझ्या लोकप्रियतेचा उपयोग मी प्रेक्षकाला कलात्मक चित्रपटांकडे नेण्यासाठी करीन.' असं बोलून आम्हाला आशा दाखवणाऱ्या अभिनेत्रीकडून या व्यवहाराची अपेक्षा खचितच नव्हती. ■ ■

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**